

पाच हजारहून अधिक मुलींचे पूजन P3

पुणे, गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 301 • वर्ष ३ रे, अंक ३०१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



रिंकू सिंग आणि नितीश रेड्डीची तुफान फटकेबाजी P12

## At a Glance

### तरुणीचा अपघातात जागीच मृत्यू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यामध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. कोथरुडमध्ये हा भीषण अपघात झाला असून यामध्ये तरुणीचा जागीच मृत्यू झाला आहे. कोथरुड धोंडीबा सुतार बस स्थानक येथे भीषण अपघात झाला. यामध्ये युवतीचा मृत्यू झाली माहिती समोर येत आहे.

कोथरुड धोंडीबा सुतार बस स्थानकासमोरची ही घटना घडली. यामध्ये तरुणी रस्ता ओलांडताना तिला डंपरची धडक बसली. यामध्ये तिचा जागीच मृत्यू झाला आहे. डोक्यावरून मिक्सरचे चाक गेल्याने तरुणीचा » पान ७ वर

### केंद्र सरकारची मान्यता : पंतप्रधान मोदींच्या हस्ते विविध प्रकल्पांचे उद्‌घाटन

# राज्याला दहा वैद्यकीय महाविद्यालये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात आगामी होणाऱ्या विधानसभेच्या तोंडावर राज्यासह केंद्राची जास्त मर्जी असल्याचे सध्या उद्‌घाटन व लोकार्पण कार्यक्रमातून दिसून येत आहे. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महाराष्ट्रातील ७,६४५ कोटींहून अधिक विविध प्रकल्पांच्या कामांचे भूमीपूजन आणि उद्घाटन झाले. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर आणि शिर्डी विमानतळाच्या कामांचे भूमीपूजन, नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्‌घाटन यांचा यात समावेश आहे.

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन एकीकृत टर्मिनल इमारतीची अंदाजित किंमत अंदाजे ७ हजार कोटी

> महाराष्ट्राला १० वैद्यकीय महाविद्यालयांची भेट मिळत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूरच्या आणि शिर्डी विमानतळावरील नवीन टर्मिनल इमारती प्रकल्पांचेही भूमीपूजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र मेट्रोचा आणि विमानतळांचा विस्तार केला जात आहे. राज्यात पायाभूत सुविधा, सौरउर्जा आणि वस्त्रोद्योगाशी संबंधित विविध योजना सुरू केल्या जात आहेत. सर्वात मोठ्या वाढवण कंटेनर बंदराची यापूर्वीच पायाभरणी झाली आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे."
>
> — नरेंद्र मोदी पंतप्रधान

रुपये आहे. येथे सर्व आकारांच्या विमानांसाठी योग्य स्वतंत्र संचालनासह दोन समांतर धावपट्टी, विद्यमान धावपट्टीचे विस्तारीकरण केले जात आहे. तसेच नवीन धावपट्टीची निर्मिती, दरवर्षी १४ दशलक्ष प्रवाशांच्या हाताळणीसाठी ३ लाख चौ.मी.च्या नवीन टर्मिनल इमारतीचा विकास, अंदाजे ९ लाख मेट्रिक टन क्षमतेच्या नवीन कार्गो कॉम्प्लेक्सचा विकास करण्यात येत आहे.

शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ नवीन एकीकृत टर्मिनल इमारतीचे भूमीपूजन आज करण्यात आले. विस्तारित टर्मिनल इमारतीमुळे शिर्डीमधील स्थानिकांसाठी रोजगार निर्मिती होणार असल्याचे राज्य सरकारने म्हटले आहे. केंद्र सरकारने नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता दिली आहे. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागांत ९०० नी वाढ होत आहे. » पान ७ वर




### संजय काकडे शरद पवार गटात प्रवेश करणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा धमाका होणार आहे. हर्षवर्धन पाटील यांच्यापाठोपाठ भाजपचा आणखी एक नेता बडा पक्ष सोडणार आहे. भाजपच्या या बड्या नेत्याचे नाव संजय काकडे आहे. संजय काकडे शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. भाजपसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. संजय काकडे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. संजय काकडे शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली आहे. संजय काकडे हे भाजपचे माजी राज्यसभा खासदार आहेत. पक्षाकडून १० वर्षात काहीच मिळाले नसल्याची तक्रार संजय काकडे यांनी केली आहे. भाजपकडून फक्त वापर झाल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. » पान ७ वर

### रतन टाटांची प्रकृती चिंताजनक



**मुंबई :** देशातले ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती येत आहे. मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. सोमवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेले होते. परंतु तेव्हा प्रकृती स्थिर असल्याचे त्यांनीच » पान ७ वर

### जानकरांचे ते व्यक्तव्य वादात

**पुणे :** शरद पवार गटाचे माळशिरस तालुक्यातील नेते उत्तम जानकर यांनी इंदापूर येथे हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षप्रवेशावेळी गणेशाबद्दल काढलेले व्यक्तव्य वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. श्री गणेशाचा जानकर यांनी अवमान केला आणि शरद पवार यांनी त्यांना रोखले का नाही, » पान ७ वर

### पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना; १७ हजार ८२ कोटी रुपये मंजूर

# गरिबांचा भात होणार आता स्वादिष्ट व पौष्टिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.९) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये गरिबांना पोषक आहार, गुजरातमधील लोथल येथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल आणि राजस्थान-पंजाब या सीमावर्ती राज्यांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे या निर्णयांचा समावेश आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, मंत्रिमंडळाने १७ हजार ८२ कोटी रुपयांच्या पोषक तांदूळ योजनेला मंजुरी



दिली आहे.

यामध्ये पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना यासह संबंधित सर्व योजनांचा समावेश करण्यात आला आहे. जुलै २०२४ पासून सुरू होणारी ही योजना डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे अशक्तपणा आणि पौष्टिकतेच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या गरिबांना मोफत पौष्टिक धान्य मिळत राहील. या योजनेला संपूर्णपणे केंद्र सरकारकडून निधी दिला जाईल. याचा फायदा देशातील ८० कोटी लोकांना होणार आहे. ही योजना २०२२ मध्ये सुरू करण्यात आली होती.

केंद्रीय मंत्रिमंडळाने गुजरातमधील लोथल येथील राष्ट्रीय सागरी वारसा संकुलाच्या विकासाला मंजुरी दिली आहे. भारताचा ४ हजार ५०० वर्षांचा सागरी वारसा दाखविण्याच्या पंतप्रधानांच्या संकल्पनेनुसार, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय लोथल येथे जागतिक दर्जाचे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल उभारणार » पान ७ वर



### ३२ वर्षीय महिलेवर अत्याचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात महिला अत्याचाराची आणखी एक धक्कादायक घटना उघड झाली आहे. ३२ वर्षीय महिलेचे अपहरण करून तिला मारहाण करण्यात आली.त्यानंतर कर्जतच्या जंगलात नेऊन या महिलेवर अत्याचार करण्यात आले. याप्रकरणी दोन जणांविरोधात सहकारनगर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये एका महिलेचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील महिलेवर कर्जतच्या जंगलात » पान ७ वर

# लाडक्या बहिणीवर काळाने घातला घाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायगड :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून अनेक महिलांच्या खात्यात नोव्हेंबर महिन्याचा हप्ताही यामहिन्यातच जमा झाला आहे. या योजनेचा सरकारकडूनही जोरदार प्रचार होत असून अनेक जिल्ह्यात वचनपूर्ती मेळावे भरवले जात आहेत. वचनपूर्ती सोहळ्याचा तिसऱ्या टप्प्यातील शुभारंभ काल रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात होता.

मुख्यमंत्री शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या महिलांच्या बसला भीषण अपघात झाला आहे. २१ महिलांना घेऊन जाणारी बस २० फूट



खोल दरीत कोसळली आहे. माणगाव तालुक्यातील मांजरोणे घाटात हा अपघात झाला आहे. या अपघातात ८ महिला जखमी झाल्या असून एका महिलेची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

» अपघात

रानवडे कोंड येथून २१ महिला लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी माणगावला निघाल्या होत्या. मांजरोणे घाटात येताच चालकाचे नियंत्रण सुटले व बस खोल दरीत कोसळली. यामध्ये जखमी महिलांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# वंचितची दुसरी यादी जाहीर; सर्वच्या सर्व मुस्लिम उमेदवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाविकास आघाडी व महायुतीत जागावाटपावरून



काथ्याकूट सुरू असताना वंचितने विधानसभा निवडणुकांच्या तयारीत आघाडी घेतली असून आज १० उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे या सर्व जागांवर मुस्लीम उमेदवारांना संधी दिली आहे.

येत्या आठवड्याभरात महाराष्ट्रात निवडणुका लागण्याची शक्यता आहे. या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. यात मनसेनंतर वंचित बहुजन आघाडीने आघाडी घेतली असून वंचितने काल १० विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारांची घोषणा केली. प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडी तिसऱ्या आघाडीत सामील होणार का? अशी चर्चा होत असतानाच वंचितने आज १० उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करत स्वबळावर लढणार असल्याचे स्पष्ट केले.

वंचित बहुजन आघाडीने १० जणांना उमेदवारी जाहीर केली आहे. यात औरंगाबाद मध्य (छत्रपती संभाजीनगर मध्य), कल्याण पश्चिम, परभणी, हडपसर, माण, सांगली, गंगापूर, शिरोळ, मलकापूर, बाळापूर व परभणी या महत्वाच्या मतदारसंघाचा समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच वंचितने आपले २१ उमेदवार जाहीर केले आहेत.

### अहमदनगर नव्हे 'अहिल्यानगर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील औरंगाबादचे 'छत्रपती संभाजीनगर' तर उस्मानाबादचे 'धाराशिव' नामांतर करण्यात आल्यानंतर अहमदनगरचे 'अहिल्यानगर' असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून सुरू होती. केंद्रातील एनडीए सरकारने अहमदनगर जिल्ह्याचा नामांतरावर काही दिवसांपूर्वीच शिक्कामोर्तब केले होते.

त्यामुळे नगरच्या नामांतराचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानंतर आता राज्य सरकारकडून अहमदनगरचे 'अहिल्यानगर' असे नामांतराचा अध्यादेश काढण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्रातील एनडीए आणि महाराष्ट्रातील महायुती सरकारने धडाकेबाज निर्णयांचा धडाकाच लावला आहे.

# वादाची 'वाळवी'

### पुरस्कार स्वीकारायला सिनेमाच्या टीमची अनुपस्थिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्याची सगळीकडेच चर्चा झाली. या सोहळ्यात सर्व विभागातील पुरस्कार विजेत्या मान्यवरांनी हजेरी लावली. पण सगळ्यांना एका सिनेमाच्या टीमची





अनुपस्थिती खटकली आणि ही टीम होती सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार मराठी विभाग पटकावणारी वाळवी सिनेमाची टीम. राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारायला या सिनेमाच्या टीमतर्फे कुणीच हजर नव्हते.

सिनेमाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार किंवा लेखक यापैकी कुणीही » पान ७ वर

> मला स्वतःला पुरस्कार सोहळ्यात सहभागी होण्याची आणि मराठी चित्रपटाला मिळालेला सर्वोच्च मान, राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्याची अत्यंत इच्छा होती . त्यासाठी मी झी स्टुडिओकडे सातत्याने पाठपुरावा केला. यांना ३१ ई-मेल्स केले. परंतु त्यांच्या अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचे साकारात्मक उत्तर मिळाले नाही . त्यांनी आमच्या मयसभा या निर्मिती संस्थेचे नाव राष्ट्रीय पुरस्कार समितीला कळवले नाही. दिग्दर्शक म्हणून परेश मोकाशी यांना आमंत्रण होते पण सध्या ते शूटिंगमध्ये बिझी असल्याने सोहळ्याला उपस्थित राहू शकले नाहीत. लेखिका आणि सहनिर्माती म्हणून मला पुरस्कार सोहळ्याला हजर राहण्यासाठी झी च्या निर्मात्यांनी सहकार्य केलं नाही. त्यांनी माझ्या भावनांचा अनादर केलाच पण स्वतः राष्ट्रीय पुरस्काराला अनुपस्थित राहून त्याचा सन्मान ठेवला नाही. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे.
>
> - मधुगंधा कुलकर्णी (सिनेमाच्या लेखिका आणि सहनिर्माती)

### बहिणींची दिवाळी होणार आता गोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्वाची माहिती दिली आहे. लाडकी बहीण योजनेतून २ कोटी ३० लाख माझ्या बहिणींच्या खात्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचा ३००० रुपयांचा हप्ता जमा झाल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. काही लोक म्हणत होते की, आचार संहितेपूर्वी या योजना बंद पाडू. आमची देण्याची वृत्ती आहे, आमचं सरकार लाडक्या बहिणींच्या मागे उभे राहणारे सरकार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. आम्ही ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे पैसे लाडक्या बहिणींच्या खात्यात एका क्लिकवर जमा केले आहेत. आमचं सरकार बहिणींच्या खात्यात हप्ते भरणारे सरकार आहे, हप्ते घेणारे सरकार नाही असा टोलाही शिंदे यांनी लगावला.

### खासदार सुप्रिया सुळे यांनी केली नाराजी व्यक्त

# हडपसर मतदारसंघात उमेदवारीवरुन वाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हडपसर :** विधानसभा निवडणुकीला काही दिवस शिल्लक राहिले आहेत. अद्यापही महायुती तसेच महाविकास आघाडीकडून उमेदवारांची घोषणा करण्यात आलेली नाही. परंतु काही मतदारसंघात उमेदवारीवरून मोठा पेच निर्माण झाला. अशातच ठाकरे गटाकडून हडपसर मतदारसंघात उमेदवार जाहीर केल्याने वाद सुरू झाला आहे.

यावर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिल्यानंतर





महाविकास आघाडीत मोठी धुसफूस सुरू झाल्याचे समजत आहे.

ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पुण्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघावर दावा करत माजी आमदार महादेव बाबर यांना उमेदवारी देखील जाहीर केली. महाविकास आघाडीमध्ये अद्याप जागावाटप पूर्णपणे ठरले नाही. त्यात हडपसर जागेचा पेच देखील सुटला नाही. मात्र, त्याआधीच सुषमा अंधारे यांनी उमेदवारी जाहीर केली. यावर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नाराजी व्यक्त केली असून, सुषमाताई त्या बैठकीत होत्या का? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विचारला आहे.

दरम्यान आता जर हडपसरबाबत सुप्रिया सुळे एवढ्या आग्रही असतील तर मग शिवसेना उबाठाला पुणे जिल्ह्यात फक्त एकच जागा देऊन बोळवण केली जाणार का ? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. हडपसर शिवाय वडगाव शेरी आणि खडकवासला मतदार संघासाठी देखील » पान ७ वर

### 'आप'चा व 'सप'चा स्वबळाचा नारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीर आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल मंगळवारी जाहीर झाले व हरयाणात काँग्रेसला अनपेक्षितपणे पराभवाला सामोरे जावे लागले. हरयाणामध्ये काँग्रेसचा अनुकूल वातावरण असताना सत्ता हातातून येता-येता निसटली.

जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्ससोबत काँग्रेसचे सरकार सत्तेत येणार असले तरी काँग्रेसला येथे दुहेरी आकडाही गाठता आलेला नाही. २०१४ च्या तुलनेत येथे काँग्रेसच्या जागा निम्म्यावर आल्या आहेत. त्यातच काँग्रेसला आणखी दोन धक्के बसले आहेत.

# जाहिरातीसाठी सोशल मिडियावर ९० कोटी खर्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सरकारी योजनांची माहिती महाराष्ट्रभर सोशल मीडियाद्वारे मिळावी यासाठी राज्य सरकार तब्बल ९० कोटी रुपये खर्च करणार आहे. त्यामुळे, राज्य सरकारकडून योजनांच्या केल्या जाणाऱ्या जाहिरातीच्या खर्चावर विरोधकांनी सडकून टीका केली आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने काढलेल्या या टेंडरची राज्याच्या राजकीय वर्तुळात आणि मंत्रालयात जोरदार चर्चा सुरू आहे.

आतापर्यंतच्या राज्याच्या इतिहासात सोशल मीडियावर



पहिल्यांदाच ९० कोटी रुपयांची खर्च केला जात असल्याची माहिती आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता तोंडावर असताना अवघ्या काही दिवसांसाठी सरकारी योजनांचा प्रसार आणि प्रचार सोशल मीडियाद्वारे करण्यासाठी सरकार नव्वद कोटी रुपये खर्च करत असल्याने अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही यावरुन महायुतीला टोला लगावला आहे.

# चाकणकरांचा सुळेंवर हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाट बलात्कार घटनास्थळाला मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र प्रवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी बोपदेव घाट परिसरात झालेल्या घटनास्थळी पाहणी केली, त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन त्यांनी पुण्यासह राज्यात घडत असलेल्या घटनांबाबत रोष व्यक्त केला आहे, यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी संबंधित घटना घडून पाच दिवस झाले, पुण्यात असूनही स्वतःच्या मतदारसंघात घडलेल्या घटनेला भेट द्यायला बरेच दिवस गेले असं म्हणत सुप्रिया सुळेंना टोला लगावला आहे.

मुळातच पोलिस पहिल्या दिवसापासून १२ टिम तयार करून युद्धपातळीवर तपास करीत आहेत. मग आपला हा देखावा कशासाठी? आपल्या माहितीसाठी, चंद्रपुरमध्ये कोरपना येथे १२ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणारा शिक्षक हा युवक काँग्रेसचा शहराध्यक्ष आहे, याविरोधात आंदोलन कधी करणार?

आपल्या सोशल मिडियाच्या प्रदेश सरचिटणीसवर महिलांचे अश्लील व्हिडीओ बनविणे, पाठवणे, अश्लाघ्य कमेंट करणे यासाठी चार सायबर गुन्हे दाखल आहेत. पोलीस कोठडीही घेऊन आलेल्या या आरोपीला आपण नियुक्तीपत्र देता, नक्की कशाचे समर्थन करता? असे म्हणत रूपाली चाकणकरांनी सुप्रिया सुळेंवर हल्लाबोल केला आहे.





> मंत्रालयात तडजोडी होत असल्याने गुन्हेगारांना वचक राहिलेला नाही. आठवड्यानंतरही बोपदेव घाट प्रकरणातील आरोपींना अटक झाली नाही. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी वाढत असून, गृहमंत्री फडणवीस जबाबदार नाहीत का? प्राप्तिकर विभाग, ईडी तसेच सीबीआयचा वापर विरोधकांच्या अटकेसाठी केला जातो. मग याच यंत्रणांचा वापर बोपदेव घाटातील बलात्कार प्रकरणातील आरोपींना शोधण्यासाठी का होत नाही? पोलिसांची, वर्दीची भीती गुन्हेगारांना का राहिलेली नाही?', असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला होता."
>
> — रूपाली चाकणकर

> आठवड्यानंतरही बोपदेव घाट प्रकरणातील आरोपींना अटक झाली नाही. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी वाढत असून, गृहमंत्री फडणवीस जबाबदार नाहीत का? प्राप्तिकर विभाग, ईडी तसेच सीबीआयचा वापर विरोधकांच्या अटकेसाठी केला जातो. मग याच यंत्रणांचा वापर बोपदेव घाटातील बलात्कार प्रकरणातील आरोपींना शोधण्यासाठी का होत नाही? पोलिसांची, वर्दीची भीती गुन्हेगारांना का राहिलेली नाही? — सुप्रिया सुळे

## बायोमायनिंग निविदा प्रकरणी आयुक्तांकडून चौकशीचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उरुळी देवाची, फुरसुंगी कचरा डेपोतील जैविक उत्खननाची (बायोमायनिंग) निविदा प्रकरणाची महापालिका अतिरिक्त आयुक्तांनी चौकशी करावी आणि या निविदेतील आर्थिक बाबींसंदर्भात मुख्य लेखा परिक्षकांनी अहवाल सादर करावा असे आदेश आदेश आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागातर्फे बायोमायनिंगची निविदा काढण्यात आली. या बायोनायनिंगच्या निविदा, यापूर्वी दिलेली बिले यासह सध्या अस्तित्वात असलेल्या कचऱ्यात माती किती कचरा किती याची तपासणी करावी यासह अन्य मागण्यांसाठी शहर काँग्रेसच्या व्यापारी सेलचे अध्यक्ष भरत सुराणा यांनी महापालिका भवनासमोर दोन दिवसांपासून उपोषण सुरु केले आहे. यावर महापालिका आयुक्तांच्या दालनात बैठक झाली. यावेळी सुराणा, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्याशी चर्चा झाली. त्यामध्ये आयुक्तांनी या प्रकरणाची अतिरिक्त आयुक्तांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात आयुक्त भोसले यांच्याशी साधण्याचा प्रयत्न केला, पण संपर्क होऊ शकला नाही.

> महापालिका आयुक्तांकडे झालेल्या बैठकीत त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांना आदेश दिले आहेत. या विषयातील सर्व माहितीही मला तातडीने द्यावी, यापूर्वी दिलेल्या बिलांची मुख्य लेखा परिक्षकांनी अहवाल सादर करावा असे आदेश आयुक्तांनी दिले. त्यामुळे उपोषण मागे घेतले आहे. योग्य पद्धतीने चौकशी न झाल्यास पुन्हा आंदोलन केले जाईल."
>
> — भरत सुराणा

## Selected

### माजी विद्यार्थ्यांकडून होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क वाटप



**खानापूर :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयातील गरजवंत, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माजी विद्यार्थी शशिकांत किवळे (उद्योजक), संतोष तोडकर (पोलिस हवालदार हवेली पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण)व संभाजी खिरीड (माजी सैनिक)यांनी भरून समाजापुढे आदर्श ठेवला. आमची महात्मा गांधी विद्यालयामुळेच जडणघडण झाली. याची जाणीव ठेवून खारीचा वाटा उचल्याचे समाधान वाटते असे असे शशिकांत किवळे व संतोष तोडकर म्हणाले. गरजवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क मिळवून देण्यासाठी जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव यांनी पाठपुरावा केला. माजी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क भरल्याबद्दल व शशिकांत जाधव यांनी पाठपुरावा केल्याबद्दल मुख्याध्यापक सुभाष देशमुख यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमात महिला पोलीस कॉन्स्टेबल सविता भवार यांनी निर्भया पथकाची माहिती दिली. कार्यक्रमास शशिकांत किवळे, संतोष तोडकर,अनिल लोहकरे, सुभाष देशमुख, नंदकुमार जावळकर, माजी उपसरपंच सचिन जावळकर, तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## अलिबाग लघुपट महोत्सवात 'अत्तर' दरवळला; रसिकांकडून स्वागत



**पुणे :** ५ व्या अलिबाग लघुपट महोत्सवात अत्तर या कलाकृतीची निवड झाली होती. या लघुपटाचे स्क्रीनिंग मोठ्या दिमाखात अलिबाग चित्रपट महोत्सवात झाले. उपस्थित रसिक प्रेक्षकांनी या कलाकृतीची आनंद घेतला आणि कलाकृती संपल्यानंतर टाळ्या आणि शिट्यांच्या जोशात अत्तर लघुपटाचे स्वागत केले. अत्तर मधील मुख्य भूमिका करणारी बालकलाकार मीरा शेडगे हिला उत्कृष्ट बालकलाकार म्हणून पुरस्कार मिळाला. तर बेस्ट इंडीयन डायरेक्टर म्हणून अत्तरचे दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांना पुरस्कार प्रसिद्ध चित्रपट लेखक अरविंद जगताप यांच्या हस्ते मिळाला. यावेळी चित्रपटाचे कलाकार पुरुषोत्तम बाबर, अभिनेता केतन पेंडसे तसेच संयोजक योगेश बारस्कर उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी इजिप्त येथील ब्रिटिश यूनिवर्सिटी इंटरनेशनल स्टूडेंट्स फिल्म फेस्टिवलम तसेच स्पेन येथील वीएनटूर एनवायर्नमेंटल फिल्म फेस्टिवलध्ये अत्तर लघुपटाची निवड करण्यात आली होती. गटारात काम करणाऱ्या वडिलांच्या आयुष्यात सुगंधाची दरवळ आणण्यासाठी धडपडणाऱ्या मुलीच्या संघर्षाची कहाणी 'अत्तर' मध्ये आहे. अत्तरमध्ये बालकलाकाराच्या प्रमुख भूमिकेत मीरा शेडगे, पुरुषोत्तम बाबर, अभिनेत्री रेवा बर्गे, विनय सोनवणे, रमेश साठे, सिराज कसबे असे कलाकार आहेत.

## राष्ट्रसंचार बेजबाबदारपणा रा

# आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली

### कारवाईला मुहूर्त कधी?

**पुणे :** शहरात सध्या सर्वत्र राजकीय पक्षांचे फ्लेक्स मोठ्या प्रमाणात लागले आहेत.शहरातील विविध भागांत लावण्यात आलेल्या बेकायदा जाहिरात फलकांवर तातडीने कारवाई करून ते काढून टाकण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. मात्र, आकाशचिन्ह विभागाने या आदेशाला धाब्यावर बसवून त्याला केराची टोपली दाखवली आहे. शहरातील बेकायदा फलक 'जैसे थे' असल्याचे चित्र कायम आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहराच्या सर्वच भागांत इच्छुक उमेदवारांनी बेकायदा जाहिरात फलक लावून मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण केले आहे. प्रामुख्याने महत्त्वाचे रस्ते आणि चौकांमध्ये तर बेकायदा जाहिरात फलकांची जणू स्पर्धाच रंगली आहे. या फलकांमुळे अनेक ठिकाणचे सिग्नल झाकले गेले. काही रस्त्यांवरील दिशादर्शक फलक झाकले आहेत, तर अनेक रस्त्यांवर फलक वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याचेचित्र आहे.

### दुर्लक्षपणाचा कळस

या अनधिकृत फ्लेक्स, जाहिरात फलकांच्या अनेक तक्रारी महापालिका प्रशासनाकडे आल्या आहेत. त्याची दखल घेत आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पालिकेच्या आकाशचिन्ह विभागासह अतिक्रमण विभागाला चौकाचौकांमध्ये लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांवर कारवाई करून ते काढून टाका, असे आदेश दिले आहेत. मात्र, आकाशचिन्ह विभागाने या आदेशाकडेही दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. अद्यापही अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाईला सुरुवात झालेली नाही. आता नक्की या कारवाईला कधी मुहूर्त मिळणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



### प्रख्यात वक्ते सरश्री यांचे मार्गदर्शन

# ध्यानामुळे जीवनात आमूलाग्र बदल होतो



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकजण तांत्रिक साधनात स्वतःचा शोध मोबाईल, इंटरनेट, संगणक येथे घेत बसला आहे. याच तांत्रिक साधनात तो अडकल्याने प्रत्येकजण स्वतःला विसरून गेला आहे. स्वतःचा शोध हा स्वतःमध्ये सापडणार आहे. त्यासाठी ध्यान करने अत्यंत गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रख्यात वक्ते आणि लेखक सरश्री यांनी तेजज्ञान फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या ध्यान के गुलिस्तान से सफल इन्सान कैसे बने 'या कार्यक्रमात केले. हा कार्यक्रम सिंहगड रोड येथील मनन आश्रम येथे पार पडला.

सरश्रींनी ध्यानाचे महत्व अधोरेखित करताना पुढे म्हणाले की, महान शास्त्रज्ञ थॉमस एडिसनने एकाग्रतेने कार्य केल्याने त्यांना विजेचा शोध लावता आला. त्याप्रमाणे प्रत्येकाने आंतरिक मनापासून ध्यान करायला शिकले पाहिजे. ध्यानाच्या अंतरंगात डुबकी मारून आनंद घेता येतो तो आनंद स्थायी स्वरुपात असतो. सर्वसामान्यपणे माणूस डाव्या मेंदूचा अधिक उपयोग करतो परंतु ध्यानामुळे डाव्या आणि उजव्या मेंदूचा समतोल साधून रचनात्मक कार्य करता येते. आणि यामुळे आपल्या कार्यात सुंदरता आणि गुणवत्ता येते.

सदरील कार्यक्रमात ऑनलाईन व ऑफलाईन प्रणालीद्वारे जवळपास दहा हजार पेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते.

> प्रत्येक व्यक्तीची त्याच्या कामावरून काम करणाऱ्याची ओळख होते. त्यामुळे गुणवत्तापूर्ण काम महत्वाचे आहे. ध्यानामुळे माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल होतो. त्यामुळे तो व्यक्तिगत लोककल्याणाचे कार्य करू शकतो. ती आज काळाची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकाने आजकालच्या धकाधकीच्या जीवनात रोज ध्यान करने अत्यंत गरजेचे आहे."
>
> — सरश्री, प्रख्यात वक्ते

## फाईलने चेहरा लपविणाऱ्या 'त्या' नेत्याचे नाव आले समोर



**पुणे :** नुकतेच भाजपच्या दोन बड्या नेत्यांनी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. शिवाय आगामी काळात आणखी काही नेते आपल्या पक्षात प्रवेश करणार असल्याचे संकेतही शरद पवारांनी दिले आहेत. अशातच आता माजी मंत्री राजेंद्र शिंगणे हे देखील अजित पवारांची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वाटेवर असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.या चर्चा सुरू होण्याला कारणीभूत ठरला आहे एक व्हायरल व्हिडिओ. एका नेत्याने मंगळवारी शरद पवारांची त्यांच्या पुण्यातील मोदी बाग या निवास्थानी भेट घेतली. त्यानंतर ते सुप्रिया सुळेंच्या गाडीतून बाहेर जात असताना या नेत्याने माध्यमांच्या कॅमेऱ्यापासून आपला चेहरा फाईलने लपवला होता. तर या व्हिडिओतील नेता अजित पवार गटाचे नेते राजेंद्र शिंगेणे असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

इच्छुकांनी देखील आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी धावपळ सुरू केली आहे. सध्या ज्या पक्षात आहे तिथे उमेदवारी नाकारल्यास ते दुसऱ्या पक्षात जाण्यासाठीही फिल्डिंग लावत आहेत.

### भाजपमध्येच अंतर्गत वाद रंगणार

# कसब्यातून धीरज घाटेंच्या उमेदवारीची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभेच्या जागा वाटपावरुन घटक पक्षांमध्ये वादही रंगत असल्याचे दिसत आहे. अशातच आता पुण्यातील कसबा विधानसभेच्या जागेवरुन भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. कसब्यातून भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनाच उमेदवारी मिळावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.

पुण्यातील कसबा विधानसभेच्या जागेसाठी भाजप मध्ये चढाओढ पाहायला मिळत आहे. कसबा विधानसभा मतदार संघातून हेमंत रासने उत्सुक आहेत. अशातच आता भाजपचे शहर अध्यक्ष धीरज घाटे यांच्यासाठी भाजपचे काही पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. काही पदाधिकाऱ्यांनी कसब्यातून धीरज घाटे यांनाच उमेदवारी द्या, अशी मागणी थेट प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

नुकतीच कसबा विधानसभेच्या जागेसाठी पुण्यातील भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी मुंबईमध्ये पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी धीरज घाटेंच्या उमेदवारीची मागणी करण्यात आली. पोट निवडणुकीत हातातून निसटलेला पारंपरिक मतदारसंघ भाजपा पुन्हा खेचून आणू शकतो, असा विश्वास या कार्यकर्त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर बोलून दाखवला. त्यामुळे एकीकडे विधानसभेसाठी हेमंत रासने इच्छुक असतानाच धीरज घाटेंनीही फिल्डिंग लावल्याने भाजपमध्येच अंतर्गत वाद रंगण्याची चिन्हे आहेत.

**नाराजीमुळे मैत्रीपूर्ण लढत**

● रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजप नमते घेणार असून दोन्ही जिल्ह्यात भाजप फक्त १ जागा लढवण्याची शक्यता आहे. रत्नागिरी जिल्ह्यात शिंदेंची शिवसेना चार, तर चिपळूणची जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट लढवणार असल्याचे सांगण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीत यश मिळूनही भाजप एक पाऊल मागे जात असल्याने भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधून नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे. नाराजीमुळे मैत्रीपूर्ण लढतींचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## गॅस कनेक्शन बंद करण्याच्या बहाण्याने पावणेदहा लाखांची फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमएनजीएल गॅस कनेक्शन बंद करण्याच्या बहाण्याने एका महिलेची पावणेदहा लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी एका महिलेने (वय ५८, रा. गणेशनगर, धायरी) पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी फिर्यादी महिलेला मोबाईलवर तुम्ही गॅसचे बिल न भरल्यास कनेक्शन बंद करू, असा संदेश पाठविला. त्यावर महिलेने त्या मोबाईल क्रमांकावर एमएनजीएलच्या कथित अधिकाऱ्याशी संपर्क साधला. त्यावेळी त्याने महिलेला तुम्हाला व्हॉटसअॅपवर पाठविलेली एपीके अॅप डाऊनलोड करा, असे सांगितले.

महिलेने ते अॅप डाऊनलोड केल्यानंतर डेबिट कार्डची माहिती भरण्यास सांगितली. त्यानंतर ओटीपी विचारून महिलेच्या बँक खात्यातून १७ वेळेस बँक व्यवहार करून नऊ लाख ८० हजार रुपये परस्पर काढून घेतले.



पुणे : ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी चतुर्श्रुंगी मंदिरात जाऊन श्री देवीचे दर्शन घेतले.

### दिवाळीपूर्वी ८.३३ टक्के बोनस

# पालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी होणार गोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर पालिकेच्या १८ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची दिवाळी आणखी गोड होणार आहे. त्यांना दिवाळीपूर्वी ८.३३ टक्के बोनस त्याचप्रमाणे २३ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा होणार आहे. यासंदर्भात वित्त व लेखा विभागाने परिपत्रक काढले आहे. त्यामुळे पुणे महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पुणे महापालिकेकडून दरवर्षी महापालिका अधिकारी, कर्मचारी, महापालिकेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान आणि बोनस देण्याचा निर्णय दिला जातो. यासाठी अर्थसंकल्पात सुमारे १२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महापालिकेत नगरसेवक असताना यासाठी स्थायी समितीमध्ये प्रस्ताव मंजूर केला जातो. तसेच हा प्रस्ताव मंजूर करून घेतल्यानंतर याचे श्रेय घेण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चढाओढ लागत होती. पण आता मनपा प्रशासक असल्याने ही प्रक्रिया सहजपूर्ण होत आहे.

लेखा व वित्त विभागाने काढलेल्या परिपत्रकात १८ ऑक्टोबरपर्यंत सर्व बिले तपासून घेण्याचे आदेश विभाग प्रमुखांना देण्यात आले असून दिवाळीपूर्वी ही रक्कम बँक खात्यात जमा केली जाणार आहे. २०२३-२४ च्या मूळ वेतन, महागाई भत्ता यावर ८.३३ टक्के आणि २३ हजार रुपये सानुग्रह अनुदान उपस्थितीच्या प्रमाणात दिले जाणार आहे.

**संघटना निधीची कपात**

● गेल्या वर्षभरात संबंधित सेवकांची प्रत्यक्ष हजेरी किमान १८० दिवस असणे आवश्यक आहे अशांना ही रक्कम दिली जाणार आहे. सानुग्रह अनुदानाबाबतच्या अन्य अटी आणि शर्ती तसेच सेवापुस्तक आणि वेतन बिलावर ठेवावयाचे दाखले याबाबतचा तपशील दिलेला आहे. त्यानुसार तजवीज करावी. तसेच संघटना निधीची कपात करण्यात येणार आहे, असे पुणे महानगर पालिकेच्या परिपत्रकात नमूद केले आहे.



#रा

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला उत्तम प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मासिक वीजबिल शून्यवत करण्यासाठी सुरु असलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत पश्चिम महाराष्ट्रात आतापर्यंत तब्बल ४१ हजार ११५ घरगुती ग्राहकांनी सहभाग घेतला असून त्यांचे मासिक वीजबिल शून्य होणार आहे. सद्यस्थितीत ९ हजार ८०८ घरगुती ग्राहकांकडे छतावरील ३९.२ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने त्यांचे वीजबिल देखील शून्यवत झाले आहे. घराच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिटपर्यंत वीज मोफत मिळविण्याची संधी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत आहे.

सौर प्रकल्प उभारण्यासाठी विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे. तसेच महावितरणकडून १० किलोवॅटपर्यंतच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे.

### महावितरणकडून स्पष्टीकरण

- मंजूर अर्जांमध्ये (कंसात- कार्यान्वित प्रकल्प) पुणे जिल्हा- १८ हजार २४५ (३७९८), सातारा जिल्हा- ४ हजार २५२ (९७३), सोलापूर जिल्हा- ६ हजार ३४१ (१६०३), कोल्हापूर जिल्हा- ७ हजार ३२८ (२४७५) आणि सांगली जिल्ह्यात ४ हजार ९५९ अर्ज मंजूर झाले असून ९५९ सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. सद्यस्थितीत पश्चिम महाराष्ट्रामध्ये छतावरील आणखी ३६८२ सौर प्रकल्पांचे काम वेगाने सुरु आहे.

## कोथरूडमध्ये महा कन्यापूजन कार्यक्रमाचे आयोजन

# पाच हजारहून अधिक मुलींचे पूजन

### नामदार चंद्रकांतदादा पाटील यांचा पुढाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** नवरात्रोत्सव काळात कन्यापूजनाचे वेगळे महत्त्व असून, नामदार चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकारातून कोथरुडमध्ये महा कन्या पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या अद्भूत सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे आवाहन यानिमित्ताने करण्यात नामदार पाटील यांनी केले आहे.



शक्ती, बुद्धी आणि धनधान्य देणाऱ्या मातांची रूपे वेगवेगळी आहेत. लहान मुलींमध्ये ही रूपे दिसतात. कन्या हे देवीचे स्वरूप असते. तिच्या जन्माने प्रत्येक कुटुंबात सुख, समृद्धी आणि भरभराट होते. नवरात्रोत्सव काळात तिची पूजा म्हणजे साक्षात, आदिमायेची पूजा करणे आहे. मागील पाच वर्षांत कोथरुड मधील मुलींचे आयुष्य सुरक्षित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. सुकन्या समृद्धी योजनेच्या माध्यमातून हजारो मुलींचे पालकत्व स्वीकारले आहे. त्यासोबतच मानसी सारख्या उपक्रमातून वस्ती भागातील मुलींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे कोथरूड मध्ये आयोजित महा कन्यापूजन सोहळ्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन नामदार पाटील यांनी केले."



**» नवरात्रोत्सव**

धार्मिक श्रद्धांनुसार, नवरात्रोत्सव काळातील नवमी तिथीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी दुर्गा देवीच्या नऊ रूपांची मुलींच्या रूपात पूजा केली जाते. या उपासनेने दुर्गा मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो आणि भक्तांच्या जीवनात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे. यासोबतच कन्यापूजना शिवाय नवरात्रीची उपासना यशस्वी होऊ शकत नाही, अशी देखील धारणा आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आणि उत्सवाच्या निमित्ताने उपासनेचे फळ सर्वांना लाभावे यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकारातून कोथरुड मध्ये महा कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नामदार चंद्रकांतदादा पाटील हे देखील सात मुलींचे पूजन करणार आहेत. मंत्रोच्चाराच्या घोषात, आध्यात्मिक वातावरणात दिनांक ११ ऑक्टोबर रोजी कोथरुड मधील शुभारंभ लॉन्स येथे सायंकाळी ४.३० ते ७ वेळेत हा नयनरम्य सोहळा संपन्न होणार आहे.

# शिक्षक भरतीमध्ये स्थानिक शिक्षकांना प्राधान्य द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कमी पटसंख्येच्या शाळांतील शिक्षकांच्या दोनपैकी एका जागेवर कंत्राटी पद्धतीने डी.एड., बी.एड. पात्रताधारक उमेदवारांची निवड करण्याचा निर्णय २३ सप्टेंबर रोजी शालेय शिक्षण विभागाने घेतला. मात्र, उमेदवारांची निवड प्रक्रिया करण्यासाठी निवडीचे कोणते निकष विचारात घ्यावेत, याबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून विचारणा करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर या कंत्राटी नियुक्तीसंदर्भात शिक्षण आयुक्तालयाने अतिरिक्त सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

राज्यातील दहा आणि त्यापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांतील शिक्षकांच्या दोनपैकी एका जागेवर कंत्राटी पद्धतीने डी.एड., बी.एड. पात्रताधारक उमेदवारांची निवड प्रक्रियेबाबत सविस्तर सूचना शिक्षण आयुक्तालयाने दिल्या आहेत. त्यानुसार या निवड प्रक्रियेत ग्रामपंचायत हद्दीतील स्थानिक रहिवासी असावा, स्थानिक उमेदवारांचे एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास अधिक गुण असलेल्या उमेदवाराचा विचार करावा, असे स्पष्ट केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या संचमान्यतेनुसार दहा आणि त्यापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेत दोन शिक्षक कार्यरत असल्यास त्यापैकी एका शिक्षकाचे प्रचलित कार्यपद्धतीने समायोजन झाल्यावर प्रत्यक्ष पद रिक्त झाल्यानंतरच संबंधित शाळेत दुसरा शिक्षक कंत्राटी पद्धतीने नियुक्त करावा. स्थानिक उमेदवारांचे एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास डी.एड. (पहिली ते पाचवीसाठी), बी.एड. (सहावी ते आठवीसाठी) यात अधिक गुण असणाऱ्या उमेदवाराची निवड करावी. समान गुण असल्यास अधिक शैक्षणिक, व्यावसायिक पात्रताधारक उमेदवाराला प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट करण्यात आले.

## अवतीभवती
CITY UPDATE

### गेरा बिल्डर्सच्या मदतीने पार्टनरनेच केली करोडो रुपयांची फसवणूक

**पुणे :** कंपनीतील पार्टनरनेच सॉफ्टवेअर, सोर्स कोड, यंत्रसामुग्री आणि स्टाफची चोरी करत वेगळी कंपनी स्थापन केली. ज्या बिल्डरला हे सॉफ्टवेअर पुरवत होतो, त्यानेच चोरी करणाऱ्या सुदर्शन मित्रा व त्याची पत्नी प्रियांका बर्मन याना पाठीशी घालून त्या कंपनीत भागीदारी केली. गेरा बिल्डर्सच्या मदतीने सुदर्शन मित्राने माझी करोडो रुपयांची फसवणूक केली असून, मला आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकरणात गेरा यांचे नाव आल्याने मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत, असा आरोप होम ऍटोमेशन सॉफ्टवेअरचे मूळ मालक गोपाल अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी अग्रवाल यांचे वकील ऍड. राजस पिंगळे, मूकनायिका फाउंडेशन पुणे जिल्हा अध्यक्ष संदिप गायकवाड आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळाराम गायकवाड हे उपस्थित होते. गोपाल अग्रवाल म्हणाले, "बांधकाम क्षेत्रात लागणाऱ्या होम ऑटोमेशन सॉफ्टवेअरचे उत्पादन करणारी कंपनी २०१५ मध्ये आम्ही सुरु केली. त्यामध्ये मित्रा हे संचालक व भागीदार होते. १० ते ११ सॉफ्टवेअर अभियंते यावर काम करत होते. गेरा डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे रोहित गेरा यांच्याशी माझी भेट झाल्यानंतर त्यांच्या प्रकल्पात ४५० फ्लॅट्समध्ये हे सॉफ्टवेअर बसविण्याची ऑर्डर मला मिळाली. परीक्षणासाठी गेरा यांनी त्यांच्या घरी सप्टेंबर २०१७ मध्ये हे सॉफ्टवेअर बसवले. तेव्हा मित्रा यांचा थेट गेरा यांच्याशी संपर्क आला. महिनाभरातच मित्रा माझी कंपनी सोडून गेरा यांच्यासोबत सामील झाला. कंपनी सोडताना मित्रा याने कोणतीही कल्पना दिली नाही. त्याच महिन्यात मित्रा आणि गेरा यांनी 'होमवन टेक्नॉलॉजी एलएलपी' नावाने कंपनी सुरू केली. यात रोहित गेरा, प्रीतमदास गेरा, प्रियांका बर्मा आणि सुदर्शन मित्रा यांची भागीदारी होती."

## ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाचा


# अजित पवार यांना देशभरात बिनशर्त पाठिंबा जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला देशभरात बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. सलमानी समाजासह बंजारा समाज, कामगार वर्ग, अल्पसंख्याक समाज राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी उभे राहत असल्याने पक्ष अधिक सक्षम होत असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व्यापक होत आहे, असे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांनी बुधवारी सांगितले.



ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाचे संमेलन घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात आयोजिले होते. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. जरीफ अहमद सलमानी, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. आफताब आलम, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रियाज आलम सलमानी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव हसमत अली सलमानी, पुणे शहराध्यक्ष समीर चांदेरे, राकेश कामठे, परबजित सिंग, जावेद इनामदार, मोहसीन शेख आदी उपस्थित होते.



"सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन विकासाच्या वाटेवर चालणार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अजितदादांचे नेतृत्व आहे. दलित, मुस्लिम, आदिवासी, वंचित अशा अल्पसंख्याक समुदायांना अजित पवार यांनी नेहमीच मानसन्मान दिला आहे. येत्या निवडणुकीतही अल्पसंख्याकांना १० टक्के जागा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. सलमानी समाजाच्या सर्व अडचणी सोडवण्यावर राष्ट्रवादी काँग्रेस येत्या काळात भर देईल."
— दीपक मानकर

धीरज शर्मा म्हणाले, "विकासाच्या मुद्यांवर अजितदादा महायुतीसोबत गेलेले आहेत. महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसह आणलेले इतर अनेक उपक्रम महाराष्ट्रातील जनतेत लोकप्रियता मिळवत आहेत. त्यामुळे सध्या जे वातावरण निर्माण केले जात आहे, त्याचाच कोणताही फटका महायुतीला बसणार नाही. हरियाणामध्येही अशीच वातावरण निर्मिती केली गेली. मात्र, तिथे भाजपने बहुमत मिळवले. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे."

### पुणे विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा मार्ग लवकरच मोकळा

**पुणे :** पुण्याहून आंतरराष्ट्रीय उड्डाणांना चालना देण्यासाठी कोड 'ई' विमान चालवता यावीत, या दृष्टीने काही तांत्रिक बाबी पूर्ण करायच्या असल्याने नवी दिल्ली येथे केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयात उच्चस्तरीय तांत्रिक बैठक पार पडली.या बैठकीत राज्य सरकारकडून भूसंपादन, संरक्षण मंत्रालयाकडून जमिनीचे हस्तांतरण, धावपट्टीची लांबी, नवीन टर्मिनल इमारत यासोबत इतरही विषयांवर चर्चा करण्यात आली. पुणे विमानतळावरील धावपट्टीचा विस्तार आणि इतर सुविधांच्या बांधकामासंदर्भातचा मार्ग आता सुखकर झाला. धावपट्टी विस्तारिकरणासाठीचा ऑबस्टॅकल लिमिटेशन सर्वेक्षण (ओएलएस) अहवाल सकारात्मक आल्याने, काही तांत्रिक बाबी पूर्ण केल्यानंतर पुणे विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा मार्ग लवकरच मोकळा होणार आहे, अशी माहिती नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. या प्रकल्पाशी संबंधित इतर सर्वेक्षण करून संरक्षण मंत्रालय आणि राज्य सरकार यांच्याशी सहकार्य आणि समन्वय ठेवण्याच्या सूचना भारतीय विमानतळ प्राधिकरणाला दिल्या. यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिव वुम्लानमंग वुलनाम, संरक्षण मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव दीप्ती मोहिल चावला, विमानतळ प्राधिकरणाच्या अध्यक्षा एम. सुरेश, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, ग्रुप कॅप्टन मनोज राणा, एअर मार्शल वाय. के. दीक्षित, पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके उपस्थित होते.

### सिंहगड रस्ता परिसरात बांधकाम व्यावसायिकाची आत्महत्या

**धायरी :** गृहनिर्मिती प्रकल्पातील आर्थिक वादातून बांधकाम व्यावसायिकाने आत्महत्या केल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील धायरी भागात घडली. बांधकाम व्यावसायिकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भागीदारासह त्याच्या मुलांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. किशोर मनोहर बेट्टीगिरी (वय ५२, रा. पद्मनाभ बंगला, रायकरनगर, धायरी) असे आत्महत्या केलेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. बेट्टीगिरी यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन भागीदार सुरेंद्र बाबुराव लायगुडे, संग्राम सुरेंद्र लायगुडे, सागर सुरेंद्र लायगुडे (तिघे रा. धायरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत बेट्टीगिरी यांची पत्नी सविता (वय ४८) यांनी सिंहगड रस्ता फिर्याद दिली आहे. बेट्टीगिरी कुटुंबीय मूळचे कर्नाटकातील आहे. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, आई असा परिवार आहे. गेल्या काही वर्षांपासून ते धायरी भागात स्थायिक झाले आहे, अशी माहिती तपास अधिकारी उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी दिली.

## सणासुदीत खासगी बस गाड्यांच्या भाड्यावर नियंत्रण ठेवा; मोहन जोशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळीच्या सुमारास परगावी प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसगाड्यांचे भाडे नियंत्रित ठेवले जावे, याकरिता ठोस उपाययोजना करावी अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या (आरटीओ) बैठकीत आज बुधवारी केली. या आणि अन्य मागण्यांसाठी आरटीओ अधिकारी अर्चना गायकवाड आणि अधिकाऱ्यांसमवेत मोहन जोशी यांची बैठक झाली. यावेळी ड्रायव्हिंग स्कूल क्लासचे १०० प्रतिनिधी तसेच काँग्रेसचे चेतन आगरवाल, सुरेश कांबळे,आदी उपस्थित होते.दिवाळी सणामुळे परगावी जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी असते.त्याचा फायदा उठविण्यासाठी खासगी बस गाड्यांचे भाडे अवाच्या सव्वा आकारले जाते, अशा तक्रारी आहेत. आरटीओने आतापासून उपाय योजना आखून भाडे दर नियंत्रित आणि निश्चित ठेवावेत,दरपत्रक वर्तमान पत्रात जाहीर करावे,ॲप तयार करावे, त्याद्वारे प्रवाशांशी संपर्क ठेवावा , अशा मागण्या मोहन जोशी यांनी केल्या.

## पुण्यात झिका पुन्हा वाढतोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात झिकाच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच आहे. एकूण रुग्णांची संख्या १०३ वर पोहोचली आहे. यात गर्भवतींचे प्रमाण अधिक आहे. आतापर्यंत झिकाच्या पाच रुग्णांचा मृत्यू झाला असून, तो सहव्याधींमुळे झाल्याचे समोर आले. शहरात झिकाचे तीन नवे रुग्ण आढळून आले. हे रुग्ण एरंडवणे क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील आहेत. त्यात १९ वर्षीय स्त्री, ६९ वर्षीय पुरूष आणि ५९ वर्षीय पुरूष अशा तिघांचा समावेश आहे.

# हजारो अग्रवाल बंधू-भगिनींच्या उपस्थितित 'इंद्रधनु' साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**येरवडा :** लोक शाहिर अण्णाभाऊ साठे संस्कृतिक भवनात अग्रवाल समाज फेडरेशनच्या वतीने अग्रसेन जयंतीचा इंद्रधनु कार्यक्रम हजारों अग्रवाल बंधु भगिनींच्या उपस्थितित साजरा झाला.

कार्यक्रमात दहावी आणि बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृती चिन्ह देऊन गौरवान्वित करण्यात आले. अग्रवाल समाज फेडरेशन अध्यक्ष कृष्णकुमार गोयल सह अखिल भारतीय अग्रवाल संमेलन महाराष्ट्रराज्य अध्यक्ष उमेश खेतान व अभिमान चित्रपटाचे निर्माता पवन जैन, मुंबई अग्रवाल समाज अध्यक्ष दिनेश अग्रवाल फेडरेशन कार्यकारिणी सदस्य आणि अग्रवाल समाज विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.



कार्यक्रमात कृष्णकुमार गोयल म्हणाले, विद्यार्थी हे भारत देशाचे भविष्य आहेत. विद्यार्जनचा उपयोग समाजहित आणि राष्ट्र हितासाठी करावा. अग्रवाल समाज फेडरेशनच्या वतीने पुण्यात लवकरच अग्रवाल समाजासाठी भूमी संपादित करुन वास्तु भवन साकारण्यात येईल.

## RS NEWS DIGEST

**पुरस्कार**

### मराठवाडा सेवक प्रतिष्ठानतर्फे राज्यस्तरीय मराठवाडा रत्न

**पुणे :** सातवाहन ते यादव घराणे असा दीर्घ काळ मराठवाडा संपन्न होता. मात्र, येथील माणसांची मागे राहण्याची वृत्ती नडली. ही वृत्ती बदलून विजिगिषु वृत्तीने संघर्ष करत मराठवाड्याला पुन्हा ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्याचे आव्हान स्वीकारा, असे आवाहन डेक्कन अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती, ज्येष्ठ विचारवंत आणि मूर्ती शास्त्राचे अभ्यासक, संशोधक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी केले. मराठवाडा सेवक प्रतिष्ठानतर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त राज्यस्तरीय 'मराठवाडा रत्न' पुरस्कार वितरण सोहळा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभात डॉ. देगलूरकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.





**शारदोत्सव**

### वीणाधारिणी श्री शारदा मातेच्या दर्शनाने दिव्यत्वाची अनुभूती

**पुणे :** जीएसबी संयुक्त कोंकणी सभेतर्फे पुण्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या शारदोत्सवाला मंगळवारी (दि. ८) सायंकाळी मंगलमय आणि भक्तीपूर्ण वातावरण सुरुवात झाली. पुरोहितांनी केलेली दुर्गास्तुती, शंखनाद, मंगलवाद्यांचा गजर अन् समईच्या तेजाळलेल्या ज्योतींच्या साक्षीने भाविकांनी वीणाधारिणी श्री शारदा मातेचे दिव्य दर्शन घेतले. शारादोत्सव मजेंटा लॉन्स, डी. पी. रोड, राजाराम पुलाजवळ, कर्वेनगर येथे दि. ८ ते दि. १२ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. पारंपरिक पोषाख परिधान करून आलेल्या असंख्य बंधू-भगिनींनी शारदा मातेच्या तेज:पुंज रूपाचे भक्तीभावाने दर्शन घेतले.

### चुकीची माहिती पसरवणाऱ्या खाजगी डॉक्टरांविरुद्ध आता पालिकेकडून होणार कारवाई

**पुणे :** आता शहरात एखादा साथरोग दाखल झाल्याचे परस्पर जाहीर करणाऱ्या खासगी डॉक्टरांचे प्रमाणही वाढले आहे. या डॉक्टरांकडून रुग्णाला संबंधित आजार झाल्याचे जाहीर केले जाते. मात्र तपासणीत हा आजारच आढळून येत नसल्याची बाब उघडकीस आली आहे. यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाने अशा डॉक्टरांवर कारवाईचे पाऊल उचलले आहे.

शहरात पावसाळ्यामुळे साथरोगांचा उद्रेक झाला आहे. याचवेळी वेस्ट नाईल तापाचा संशयित रुग्ण आढळल्याचे एका खासगी डॉक्टरने परस्पर जाहीर केले. याचबरोबर गेल्या पाच वर्षांत पहिल्यांदाच या रोगाचा रुग्ण आढळल्याचे सांगितले. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. महापालिकेच्या आरोग्य विभागाने तातडीने या रुग्णाचे रक्त नमुने घेऊन ते तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठविले. या तपासणीत रुग्णाला हा संसर्ग झाला नसल्याचे निदान झाले. त्यामुळे या डॉक्टरकडून रुग्णाचे चुकीचे निदान करण्यात आल्याचे उघडकीस आले.

वेस्ट नाईल ताप हा प्रामुख्याने उत्तर अमेरिका खंडात आढळून येतो. तेथून प्रवास करून भारतात आलेल्या रुग्णांमध्ये या तापाचा संसर्ग आढळून येतो. मात्र, खासगी डॉक्टरने या रोगाचा रुग्ण आढळल्याचे परस्पर जाहीर केल्याने विनाकारण रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. याच डॉक्टरने झिका रुग्ण आढळून आल्याची माहिती महापालिकेला उशिरा कळविली होती. यामुळे महापालिकेने अखेर या डॉक्टरवर कारवाईचे पाऊल उचलले आहे. त्याला नोटीस बजाविण्यात आली आहे, अशी माहिती महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिली.

शहरात साथरोगांमुळे तापाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. काही रुग्णांच्या शरीरावर तापामुळे पुरळ येतात. अशा रुग्णांना काही खासगी डॉक्टरांकडून मंकीपॉक्स झाल्याचे सांगितले जात होते. यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

"एखाद्या साथरोगाचा संशयित रुग्ण आढळल्यास खासगी डॉक्टरांनी याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाला देणे बंधनकारक आहे. त्यांनी परस्पर साथरोगांची माहिती जाहीर करणे चुकीचे आहे. याचबरोबर चुकीची माहिती पसरविणे योग्य नाही. यामुळे अशा डॉक्टरांवर कारवाईचे पाऊल उचलण्यात आले आहे." — डॉ. राजेश दिघे, सहायक आरोग्य अधिकारी, पुणे महापालिका

**व्याख्यान**

### वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना विमा क्षेत्रात संधीची दालने : डॉ. माळी

**पुणे :** वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यासाठी विमा क्षेत्रात अगणित संधी उपलब्ध असलयाचे प्रतिपादन नॅशनल इन्शुरन्स ॲकॅडमीचे प्राचार्य डॉ. संजय माळी यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डी. एस. सावकार अध्यासन व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विमा व्यवसायातील संधी या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी विमा व्यवसायातील संधी या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. या प्रसंगी डी. एस. सावकार अध्यासन प्रमुख डॉ. अशोक कांबळे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी श्यामला, विखे पाटील अध्यासन प्रमुख प्रा. डॉ. अनिल करंजकर उपस्थित होते.

२०४७ सालापर्यंत भारतातील संपूर्ण लोकसंख्येचा विमा उतरविण्याचे भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने निश्चित केले आहे. त्यामुळे अर्थातच विमा व्यवसायाची वाढ होऊन रोजगाराच्या अगणित संधी उपलब्ध होणार असल्याचे डॉ. माळी यांनी पुढे बोलतांना सांगितले. विमा व्यवसायात विमा संसाधन व्यवस्थापक, जाहिरात, विमा दाव्यांची पुर्तता, विमा संख्याशास्त्रज्ञ, सेवा व्यवस्थापक, सायबर विमा, विक्री व विपणन अशा अनेक क्षेत्रात संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कोंडी फुटणार कशी?

मागच्या दहा वर्षांच्या खंडानंतर प्रथमच भारतीय परराष्ट्रमंत्री शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने पाकिस्तान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने भारत-पाक दरम्यान द्विपक्षीय चर्चा व्हावी व भारत-पाक दरम्यान खुष्कीच्या मार्गाने का असेना पण व्यापार सुरू व्हावा, जेणेकरून दिवाळखोरीत पोहोचलेल्या पाकिस्तानला थोडाफार आर्थिक दिलासा मिळेल अशी पाकिस्तानमधील तज्ज्ञ व विचारवंतांची अपेक्षा आहे. मात्र, भारतीय परराष्ट्रमंत्र्यांनी अशा द्विपक्षीय चर्चेची शक्यता फेटाळून लावली आहे. त्यावरून सध्या दोन परस्पर भिन्न मतप्रवाह पहायला मिळतात. पहिला मतप्रवाह भारताची भूमिका योग्यच कारण दहशतवाद पोसून भारताशी सतत छुपे युद्ध खेळणाऱ्या पाकिस्तानचा खेळ आता संपवायलाच हवा, असा आहे व तो काही प्रमाणात योग्यही आहे. पाकिस्तान कंगाल झाला असला तरी तेथील राज्यकर्त्यांनी भारतद्वेष व त्यासाठी दहशतवादाला आश्रय व प्रोत्साहन हा अजेंडा सोडलेला नाहीच. त्यामुळेच पठाणकोट दहशतवादी हल्ल्यानंतर जोवर दहशतवादाला आश्रय व प्रोत्साहन देणे थांबत नाही तोवर पाकशी कुठलीच चर्चा नाही, अशी कठोर भूमिका भारताने घेतली व ती देशहिताच्या दृष्टीने योग्यच होती. आजही भारताची ही भूमिका कायम आहे. भारताच्या या कठोर भूमिकेने आंतरराष्ट्रीय पातळीवर व आर्थिक पातळीवर पाकिस्तानची पुरती जिरली आहे व भारताने पाकला त्याची जागा दाखवून दिली आहे. त्यामुळे भारताच्या या भूमिकेचे राष्ट्रप्रेमी नागरिकांकडून स्वागत होणे साहजिकच! मात्र, त्याचबरोबर जर भारताच्या सर्वच बाजूंचा शेजार अस्वस्थ, अशांत असेल तर त्याचा फटका सर्वांत जास्त भारतालाच सहन करावा लागणार असे दुसरा मतप्रवाह सांगतो व हे वास्तव आहे. त्यामुळे शेजार शांत करण्यासाठी त्या देशाशी चर्चेची दारे कायमची बंद करून चालणार नाही. त्याचा फायदा भारताच्या वाईटावर टपलेले चीनसारखे शत्रूराष्ट्र नक्कीच उठवणार व भारताची डोकेदुखी आणखी वाढवणार हे वास्तव लक्षात घ्यायला हवेच! बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या देशांबाबत आपण हा अनुभव घेतच आहोत. अर्थात या देशांची व पाकिस्तानची तुलना होऊच शकत नाही हे मान्यच! भारताने अनेकवेळा संबंध सुधारण्याचे प्रयत्न करूनही प्रत्येकवेळी पाकिस्तानने भारताशी दगाफटका केला आहे, हाच अनुभव! मात्र, हाच अनुभव घेणाऱ्या पाकिस्तानी जनतेला आजच्या आपल्या कंगाल परिस्थितीस हेच धोरण कारणीभूत असल्याचे कळून चुकल्याने पाकिस्तानी जनतेतून त्यांच्या राज्यकर्त्यांवर कधी नव्हे तो भारतासोबतचे संबंध सुधारण्यासाठीचा दबाव वाढला आहे. त्यामुळे पाकिस्तानी राज्यकर्त्यांची व त्यांना आपल्या तालावर नाचविणाऱ्या पाक लष्कराची स्थिती सध्या 'मरता क्या न करता' अशी झाली आहे. भारताने पाकवर डोळे झाकून विश्वास ठेवायला नकोच, हे खरेच पण अंतर्गत कलह व आर्थिक अस्थैर्याने पुरत्या वैतागलेल्या पाक जनतेच्या मनात भारताबाबत असणाऱ्या द्वेषाच्या जागी विश्वासाची भावना पेरण्याची संधीही आपण सोडता कामा नये. त्यासाठी अत्यंत सावधपणे राजनैतिक कौशल्य वापरून चर्चेची दारे किलकिली करत पाकिस्तानी जनतेच्या मनात भारताबद्दल विश्वास पेरण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. असे प्रयत्न झाले व त्यात यश मिळाले तर आज पाकिस्तानला आपल्या ताटाखालचे मांजर बनवून भारताची कोंडी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या चीनला भारत शह देऊ शकेल. आज चीनचा वर्चस्ववाद रोखणे हा जगासाठी प्रथम प्राधान्यक्रम आहे. भारत आपल्या शेजारी देशांशी विश्वासाचे संबंध निर्माण करून चीनच्या वर्चस्वाला नक्कीच रोखू शकतो. त्यातून भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील व अर्थकारणातील वजन आणखी वाढणारच आहे. नाही तरी शांघाय सहकार्य परिषदेसारख्या परिषदांमधून फारसे काही घडतच नाही. त्यामुळे अशा परिषदांच्या निमित्ताने आपल्या पदरात काही पाडून घेण्यासाठीचे प्रयत्न करायला हरकत काय? समजा अशा प्रयत्नात अपयशही आले तर त्याने भारताचे काही नुकसान होण्याची शक्यता नाहीच! उलट भारताने शांततेचे व सहकार्याचे आपले धोरण कायम ठेवून प्रयत्न केले, असे चित्र समोर येऊन भारताची प्रतिमा उजळेल! मात्र, विद्यमान राज्यकर्त्यांनी त्यांच्या देशांतर्गत राजकारणासाठी व जनाधारासाठी 'पाकिस्तानला ठेचून काढले' ही प्रतिमा रंगविणे जास्त गरजेचे वाटते त्यामुळे पाकिस्तानशी कुठलीही चर्चा नाहीच. यावर विद्यमान सरकार ठाम दिसते. त्यामुळे जी कोंडी निर्माण झाली आहे ती फुटणार कशी? हा प्रश्नच! दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असणारा अशांत व अस्वस्थ पाकिस्तान पदोपदी अंतर्गत स्फोट अनुभवतो आहे. त्यातून या परिस्थितीचा दहशतवादी संघटना व कट्टरतावादी शक्तीच सर्वांत जास्त फायदा उचलणार हे स्पष्टच! पाकिस्तानही दुसरे अफगाणिस्तान बनल्यास शेजारी म्हणून त्याचा सर्वांत जास्त फटका भारतालाच सहन करावा लागणार हे उघडच! सर्वच बाजूंनी अशांतता व अस्थैर्य असेल तर त्याचा परिणाम आपल्या आर्थिक वाटचालीवर होणे अटळच! त्यामुळे भोगू दे पाकला आपल्या कर्माची फळं, हे धोरण तात्कालिक समाधान देणारे असले तरी देशाचे दीर्घकालीन हित लक्षात घेता अशी भूमिका घातकच ठरू शकते. त्यामुळे विद्यमान सरकारने या विषयावर भावनिक नव्हे तर राजनैतिक भूमिका घ्यायला हवी तरच ही कोंडी फोडून आपले संभाव्य नुकसान रोखण्यात भारताला यश मिळेल! पाकिस्तानी राज्यकर्त्यांकडून तर अशा परिपक्व विचारांची अपेक्षाच नाही कारण त्यांनी असा विचार केला असता तर पाकिस्तानी जनतेवर आजची परिस्थिती ओढवलीच नसती! असुरी महत्त्वाकांक्षेने झपाटलेला चीन पाकला काही शहाणपणाच्या गोष्टी सांगण्याची शक्यता नाहीच. रशिया युक्रेनसोबत युद्ध छेडून आपल्याच चक्रव्यूहात स्वत: अडकला आहे. तर इस्रायलच्या गाझावरील हल्ल्यांनी अमेरिकेची पुरती गोची झाली आहे. मग ही कोंडी फोडणार कोण? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो व त्याचे उत्तर आता स्वत: भारतालाच शोधावे लागेल, हे मात्र निश्चित!

---

**दिल्लीतील शकरपूर भागात एका किशोरवयीन मुलाची हत्या आणि त्याच्याशी निगडीत तपशील कोणाही संवेदनशील व्यक्तीला आणि समाजाला अस्वस्थ करणारा आहे. नववीत शिकणाऱ्या तीन अल्पवयीन मुलांनी त्यांच्याच वयाच्या मित्राचा सार्वजनिक ठिकाणी चाकूने वार करून खून केला. यामागील कारणे संपूर्ण समाज आणि सरकारला त्यांच्या विकास धोरणांवर थांबून विचार करण्यास भाग पाडणारी आहेत. खून झालेल्या युवकाने नवीन मोबाईल फोन घेतला होता, त्याच्या तीन मित्रांनी त्याला याबाबत पार्टी देण्यास सांगितले. पण त्याने नकार दिल्याने त्यांनी त्याची हत्या केली. अलीकडच्या काळात किशोरवयीन मुलांमध्येही बेलगाम आक्रमकता, हिंसक वर्तन आणि गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येत आहे. याबाबत गांभीर्याने विचार न केल्यास भविष्यात भयंकर प्रश्नांचे आव्हान उभे राहू शकते.**

# मुलांमधील क्रौर्याचे आव्हान

डॉ. प्राजक्ता पाटील

दहा ते पंधरा वर्षे वयोगटातील मुलांमध्ये छोटे मोठे गुन्हे करण्याची प्रवृत्ती सध्या वाढत चालली आहे. त्यांना धड पौगंडावस्थेतील मुले असेही म्हणता येत नाही आणि धड बालही म्हणता येत नाही अशी ही अडनीड वयाची मुले आहेत. आपण दररोज वृत्तपत्रांमध्ये अशा मुलांच्या मनातील वाढती हिंसक भावना दर्शविणाऱ्या अनेक बातम्या वाचत असतो. इतक्या लहान वयामध्ये या मुलांच्या मनात कोणाविषयी शत्रुत्व निर्माण होणे आणि त्याच्यावर हल्ला करून त्याला पराभूत केले पाहिजे ही भावना निर्माण होणे या गोष्टी चिंताजनक आहेत. खरे म्हणजे हे वय छान परीच्या गोष्टीच्या ऐकण्याचे आणि मनावर चांगला संस्कार करणारे साहित्य वाचण्याचे असते. मात्र या वयामध्ये अशी आक्रमक वृत्ती का वाढते हा प्रश्न पालकांनाही सतावत असतो.

काही वर्षांपूर्वी मुंबईच्याच एका शाळेमध्ये अभ्यासात मागे पडलेल्या एका मुलीने चांगला अभ्यास असणाऱ्या मुलीचा सूड घेण्यासाठी ऐन परीक्षेच्या दिवसात तिची पुस्तकेच हडप केली होती. एक मुलगी आपल्यापेक्षा हुशार आहे तेव्हा आपणही तेवढे हुशार व्हावे असे वाटण्याच्याऐवजी तिला चांगले मार्क मिळू नयेत अशी प्रवृत्ती त्या मुलीत का निर्माण झाली? पौगंडावस्थेच्या सीमारेषेवर असलेल्या या मुलामुलींमध्ये परिपक्वता तर नसतेच पण दुसऱ्याचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती फार प्रबळ असते. त्यातून ही हिंसक वृत्ती बळावली जाते, असे मानसशास्त्रज्ञांनी तेव्हा म्हटले होते. पण अलीकडच्या काळात मुलांकडून घडणाऱ्या अशा घटना क्रौर्यदर्शक दिसताहेत. राजधानी दिल्लीत अल्पवयीन मुलाबाबत घडलेल्या प्रकारामुळे या क्रूरपणाचे नवे उदाहरण समोर आले आहे.

दिल्लीतील शकरपूर भागात झालेल्या किशोरवयीन मुलाच्या हत्येचा तपशील कोणत्याही संवेदनशील व्यक्तीला आणि समाजाला अस्वस्थ करायला पुरेसा आहे. नववीत शिकणाऱ्या तीन अल्पवयीन मुलांनी त्यांच्याच वयाच्या मित्राचा सार्वजनिक ठिकाणी चाकूने वार करून खून केला. यामागील कारणे संपूर्ण समाज आणि सरकारला त्यांच्या विकास धोरणांवर थांबून विचार करण्यास भाग पाडतात. खून झालेल्या युवकाने नवीन मोबाईल फोन घेतला होता, त्याच्या तीन मित्रांनी त्याला याचे सेलीब्रेशन करण्यासाठी पार्टी देण्याची मागणी केली. पण त्याने नकार दिला. यावरुन चिडून या तिघांनी त्याची हत्या केली. अलीकडच्या काळात अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत, ज्यात शाळकरी मुले किंवा किशोरवयीन मुलांमध्येही बेलगाम आक्रमकता, हिंसक वर्तन आणि गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येत आहे. लहान वयात मुलांमध्ये या बदलाचे मूळ कशात आहे हा प्रश्न सर्वांनाच अस्वस्थ करत आहे. नवीन मोबाईल फोनची ट्रीटसारखी क्षुल्लक गोष्ट इतकी गंभीर आक्रमकता निर्माण करू शकते की तीन किशोरवयीन मुलांनी त्यांच्याच मित्रावर चाकूने हल्ला करावा? साधारण पाचव्या वर्षापासून ते विसाव्या मानसिक वर्षापर्यंत मुलांना आणि मुलींना शारीरिक शक्तीचे आकर्षण असते. त्या ताकदीच्या जोरावर अन्य कोठे काही पराक्रम करता येत नाही परंतु आपले मित्र मैत्रिणी यांच्यासमोर आपल्या शक्तीचे प्रदर्शन घडवले पाहिजे असे मुलांना वाटत राहते. वर्गात मुलांच्या मारामाऱ्या झाल्या तर त्यात चूक कोण आणि बरोबर कोण याची चर्चा होण्याऐवजी कोणी कोणावर मात केली याचीच जास्त चर्चा होते. हिंसाचार घडवणे आणि त्यात विजय मिळवणे म्हणजेच खरे यश असा विचार याच वयात बळावतो आणि मनावर पक्का होतो. त्यातून या वयामधल्या मुलांत आणि मुलींतसुद्धा हिंसाचाराची बिजे पेरली जात असतात.

समाज आणि कुटुंबातील कमकुवत दुव्यांमुळे, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात हरवल्याने मुलांच्या मानसिक स्थितीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होत चालला आहे. अनेक मुले गंभीर भावनिक उलथापालथीचे बळी ठरत आहेत. बऱ्याच मुलांना स्मार्टफोन आणि इंटरनेट, सोशल मीडियाच्या अमर्याद जगात सहज प्रवेश मिळतो. पण हे विश्व विचार आणि वर्तनावर प्रभाव टाकणाऱ्या सामग्रीने भरलेले असल्याने याचा मुलांच्या विवेकबुद्धीवर गंभीर आणि नकारात्मक परिणाम होत आहे. विशेषतः इंटरनेटवरील हिंसा वाढवणारे गेम्स आणि कार्टून्स याबाबत मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरत आहेत. त्याचबरोबर ओटीटीवरील मालिका आणि चित्रपट यांचाही मुलांवर नकारात्मक प्रभाव पडत आहे. याचे परिणाम अनेकदा ते घराबाहेर, शाळेत किंवा शाळेत आक्रमक किंवा हिंसक होण्याच्या रूपात दिसतात. राजधानी दिल्लीतीलच जहांगीरपुरी भागात राहणाऱ्या चार जणांनी एका सतरा वर्षाच्या मुलाला बंदुकीच्या जोरावर बेदम मारहाण केली, ओढून नेले, चपला चाटण्यास भाग पाडले. शिवाय त्याचा छळ आणि अपमान करण्यासाठी त्याच्यावर लैंगिक अत्याचारही केले आणि या सगळ्याचा व्हिडिओ बनवला आणि तो पोस्ट केला. या कृत्याबाबत त्यांना काय शिक्षा होईल, याकडेही ते बेफिकीर होते. यापूर्वीही गुन्हेगारी घटना घडल्या आहेत हे खरे आहे. परंतु गुन्हेगारी मानसिकता अधिक विकृत होण्याची कारणे काय असू शकतात? ज्या वयात मुलांनी अभ्यास आणि खेळात गुंतले पाहिजे, त्या वयात त्यांच्यातील आक्रमकता अनैसर्गिक आणि त्रासदायक आहे. अनेक घटनांमध्ये शाळेत शिकणाऱ्या मुलांनी आपल्या वर्गमित्रावर चाकू किंवा इतर घातक शस्त्राने हल्ला करून त्याचा जीव घेतल्याचे दिसून आले आहे. या घटना पालकांच्या संगोपनाबरोबरच आपल्या शिक्षणपद्धतीचे अपयश दर्शवणाऱ्या आहेत.

आजच्या विभक्त कुटुंबांमध्ये, पालक इतके व्यस्त असतात की त्यांना त्यांच्या मुलांशी बोलण्यासाठी फारसा वेळ नसतो. अनेकदा मुलं काय करत आहेत, काय खेळत आहेत, त्यांचे मित्र कोण आहेत याकडे लक्षही ठेवता येत नाही. मित्रही त्याला चिडवतात की अरे! तुझे पालक कसे आहेत, जे तुला ऑनलाइन गेम खेळू देत नाहीत? यामुळे मुलांमध्ये त्यांच्या कुटुंबातील सदस्यांबद्दल न्यूनगंड आणि द्वेषाची भावना निर्माण होते आणि ती पुढे जाऊन गुन्हेगारीच्या रूपात समोर येऊ शकते. शारिरीक, शाब्दिक किंवा लैंगिक शोषण, पालकांकडून मुलांकडे दुर्लक्ष, क्लेशकारक घटना किंवा तणाव, मुलांना धमकावणे, कौटुंबिक समस्या, मादक पदार्थांचे सेवन, दारू आणि इतर गैरवर्तन यामुळे मुलांमध्ये आक्रमकता वाढून ती हिंसक होऊ शकतात.

ऑस्ट्रियाच्या क्लागेनफर्ट विद्यापीठाने किशोरवयीन मुलांवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की जगभरातील ३५.८ टक्के पेक्षा जास्त किशोरवयीन मुले मानसिक तणाव, निद्रानाश, अवास्तव भीती, कौटुंबिक किंवा सामाजिक हिंसाचार, चिडचिडेपणा किंवा इतर कारणांमुळे संघर्ष करत आहेत. वाढत्या एकाकीपणामुळे ती अधिक आक्रमक आणि विध्वंसक विचारसरणीकडे वाटचाल करू लागली आहेत. या सर्वावर उपाय म्हणजे घरात मुलांसाठी निरोगी, सुरक्षित आणि प्रेमळ वातावरण निर्माण करण्यासोबतच, पालकांनी त्यांच्या मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवले पाहिजे. शाळांमध्ये मानसिक आरोग्य सुधारणाऱ्या समुपदेशकांची व्यवस्था उभी केली पाहिजे, जिथे मुलांच्या मानसिक समस्या समजून घेऊन त्यांचे निराकरण केले जाइल. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षकांना मुलांचे वर्तन आणि त्यांच्या समस्यांबद्दल संवेदनशील बनवण्यासाठी प्रशिक्षण द्यावे लागेल. अशा एक दोन घटना घडल्या म्हणजे देशात सर्वत्र अशीच परिस्थिती आहे, असे मानण्याचे कारण नाही. मात्र झालेल्या घटना या धक्कादायक आहेत. त्याकडे दुर्लक्ष करणे समाजव्यवस्थेला महागात पडणारे आहे. म्हणूनच या घटनांमागच्या कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यातून जे काही निष्कर्ष निघतील त्या निष्कर्षांच्या आधारे पालकांना तसेच समाजातील अन्य घटकांना आपल्या वर्तनात बदल करावे लागणार आहेत. हे बदल केले नाहीत तर हिंसाचाराचे हे लोण घातक वळणावर पोहोचण्यास वेळ लागणार नाही.

---

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**गुरुवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु.७, पूर्वाषाढा, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
**नक्षत्र** : पूर्वाषाढा, योग :अतिगंड, करण : विष्टि
ज्योतिर्लिंग जागर कोल्हापूर. महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे) त्रिरात्रोत्सवारंभ, सरस्वती पूजन, चित्रार्कः दु.२.०६ वा. म्हैस.
**सूर्योदय :** स.०६.०९ **सूर्यास्त :** सायं. ०५.५१ वा.
**राहू काळ : दुपारी :** १:३० ते ३:००

**दिनविशेष**

▶१८७१ : निष्ठावंत समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे संशोधक, अभ्यासक व प्रकाशक शंकर श्रीकृष्ण देव यांचा जन्म. ▶१८९५: भक्ती रक्षक श्रीधर देव गोस्वामी महाराज यांचा जन्म. ▶१८९९: कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे जन्मदिन ▶१९०६: लेखक आर. के. नारायण यांचा जन्म. ▶१९१३: पनामा कालव्याचे बांधकाम पूर्ण ▶१९२०: भारतीय टपालदिन ▶१९५४: आचार्य अत्रे यांच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रपती पदक. ▶१९६४: चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते व अभिनेते गुरुदत्त यांचे निधन. ▶१९७६: करचुकवेगिरी केल्याचे सिद्ध झाल्यामुळे अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्ष स्पिरो ग्न्यूने यांनी राजीनामा दिला. ▶१९९७: ख्यातनाम संगीत दिग्दर्शक आणि गायक हृदयनाथ मंगेशकर यांची गानसम्राज्ञी लता मंगेशकर राज्य पुरस्कारासाठी निवड.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : प्रयत्नांना यश येईल. ▲ **वृषभ** : आर्थिक अवाक वाढेल. ▲ **मिथुन** : प्रवास सांभाळून करा. ▲ **कर्क** : मिळालेल्या संधीचा लाभ घ्या. ▲ **सिंह** : आरोग्य सांभाळा. ▲ **कन्या** : अनुकूल घडामोडी घडतील. ▲ **तुळ** : जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. ▲ **वृश्चिक** : प्रतिष्ठा वाढेल. ▲ **धनु** : मौल्यवान वस्तूंची खरेदी कराल. ▲ **मकर** : वनाकारण खर्च होईल. ▲ **कुंभ** : विचारपूर्वक निर्णय घ्या. ▲ **मीन** : आपल्या इच्छा कृतीत येतील.

**चिंतन**

सकाळी उठल्यावर चहाबरोबर पाव, बिस्किट, खारी, निदान पोळी खाण्याची पद्धत आहे. काहीजण न्याहारी म्हणतात, न्याहारीला आपण 'ब्रेकफास्ट' असेही म्हणतात. काहीजण शिदोरी नेतात. याचे कारण काय? आपण दिवसभर श्रम करतो. कुणाचे बौद्धीक काम तर कुणाचे अति श्रमाचे! आपल्याला त्यासाठी उर्जेची आवश्यकता असते. मेंदूला उर्जेची आवश्यकता असते. या नाश्त्यातून आपण जे अन्न खातो त्याचे रुपांतर ऊर्जेमध्ये होते. मेंदूला तरतरी येते. अर्धपोटी राहिल्यास काम पूर्ण क्षमतेचे होत नाही. दिवसभरात त्यासाठी जेवढ्या उष्मांकाची गरज असते त्याच्या १/३ भाग नाश्त्यामधून मिळावा. हा नाश्ता भरपूर आणि दुपारचे जेवण प्रमाणात आणि रात्रीचे जेवण माफक असावे. म्हणून आरोग्यासाठी नाश्ता हवाच.

**व्यक्तीविशेष**

## आर. के. नारायण

सुप्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार आर. के. नारायण यांचा जन्म १० ऑक्टोबर १९०६ रोजी चेन्नई येथे झाला. रसिपुरम् कृष्णस्वामी नारायण स्वामी या नावाचे हे लेखक आपल्याला परिचीत आहेत. ते मालगुडीडेजमुळे. प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचे ज्येष्ठ बंधू असणाऱ्या आर. के. यांनी वृत्तपत्रलेखक, वार्ताहर, स्तंभलेखक म्हणून आपली कारकीर्द सुरु केली. स्वामी अँड फ्रेंड्स ही त्यांची पहिल कादंबरी १९३५ मध्ये प्रसिद्ध झाली. गाईड या गाजलेल्या चित्रपटाचे कथालेखक असणाऱ्या नारायण यांनी 'दि इंग्लिश टीचर' ह आत्मकथनपर कादंबरी तर 'माय डेज' हे आत्मचरित्र लिहिले आहे. गाईड कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कारही लाभला. रामायण-महाभारतावर ग्रंथलेखन केलेल्या आर. के. नारायण यांनी १० कादंबऱ्या, २०० लघुकथा लिहिल्या. आर. के. नारायण राज्यसभेचे सदस्यही होते. १५ मे २००१ रोजी चेन्नई येथे त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

## खरी श्रीमंती

अभय हा गरीब मुलगा होता. परंतु स्वभावाने अतिशय चांगला आणि अभ्यासात हुशार होता. त्याच्या वर्गात बरीच श्रीमंत मुले होती. पण ही मुलं अभयशी फारसं बोलत नसत. हा मुलगा आपल्याबरोबर खेळण्याच्या योग्यतेचा नाही असा विचार करुन ते अभयपासून दूर रहात असतं. अभयने एक दोन वेळा संध्याकाळी ग्राऊंडवर जाऊन मी तुमच्याबरोबर खेळायला येऊ का? असे विचारले पण त्याला कोणीही फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अभय काहीसा हिरमुसला झाला होता. एकदा तो सुटीच्या दिवशी आईचे काम करण्यासाठी मुख्य रस्त्यालगतच्या छोट्या वाटेने चालला होता. हा रस्ता पक्का नव्हता तसेच रस्त्यावर बरेचसे दगड पडलेले होते. रस्ता खडबडीत असल्यामुळे त्या रस्त्याने फारसे कोणी जात नसत. परंतु पटकन जाता यावं म्हणून हा रस्ता उपयोगाचा होता. अभय रस्त्याने चालला होता तेवढ्यात त्याला मागच्या बाजूला कोणीतरी पडल्याचा आणि त्यानंतर ओरडण्याचा आवाज आला. अभयने चटकन मागे वळून पाहिले तर एक मुलगा सायकलवरुन पडला होता. दगड लागल्यामुळे त्याच्या पायातून रक्त वाहत होते. (पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

## इलेक्ट्रॉनिक चष्म्याचा शोध

या अनोख्या चष्म्याचे निर्माते रोनाल्ड ब्लूम म्हणतात,या चष्म्यामुळे जवळचे आणि दूरचे एकाच वेळी बघण्यासाठी व्यक्तीला त्रास होणार नाही. धावपटू, टेनिसपटू, गोल्फपटू आदी खेळाडूंना हा चष्मा खूप उपयोगी ठरणार आहे. तसेच वृद्ध व्यक्तींनाही हा चष्मा घातल्यानंतर जीना चढताना-उतरताना पायऱ्या नीट समजू शकतील.

या चष्म्याच्या लेन्समध्ये मोबाईल फोनच्या डिस्प्लेमध्ये किंवा एससीडी, टिव्हीच्या पडद्यामध्ये असलेल्या क्रिस्टल प्रमाणेच लिक्वीड क्रिस्टल असतील. हे क्रिस्टल लेन्समध्ये पारदर्शी वलय बनवतात. त्यांचे आकारमान वीजेच्या अत्यल्प प्रवाहासोबत बदलू शकते. या आकारमानानानुसार लेन्सचा फोकसही बदलतो. या इलेक्ट्रॉनिक चष्म्याचा शोध निबंध एरिजोना विश्वविद्यालयातील संशोधकांनी २००६ मध्ये प्रकाशित केला होता. पिक्सेल ऑप्टीक्स या कंपनीने तो आणखी विकसित केला. मल्टीफोकल चष्म्याच्या तुलनेत यातील दोष खूपच कमी आहेत. चष्म्याची बॅटरी केवळ, लिहिताना आणि वाचतानाच खर्च होते. (समाप्त)

**सामान्यज्ञान**

## ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम

गाडीमधील जीपीएस प्रणालीमध्ये आपण फक्त जिथं जायचं आहे, तिथला पत्ता टाकला, की सगळे मार्ग समोर येतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जीपीएस प्रणालीद्वारे आपण वाटेत असलेल्या रहदारीचीही माहिती घेऊ शकतो. जीपीएस ही प्रणाली अमेरिकी सैन्य दलानं तयार केली आहे. १९७३ मध्ये या प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला. दिशा आणि मार्ग ओळखण्यामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी या प्रणालीचा शोध लावण्यात आला. सुरूवातीला केवळ सैन्यदलांसाठीच असलेल्या या प्रणालीचा वापर अलिकडच्या काळामध्ये नागरिकांसाठीही होऊ लागला आहे. (समाप्त)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४६२**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 1 | |
| | 2 | | |
| | | 2 | |
| | 1 | 4 | 3 |

**क्रमांक : ४६१ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 2 | 3 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |

**हास्यविनोद**

शेठजींच्या घरी चोर शिरला. त्याने चाकू दाखवून शेठजींना विचारले, सोना कहा है? शेठजींची चांगलीच झोपमोड झाली होती. ते रागारागाने म्हणाले, 'मूर्खा, सगळं घर रिकामं आहे, कहा भी सोना.'



— — — — — — — —

चारचाकी चालवताना सीट बेल्ट लावणं सक्तीचं झाल्यानंतर लगेचच दुसरे दिवशी मोहनरावांना ट्रॅफिक पोलिसांनी अडवलं. त्यांनी सीटबेल्ट लावला होता, हे पाहून ट्रॅफिक पोलिस त्यांच्या जवळ आला आणि म्हणाला, 'तुम्ही बेल्ट लावल्याबद्दल तुम्हाला बक्षिस म्हणून पाच हजार रुपये देण्यात येणार आहेत. आता सांगा बरं या पैशांचं तुम्ही काय करणार?' मोहनराव म्हणाले, 'अरे वा ! छान ! आता या पैशातून सर्वप्रथम मी लायसेन्स काढून आणेन.

**महिलायन**

## वाढवा मुलांची क्रीडाकौशल्य

त्या दृष्टीने मुलांमध्ये आवश्यक स्कील विकसित करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणं त्यांच्या कमीत कमी वयापासूनच सुरु करणं आवश्यक आहे. सुरुवातीला मुलांना पुलिंग, बाऊन्सींग, कॅचिंग, लिफ्टिंग, पुशिंग, स्ट्राईकिंग अशा प्रकारची अनेक कौशल्य मुलांमध्ये विकसित करणं अवघड वाटतं. त्यासाठी त्या गोष्टी मुलांना सोप्या वाटाव्यात यासाठी त्यांच्यामध्ये मॅन्युप्युलेटीव्ह स्कील विकसित करणं आवश्यक आहे. थोड्या प्रयत्नानंतर ते आपल्याला सहज शक्य होईल.

आपल्या मुलांमध्ये मॅनिप्युलेटी स्कील विकसित व्हावं अशी इच्छा असणाऱ्या पालकांनी मुलांनी कोणत्याही ॲक्टीव्हीटीमध्ये भाग घेण्यासाठी त्यांना वॉर्मअप होण्याचं प्रशिक्षण देण्याची जरुरी आहे. इतकंच काय, प्रौढ व्यक्तीही पहिल्यांदाच जीममध्ये जात असतील तर त्यांनीही आधी वॉर्मअप होण्याची गरज आहे, असं सांगितलं जातं. याचाच अर्थ कोणतंही मूल एखाद्या ॲक्टीव्हीटीमध्ये भाग घेत असेल तर त्याआधी त्याने वॉर्मअप होण्याची आवश्यकता आहे. वॉर्मअप एक्सरसाईजमध्ये असे व्यायामप्रमार असतात की ज्यामुळे संपूर्ण शरीर वॉर्मअप होतं. स्ट्रेचिंग, जंपींग जॅक, स्पॉट जॉगिंग असे काही व्यायामप्रकार उदाहरणादाखल सांगता येतील. ते मुलं सहज करु शकतील. मुलं प्रौढांइतकी बळकट नसतात, हे साऱ्यांनाच माहित आहे. पालकांच्याही ही गोष्ट लक्षात येते. शरीराच्या मांसपेशीच आपल्याला मजबूत बनवतात. मुलांच्या मांसपेशी अधिक मजबूत असतील तर तो शारीरिकदृष्ट्या अधिक बळकट बनेल. (क्रमश:)

**बालांगण**

## राजदेहेर

नाशिक जिल्ह्यातील चांदवड या इतिहासप्रसिध्द गावापासून थोड्याच अंतरावर एक नामांकित गड उभा आहे, किल्ले राजदेहेर. इंग्रजांच्या अवकृपेमुळे या गडाचा कातळकोरीव मार्ग इतिहास जमा झाल्यामुळे अवघड शिडी वरून ८०-९० फूट चढून आपणास या गडाच्या माथ्यावर चढता येते. कातळकोरीव प्रवेशमार्ग, तीन देखण्या कमानींनी सजलेली सदरेची इमारत, अंबरखाना, माहादेव मंदिर, मोठा तलाव आणि अनेक इमारत, अंबरखाना, महादेव मंदिर, मोठा तलाव आणि अनेक टाकी या गडावर आपणास पाहता येतात. या गडावरील प्राचीन अवशेष पाहता याची बांधणी शिवपूर्वकाळात करण्यात आली असे आपण खात्रीलायक रित्या सांगू शकतो. या गडाच्या भेटीतच चांदवड गावातील रंगमहाल किंवा होळकरवाडा आपण पाहू शकता.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com



# क्यूआर कोड प्रणालीच्या अंतरंगात..

आजकाल ठेला लावलेल्या भाजीवाल्यापासून ते पानपट्टी चालवणाऱ्या दुकानदारापर्यंत सर्वच ठिकाणी ऑनलाईन पेमेंट स्वीकारली जाते. एक वेळ अशी होती की, क्वचितच कोणी ऑनलाईन पेमेंट वापरायचे. शिवाय मोठ्या व्यवहारासाठी ऑनलाइन पेमेंट वापरले जायचे. पण आता अगदी एक रुपयाचे ऑनलाइन व्यवहारदेखील केले जाऊ शकते. पण आता यासंदर्भात असा प्रश्न उपस्थित झाला की, सर्व क्यूआर कोड सारखेच दिसतात, असे जगात लाखो प्रकारचे क्यूआर कोड आहेत, मग पैसे कसे त्याच्या खात्यातच जातात? याचे उत्तर असे आहे की, सारखे दिसणारे क्यूआर कोड एका खास पॅटर्नवर बनवले जातात. बहुतेक कोडमध्ये काळ्या आणि पांढऱ्या पट्ट्या असतात. हे कोड फक्त सॉफ्टवेअरद्वारे समजू शकतात.

कोड कसा तयार होतो?

जेव्हा जेव्हा एखादी कंपनी एखाद्या वापरकर्त्याला क्यूआर कोड देते, तेव्हा त्याची सर्व माहिती सॉफ्टवेअर दरम्यान त्या क्यूआर कोडशी जोडली जाते. यामुळे जेव्हा कोणतेही पेमेंट दुसऱ्या व्यक्तीला पाठवावे लागते, तेव्हा ते त्याच खात्यातून जाते ज्याला ते जोडलेले आहे. त्याचप्रमाणे, पेमेंट प्राप्त करण्यासाठी, सर्व माहिती क्यूआर कोडवर उपलब्ध आहे. कंपनी हे सर्व सॉफ्टवेअरद्वारे करते. सर्व क्यूआर कोडसारखे दिसतात का? याचे उत्तर नाही असे आहे. ते त्याच्या डिझाइनमुळे आपल्याला सारखे दिसू शकतात, पण ते सारखे नाही. जेव्हा तुम्ही क्यूआर कोड काळजीपूर्वक पाहता तेव्हा तुम्हाला दिसेल की, त्याचा नमुना इतर क्यूआर कोडपेक्षा वेगळा आहे. क्यूआर कोड बनवणारी कंपनी हे आधीच चेक करते की, त्यांनी जनरेट केलेला क्यूआर एका व्यक्तीशिवाय दुसऱ्या कोणालाही जाणार नाही. कोरोनाच्या काळात देश डिजिटल युगाकडे वळले, ज्यानंतर आता सर्वच लोक कोणत्याही व्यवहारासाठी ऑनलाईन ऑप्शन स्वीकारतात. कारण, यामुळे आपल्याला खर्चाचा ट्रॅक राहतो, शिवाय सुट्या पैशांची चिंता नाही आणि सोबत पैसे घेऊन जाण्याचाही प्रश्न नाही. फोन सोबत असला की, झाले काम सोपे. बहुतांश ऑनलाईन ट्रान्झॅक्शन हे क्यूआर कोड स्कॅन करून केले जातात. पैसे पाठवणारा आपल्या फोनमध्ये समोरील क्यूआर कोड स्कॅन करतो, पैसे पाठवतो आणि ते पैसे त्या क्यूआर कोडशी संलग्न बँक खात्यात वळते होतात.

# पावणे तीनशे कोटींचे पेंटिंग



महागात महाग पेंटिंग कितीपर्यंत असेल, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर काही हजारांत येईल, लाखांत येईल व क्वचित प्रसंगी एक-दोन कोटीतही येईल. पण, हाँगकाँगमधील लिलावात असे सर्व आडाखे अक्षरशः मोडीत निघाले असून, येथे एक पेंटिंग थोड्याथोडक्या नव्हे तर चक्क २६९ कोटी २४ लाख व ७ हजार रुपयांना विकले गेले आहे. दिसायला तसे साधे पेंटिंग असल्याने या पेंटिंगमध्ये असे खास काय आहे, असा प्रश्न त्यामुळेच उपस्थित होत आहे.

हाँगकाँगमध्ये नुकतेच पेंटिंग प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्या लिलावात या पेंटिंगची ३२.२ दशलक्ष डॉलर्समध्ये विक्री झाली. भारतीय चलनात ही रक्कम २६९ कोटी २४ लाख ७ हजार ८३० रुपये आहे. 'लेस कॅन्टॉट्स अमरेस' असे या पेंटिंगचे नाव आहे. हे पेंटिंग प्रसिद्ध चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग यांनी १८८७ मध्ये रेखाटलेले आहे. १८५३ मध्ये नेदरलँड्समध्ये जन्मलेले व्हॅन गॉग हे पाश्चात्य कलेतील सर्वात प्रसिद्ध आणि प्रभावशाली व्यक्तींपैकी एक होते. १८९० मध्ये त्यांचे निधन झाले. याआधी त्यांनी सुमारे २,१०० पेंटिंग रेखाटली आहेत. ज्यात सुमारे ८६० तैलचित्रांचा समावेश आहे.

व्हॅन गॉग उन्हाळ्यात पॅरिसच्या बाहेरील बोटिंग हबच्या आसपास गेले होते. तिथे त्यांनी एकूण ४० पेंटिंग काढले, त्यापैकी हे एक पेंटिंग आहे. या पेंटिंगसह त्यांनी आपली जुनी वास्तववादी चित्रशैली कायमची मागे सोडली. त्यांनी प्लेट आणि ब्रशेसचा वापर करायला सुरुवात केली. ऑक्टोबर १८८७ मध्ये व्हिन्सेंट व्हॅन गॉगने आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रात असे लिहिले आहे की, 'जेव्हा मी या उन्हाळ्यात अस्निरेसमध्ये हे लँडस्केप रेखाटले, तेव्हा मला पूर्वीपेक्षा जास्त रंग दिसले.' पेंटिंगमध्ये गडद वास्तववादाकडून व्हायब्रंट इफेक्टपर्यंतचा बदल कलाकारांना दाखवला आहे.

# 'चांद्रयान-३' सध्या काय करतेय?



'चांद्रयान-३' चंद्रावरील सर्वात जुन्या विवरांपैकी एकावर उतरले आहे, असा अंदाज चंद्र मोहिमा आणि उपग्रहांच्या प्रतिमांचे विश्लेषण करणाऱ्या शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. शास्त्रज्ञांच्या पथकात भौतिक संशोधन प्रयोगशाळा आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो), अहमदाबाद येथील संशोधकांचाही समावेश आहे.

भौतिक संशोधन प्रयोगशाळेच्या प्लॅनेटरी सायन्स विभागातील सहयोगी प्राध्यापक एस विजयन यांनी सांगितले की, हे विवर ३.८५ अब्ज वर्षांपूर्वी नेक्टेरियन काळात तयार झाले होते. नेक्टेरियन कालावधी हा चंद्राच्या इतिहासातील सर्वात जुन्या काळांपैकी एक आहे. एस विजयन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, चांद्रयान-३ लँडिंग साइट एक अद्वितीय भूवैज्ञानिक सेटिंग आहे. याआधी इतर कोणतेही मिशन तिथे गेले नव्हते. चांद्रयान-३ च्या प्रज्ञान रोव्हरमधील प्रतिमा या अक्षांशावरील चंद्राच्या पहिल्या प्रतिमा आहेत. चंद्र कालांतराने कसा बदलला, हे छायाचित्र दर्शवतात.


भारताने १४ जुलै २०२३ रोजी दुपारी ३.३५ वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून चांद्रयान-३ लाँच केले. २२ दिवसांनंतर, ५ ऑगस्ट रोजी ते चंद्राच्या कक्षेत पोहोचले. चांद्रयान-३ प्रक्षेपणानंतर ४१ व्या दिवशी २३ ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरले. यासह भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरला आहे. कोणत्याही ग्रह, उपग्रह किंवा इतर खगोलीय वस्तूंवरील मोठ्या खड्ड्याला विवर म्हणतात. हे विवर ज्वालामुखीच्या उद्रेकाने तयार होतात. याशिवाय उल्कापिंड दुसऱ्या शरीरावर आदळल्यास विवरही तयार होतात. विवरातून बाहेर पडणाऱ्या पदार्थांना इजेक्टा म्हणतात. एस विजयन म्हणाले की, इजेक्टाची निर्मिती ही वाळूवर बॉल फेकल्यावर तिथून काही वाळू बाहेर पडण्यासारखीच असते. त्या वाळूचे रूपांतर बाहेरील एका छोट्या ढिगाऱ्यात होते. 'चांद्रयान-३'ने पाठवलेल्या छायाचित्रांवरून असे दिसून आले आहे की, चंद्रावरील सर्वात मोठे आणि प्रसिद्ध खोरे असलेल्या दक्षिण ध्रुव-एटकेन बेसिनमधून बाहेर काढलेल्या सामग्रीखाली अर्धा विवर गाडला गेला आहे.



# मॅग्नापिन्नाची अनोखी चाल

दक्षिण पॅसिफिक महासागरातील 'टोंगा ट्रेंच' या गर्तेत बिगफिन स्क्विड या जलचराचे दुर्मीळ चित्रीकरण करण्यात आले आहे. या फुटेजमध्ये बिगफिन स्क्विड आपल्या लांबलचक भुजांच्या सहाय्याने समुद्रतळाशी चक्क चालत असताना दिसून येते. एखाद्या दोऱ्यासारख्या दिसणाऱ्या त्याच्या या भुजा अनेक फूट लांबीच्या असतात. अतिशय खोल ठिकाणी राहणारी ही स्क्विड प्रजाती अत्यंत कमी वेळेला दिसून आलेली आहे.

बिगफिन स्क्विडला वैज्ञानिक भाषेत मॅग्नापिन्ना असे नाव आहे. ऑक्टोपस आणि कटलफिश ज्या कुळातील असतात त्या सेफॅलोपॉड या कुळातील हा एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण व दुर्मीळ जीव आहे. आतापर्यंत केवळ डझनभर वेळाच त्यांना पाहण्यात आल्याच्या नोंदी आहेत. स्क्विडची ही सर्वाधिक खोल ठिकाणी राहणारी प्रजाती आहे. हे जीव २० हजार फुटांपेक्षाही अधिक खोलीवर राहू शकतात, असे ओशन कॉन्झर्व्हन्सीने म्हटलेले आहे. या नव्या फुटेजमध्ये बिगफिनला चालत असताना पाहिले जाऊ शकते. हे चित्रीकरण समुद्राच्या पृष्ठभागापासून १०,८०० फूट खोलीवर करण्यात आले आहे. टोंगा ट्रेंचचा अभ्यास करण्यासाठी हे चित्रीकरण करण्यात येत होते व अपघातानेच त्यामध्ये बिगफिनलाही रेकॉर्ड करण्यात आले. ही एक सुदैवी घटना होती, असे संशोधकांनी म्हटले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे संशोधक ॲलन जेमीसन यांनी सांगितले की, या जीवाला पाहण्यासाठी आम्ही नेहमीच आतुर होतो. हा स्क्विड भक्ष्याच्या शोधात तळाशी जणू काही चालत होता आणि अचानक त्याने आपल्या लांबलचक भुजा आवरून वरच्या दिशेने प्रयाण केले. या स्क्विडचा देह आठ ते बारा इंच लांबीचा असतो. मात्र, त्याच्या भुजा देहाच्या तुलनेत अनेकपटीने लांब असतात. हे स्क्विड त्यांच्या अशा लांबलचक भुजांसह २६ फूट लांबीपर्यंतही वाढू शकतात.



# आठ अब्ज वर्षांनंतरची पृथ्वी कशी असेल?

आपल्या सर्वांच्या मनात भविष्याबद्दल जाणून घेण्याची इच्छा असते. भविष्यात काय दडलेले असेल याची उत्सुकता जवळपास सर्वांनाच असते; पण ज्या पृथ्वीवर आपण राहतो, त्या पृथ्वीबाबत आपण असा कधी विचार केला असेल तर त्याचे उत्तर तूर्तास कोणाकडेही नाही. हजारो आणि लाखो वर्षांनी पृथ्वी कशी दिसेल, असा प्रश्न जरूर पडेल. पण, त्याचेही उत्तर मिळणारे नसेल. अनेक ट्राईम ट्रॅव्हलर्स याबाबत अनेक दावे प्रतिदावे करतात. मात्र, त्यात वास्तवापेक्षा अफवाच जास्त आहेत. आता खगोलशास्त्रज्ञांना प्रथमच पृथ्वीची अशी झलक बघायला मिळाली, जी पाहून ते आश्चर्यचकित झाले आहेत. खगोलशास्त्रज्ञांना अंतराळात एक ग्रह सापडला आहे आणि त्यांचे असे म्हणणे आहे की, आठ अब्ज वर्षांनंतर आपली पृथ्वी त्या ग्रहाप्रमाणेच दिसेल.लाइव्ह सायन्सने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, केएमटी-२०२०-हीएलजी-०४१४ नावाचा हा ग्रह पृथ्वीपासून चार हजार प्रकाशवर्षे दूर सापडला आहे. हा खडकाळ ग्रह एका पांढऱ्या ताऱ्याभोवती फिरत आहे. हा तारा आपल्या सूर्यासारखा चमकत आहे. शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की, आपला सूर्य पाच अब्ज वर्षांनंतर या पांढऱ्या ताऱ्यासारखा दिसेल आणि आकुंचन पावेल. त्यापूर्वी त्याचं लाल महाकाय ग्रहात रूपांतर होईल. तो बुध, शुक्र आणि कदाचित पृथ्वीलाही गिळंकृत करेल. पण, जर पृथ्वी टिकून राहिली तर ती अंतराळात असलेल्या केएमटी-२०२०-हीएलजी - ०४१४ या ग्रहासारखी दिसेल. खगोलशास्त्रज्ञांचे हे संशोधन नेचर ॲस्ट्रॉनॉमी जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे.

# तेल उत्खनन कसे केले जाते?

अनेकांच्या मनात एक प्रश्न नक्कीच उद्भवतो की, पाण्यातून तेल काढलं कसं जातं? चारही बाजूनं पाणी असतं तर समुद्रातून कसं तेल काढलं जाईल. समुद्राच्या पाण्यात मोठमोठ्या बोटी सोडल्या जातात, जिथून तेल काढलं जातं. कधी कधी समुद्रात तेल काढण्यासाठी स्टेशन्सदेखील बांधले जातात. आपल्याला या सगळ्या गोष्टी जवळून पाहता तर येत नाहीत, पण आपण लांबून असे स्टेशन किंवा मोठ्या बोटी पाहतो, ज्यावर क्रेन्सदेखील लावलेले असतात. हे सर्व वरकरणी दिसत असले तरी समुद्रातून तेल कसे काढले जाते, या प्रश्नाचे उत्तर अर्थातच रंजक स्वरूपाचे आहे.



समुद्रातून तेल काढण्याची प्रक्रिया अनेक टप्प्यांत होते. आधी भूगर्भशास्त्रज्ञ आणि भूभौतिकशास्त्रज्ञांना समुद्राखाली तेलाचे साठे शोधावे लागतात. यासाठी ते भूकंप सर्वेक्षण, गुरुत्वाकर्षण सर्वेक्षण आणि चुंबकीय सर्वेक्षण अशा विविध तंत्रांचा वापर करतात. नंतर तेलाचे साठे सापडल्यानंतर, मोठ्या ड्रिलिंग रिगचा वापर करून समुद्रतळात छिद्र पाडले जाते. हे छिद्र तेलाच्या साठ्यापर्यंत पोहोचण्यासाठी पुरेसे खोल असते. ड्रिलिंग पूर्ण झाल्यावर, तेल पाण्यातून पृष्ठभागावर आणले जाते. यासाठी पंपांचा वापर केला जातो. यादरम्यान तेलासोबत गॅसही काढला जातो. काढलेले तेल नंतर पाईपलाईन किंवा टँकरद्वारे तेल शुद्धीकरण कारखान्यात नेले जाते. हे तेल जगभरातील ऊर्जेचे प्रमुख स्रोत बनते. तसेच अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत तेल उद्योगाचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर लाखो लोकांना रोजगारही उपलब्ध करून देतो. सौदी अरेबियासारख्या देशांची बहुतांश अर्थव्यवस्था तर या तेलाच्या साठ्यावर बहुतांश चालते.


# ऑफिस स्ट्रेस टाळण्यासाठी

सध्याच्या व्यस्ततेच्या जीवनात अनेक लोकांवर कामाचा ताण सतत वाढतोय. या वाढत्या कामाच्या दबावामुळे अनेकांना मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागतोय. अधिक ताण आणि दडपण केवळ आपल्या कामावर परिणाम करत नाही, तर आपल्या आरोग्यावरही याचे गंभीर परिणाम दिसू लागतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. हा ताण टाळण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

एका अहवालानुसार, जास्त कामाचा ताण चिंता, नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य समस्या वाढवू शकतो. कामाचा अतिरेक आणि तणावामुळे आपल्या वैयक्तिक जीवनावर तसेच शारीरिक स्वास्थ्यावरही विपरीत परिणाम होतो. सहसा लोक ८ तास ऑफिसमध्ये बसून काम करतात; पण यामध्ये तुम्ही मधल्या काळात ब्रेक घेणे खूप महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला तुमचे काम संगणक प्रणालीवर बसून करावे लागत असेल, तर त्याचा थेट परिणाम तुमच्या डोळ्यांवर होतो. यासाठी जेव्हा तुम्ही स्क्रीनसमोर बराच वेळ बसून काम कराल, तेव्हा मध्येच लहान ब्रेक घ्या. तसेच शक्य तेवढे पाणी प्यावे. खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि वाईट जीवनशैलीचा आपल्या आरोग्यावर खोलवर परिणाम होतो.



कामाच्या दबावामुळे, व्यक्ती आणखी तणावग्रस्त वाटू लागते. अनेक वेळा लोक त्यांच्या कामाचा इतका दबाव घेतात की, त्याचा थेट परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो. नियमित योग आणि ध्यान केल्याने मानसिक शांती मिळते आणि तणाव कमी होतो. जर तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल तर योगासने आणि ध्यान केल्याने तुमच्या शरीरातील रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. ध्यानामुळे स्ट्रेस हार्मोन कोर्टिसोलची पातळी कमी होण्यास मदत होते. आपण जितका जास्त कामाचा दबाव घेतो तितके आपले टेन्शन वाढत जाते. अशा वेळी तुम्ही तुमच्या आवडत्या कामांना प्राधान्य द्यावे आणि तुम्हाला जे करायला आवडते ते करा. यामुळे तुमचा ताण कमी होईल आणि तुम्हाला बरे वाटेल. तुम्हाला प्रवास करायला आवडत असेल तर कामातून ब्रेक घ्या आणि कुठेतरी बाहेर जा. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल आणि तुमचा ताण कमी होईल. जर तुमचा तणाव सतत वाढत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. वेळेत डॉक्टरांशी संपर्क साधा आणि योग्य वेळी उपचार सुरू करा.



## २०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार : पाणी प्रश्न सुटण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प

# चिखली जलशुद्धीकरण प्रकल्प 'फेज-2' च्या कामाचा 'श्रीगणेशा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराचा आगामी २५ वर्षांत वाढती लोकसंख्या गृहीत धरुन पाणी पुरवठा सक्षम होईल, असा आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पातील आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करुन वितरीत केले जात आहे. आता भामा आसखेड धरुणातून १६८ एमएलडी उपलब्ध करण्यासाठी चिखली जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या फेज-२ चे कामाचा "श्रीगणेशा" करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी जलवाहिनीचे काम अंतिम टप्प्यात असून, आगामी जून- २०२५ पर्यंत शहराला मिळेल, असे नियोजन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज या प्रकल्पाचे ऑनलाईन भूमिपूजन झाले. यावेळी शहरातील लोकप्रतिनिधी व महापालिका अधिकारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड नगरपरिषदेची स्थापना १९७० मध्ये झाली. त्यानंतर १९८२ मध्ये महानगरपालिका स्थापना झाली. त्यावेळीपासून शहराला केवळ पवना धरणातून पाणी पुरवठा केला जात होता. २०१३ मध्ये तत्कालीन काँग्रेस आघाडीच्या सरकारने आंद्रा, भामा आसखेड धरणातून २६८ एमएलडी पाणी आरक्षीत केले. मात्र, पाणी पुन:स्थापना खर्च न भरल्यामुळे सदर आरक्षण रद्द झाले होते. दरम्यान, २०१७ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने पिंपरी-चिंचवडला आंद्रा, भामा आसखेडचे पाणी आरक्षीत केले. २०१८ मध्ये सदर प्रकल्पाचे काम सुरू झाले.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी चिखली येथे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले. दि. १५ मे २०२३ रोजी हा प्रकल्प कार्यान्वयीत झाला. निघोजे- तळवडे येथील जॅकवेलमधून इंद्रायणी नदीतील पाणी उचलले जाते. त्यावर चिखली येथील प्रकल्पामध्ये प्रक्रिया करुन सदर पाणी भोसरी विधानसभा मतदार संघात वितरीत केले जात आहे.

> **"** शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करता आंद्रा, भामा आसखेड हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडसाठी 'जलसंजीवनी' ठरणार आहे. प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. दुसऱ्या टप्प्यातील २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाचे कामाचे भूमिपूजन होत आहे. आगामी जून- २०२५ पर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास आहे. समाविष्ट गावांतील पाणी समस्या सोडवण्यास मदत झाली झाली असून, नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण होत असल्याचे समाधान आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### दुसऱ्या टप्प्यातील काम प्रगतीपथावर...!

● प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये भामा आसखेड धरणातून मंजुर १६८ एमएलडी पाणी जॅकवेलमधून मौजे नवलाख उंब्रे प्रेशर टँकपर्यंत जलवाहिनीद्वारे आणणे तसेच, त्यानंतर ब्रेक प्रेशर टँकपासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रात आणणे व त्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. दि. १५ मार्च २०२४ रोजी या प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. तसेच, भामा आसखेड धरण ते नवलाख उंब्रे येथील बीपीटीपर्यंत (ब्रेक प्रेश टँक) पर्यंत १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन आणि नवलाख उंब्रे येथील 'बीपीटी' ते देहूपर्यंत १४०० मि.मी. व्यासाची ग्रॅव्हीटी मेन टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. काही ठिकाणी भूसंपादनामध्ये अडथळा असून, सदर काम प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत प्रशासन आगृही आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ टप्पा दोन क्षेत्रातील ७५ मी. रुंद रस्त्याच्या जागेसाठी भूसंपादनाचा प्रस्ताव एमआयडीसी उपविभागीय अधिकारी, मावळ यांच्याकडे प्रलंबित आहे. सदर प्रस्तावास परवानगी मिळाल्यास महानगरपालिका जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू करणार आहे.

### भामा आसखेडमध्ये 'जॅकवेल'च्या कामाला गती...

● भामा आसखेड धरणातून ६०.७९० द.ल.घ.मी. (१६८ एम.एल.डी.) इतक्या बिगर सिंचन पाणी आरक्षण कोट्यास महाराष्ट्र शासनाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस मंजुरी दिलेली आहे. त्या अनुशंगाने महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून मौजे वाकी तर्फे वाडा येथे भामा आसखेड धरणाजवळ अशुद्ध जलउपसा केंद्र बांधणे व त्यासाठी जॅकवेल, पंपहाऊस, ॲप्रोच ब्रीज, इंटेक चॅनेल बांधणे व विद्युत, यांत्रिकी, यासह इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. या कामाला प्रशासनाने गती दिली आहे.

---

Selected



## चाकण एमआयडीसीतील कारखाने टिकवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील


**चाकण :** चाकण एमआयडीसी परीसरातील वाहतूक जाम, रस्ते, अवजड वाहनांची पार्किंग, कचरा आदी महत्वाच्या विषयांवर पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची बैठक पार पडली. समस्या सोडविण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजना तसेच भविष्यातील आराखाडयाबाबत माहीती देण्यात आली. बैठकीस बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३, राजेंद्रसिंह गोर, सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग, अनिल कोळी, सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, सतिश चौडेकर, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी विभाग, संदेश चव्हाण, प्रादेशिक परीवहन अधिकारी, दिलीप शिंदे, उप अभियंता, एनएचएआय, निखील वाळके, सहा. कामगार आयुक्त, माथाडी बोर्ड, राम विजे नायब तहसिलदार, खेड, व जितेंद्र पगार, सेक्शन इंजिनिअर, पीएमआरडीए तसेच नितीन गिते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, देवेंद्र चव्हाण, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, खंडणी विरोधी पथक, प्रमोद वाघ, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन व दिगंबर सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, सामाजिक सुरक्षा विभाग, चाकण एमआयडीसीमधील टेट्रा पॅक कंपनीचे संतोष सोनटक्के व विशाल देशमुख, महेश खर्डेकर, मर्सिडीज कंपनीचे सारंग जोशी, न्यू हॉलंड कंपनीच्या शितल साळुंखे तसेच महाळुंगे व चाकण, एमआयडीसीमधील विविध कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

---

राष्ट्रसंचार मागणी रा

## बोपखेल उड्डाणपुलाला बाळासाहेब ठाकरेंचे नाव द्या

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील अनेक कामांचे उद्‌घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. यामध्ये बोपखेल येथील मुळा नदीवरील उड्डाणपुलाचा देखील समावेश होता. या बोपखेल उड्डाण पुलाला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याची मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.



पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी कामांचे उद्‌घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडले. यामध्ये पिंपरी ते पिंपळे सौदागरला जोडणारा उड्डाण पूल, पंतप्रधान आवास योजनेतील आकुर्डी आणि पिंपरी मधील सदनिका, आंद्रा भामा आसखेड जलशुध्दीकरण प्रकल्प तसेच बोपखेल मुळा नदीवरील उड्डाण पुलाचे उद्‌घाटन याचा समावेश होता. वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ही तमाम महाराष्ट्रातील जनतेची अस्मिता आहे. त्यामुळे या उड्डाण पुलाला नाव दिल्यामुळे निश्चितच सर्वांसाठी आनंदाची बाब असेल. त्यामुळे लवकरात लवकर या मागणीचा विचार करून यावर कार्यवाही करावी, अशी मागणी केली. या मागणीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. हा निर्णय घेतल्यास बाळासाहेबांच्या विचारांची आणि त्यांच्या योगदानाची आठवण कायम स्मरणात राहील असे ॲड. सचिन भोसले यांनी म्हंटले आहे. याप्रसंगी पिंपरी विधानसभा प्रमुख तुषार नवले, चिंचवड विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, जेष्ठ शिवसैनिक मंगलाताई घुले, शिवदूत नाथाभाऊ खांडेभराड, विभागप्रमुख प्रदीप महाजन, गोरख नवघणे, राहुल देवकर, विभाग संघटक शंकर कुऱ्हाडकर, श्रीकांत चौधरी यांच्यासह शिवसैनिक गजानन धावडे, अमोल देवकर, संतोष नानक, आकाश शिरसाठ, नवनाथ शिंदे उपस्थित होते.

---

## आरोग्य शिबीर

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा





### क्षयमुक्त भारतासाठी सर्वांनी एक पाऊल पुढे यावे

## नागरिकांनी मोहिमेत सहभाग घ्यावा – शत्रुघ्न काटे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** शत्रुघ्न (बापू) काटे युथ फाउंडेशन आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या सयुंक्त विद्यमाने हॉटेल गोविंद गार्डन पार्किंग, पिंपळे सौदागर या ठिकाणी BCG क्षयरोग (TB) विरुद्ध मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. क्षयमुक्त भारतासाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे येऊन "या" मोहिमेत सहभाग घ्यावा असे आवाहन माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी केले आहे. हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे मुख्य उद्देश्य म्हणजे जेष्ठ नागरिकांना क्षयरोग (TB) विरोधी BCG लस देऊन सुरक्षित करणे. बॅसिलस कॅल्मेट-गुएरिन (बीसीजी) ही लस प्रामुख्याने टीबी विरुद्ध वापरली जाणारी लस आहे. या लसीकरणासाठी ५ वर्षांपूर्वी क्षयरोग होऊन गेलेले, मधुमेहाचे रुग्ण, कुपोषित प्रौढ, TB रुग्णाच्या संपर्कात आलेले, धूम्रपान करणारे तसेच BMI कमी असणारे नागरिक लाभ घेऊ शकतात. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २०२५ पर्यंत संपूर्ण भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. या अनुषंगाने मनपा क्षेत्रातील १८ वर्षेवरील प्रौढ व्यक्तींना BCG लसीकरणाची मोहीम राबविण्यात आली आहे. यावेळी क्षयमुक्त भारतासाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे येऊन प्रत्येक नागरिकाने बीसीजी लस घेऊन क्षयरोगाला कायम स्वरूपी हद्दपार करण्याच्या या मोहिमेत सहभाग घ्यावा असे आवाहन माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी केले आहे. यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील नागरिकांनी या लसीकरण मोहिमेचा लाभ घेतला.

---

## ७७ व्या निरंकारी समागमाच्या सेवांचा विधिवत शुभारंभ

**पिंपरी :** या जगामध्ये अनेक प्रकारचे लोक राहतात. त्यांची भाषा, वेशभूषा, आहार, जात, धर्म, संस्कृती वेगवेगळे आहे. या सगळ्या विभिन्नता असूनही आपल्या सर्वांमध्ये एक गोष्ट सारखी आहे आणि ती म्हणजे आपण सर्व मनुष्य आहोत. आपला वर्ण कोणताही असो, वेशभूषा कशीही असो, देश कोणताही असो किंवा खाणे-पिणे कसेही असो; सर्वांच्या धमण्यांमध्ये एकसारखेच रक्त वाहत आहे आणि सगळे एकसारखाच श्वास घेत आहेत. आपण सर्व परमात्म्याची लेकरं आहोत. हीच भावना अनेक संतांनी वेगवेगळ्या समयी आणि वेगवेगळ्या ठिकाणी आपापल्या भाषेतून आपापल्या शैलीमध्ये 'समस्त संसार, एक परिवार' या संदेशाच्या रूपात व्यक्त केली. मागील सुमारे ९५ वर्षांपासून संत निरंकारी मिशन हाच संदेश केवळ प्रेषित करत आहे इतकेच नव्हे तर अनेक सत्संग आणि समागमांचे नियमितपणे आयोजन करुन या संदेशाचे जीवंत उदाहरण प्रस्तुत करत आहे. मिशनचे लक्षावधी भक्त यावर्षीही १६, १७ आणि १८ नोव्हेंबर, २०२४ रोजी संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे होऊ घातलेल्या ७७व्या वार्षिक निरंकारी संत समागमामध्ये पोहचून मानवतेच्या महाकुंभमेळ्याचे दृश्य साकार करणार आहेत. देश-विदेशातून येणारे भक्तगण जिथे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि सत्कारयोग्य निरंकारी राजपिता रमितजी यांचे पावन दर्शन घेऊन कृतार्थतेचा अनुभव घेतीलच, शिवाय एकोप्याने संत समागमातील शिकवणूकीतून आपली मनं उज्ज्वल करण्याचाही प्रयास करतील. या संत समागमाची भूमी समागमासाठी तयार करण्याच्या सेवेचा शुभारंभ आज ६ ऑक्टोबर रोजी प्रतिवर्षाप्रमाणे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

---

## एमपीएमएल कर्मचाऱ्यांना पहिला हप्ता मिळणार

**पिंपरी :** पीएमपीएमएलमधील कामगारांना सातवा वेतन आयोग २०२२ पासून आ. अमित गोरखे यांच्या प्रयत्नातून लागु करण्यात आलेला होता. पीएमपीएमएल कामगगारांना ६८ महिन्यांचा फरक ४ टप्यांत देणेबाबतचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आलेला होता. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी होण्यासाठी पीएमपीएमएलचे कामगार व कामगार संघटना आमदार सातत्याने मागणी करत होते. त्यास अनुसरून आ. अमित गोरखे यांनी सातव्या वेतन आयोगाचा प्रथम हप्ता देण्यासाठी पीएमपीएमएल, पुणे मनपा आयुक्त व पिं.चिं.मनपा आयुक्त यांच्या संपर्कात राहुन पुणे मनपा (६०% स्वामित्वानुसार) रु.८४.१५ कोटी. पिंपरी चिंचवड मनपा (४०% स्वामीत्वानुसार) र.रू. ५६.१० कोटी निधी दसऱ्यापुर्वी त्वरित पीएमपीएमएल ला वर्ग करण्याबाबत दोन्ही मनपा आयुक्त यांना सांगितले होते. त्यानुसार आज पीएमपीएमएलकडे दोन्ही मनपाकडुन निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. लवकरच फरकाच्या रक्कम वितरीत केली जाणार आहे. पुणे परिवहन महानगर महामंडळातील सर्व ११,००० कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. फरकाची रक्कम वितरीत करण्याबाबत केलेल्या प्रयत्नांमुळे पीएमपीएमएल कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असुन कामगार बांधवानी व कामगार संघटनानी आमदार गोरखे यांचे आभार मानले आहेत.

---

## शेकडो मुस्लिम बांधवांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** विधानसभेचे पडघम येत्या काही दिवसात वाजायला सुरुवात होईल यातच पिंपरी चिंचवड शहरातील शेकडो मुस्लिम बांधवांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्य कर्तृत्वावर विश्वास ठेवत पिंपरी चिंचवड शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात शिवसेना भवन, दादर मुंबई येथे प्रवेश केला. शिवसेनेचे पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर यांच्या उपस्थित हे प्रवेश झाले. यावेळी शिवसेनेचे उपनेते रवींद्र मिर्लेकर उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष ॲड. सचिन भोसले यांच्या कार्यकाळात शिवसेनेने जोरदार इनकमिंग सुरू झाली. यामध्ये पिंपरी चिंचवड मधील बड्या नेत्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये भाजप युवा मोर्चाचे चेतन पवार, राष्ट्रवादीचे संजोग वाघेरे, भाजपचे एकनाथ पवार यांचा समावेश आहे.

त्यातच विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आता शेकडो मुस्लिम बांधवांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची ताकद आणखी वाढल्याची पाहायला मिळत आहे.

उद्धव ठाकरे यांचे कार्य आणि त्यांची असलेली सर्वसमावेशक भूमिका यावर आम्ही शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे सांगितले. त्यामुळे येणाऱ्या काळात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात कार्यरत राहून धेयधोरणे पोहचवण्यासाठी काम करणार असल्याच्या भावना व्यक्त केल्या.

---

## नागरी सेवा सुविधांसाठी सुधारित दर निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या नगररचना व विकास विभागामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा सुविधांसाठी सुधारित दर निश्चित करण्यात आले असून या विषयांसह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या विशेष बैठकीत मान्यता दिली.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या बैठकीमध्ये महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. या विषयांना प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील तसेच महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर असून गेल्या २० वर्षात शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे.

---

### विरोधकांच्या टीकेवर लक्ष देऊ नका

# कोणतीही योजना बंद होणार नाही : अजितदादा पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** राज्याच्या तिजोरीत खडखडाट, राज्य दिवाळखोरीत निघाल्याची टीका विरोधक करत आहेत. त्याकडे लक्ष देऊ नका मी राज्याचा दहावा अर्थसंकल्प मांडला आहे. महाराष्ट्र राज्य मजबूत असून आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. देशात सर्वात जास्त वस्तू व सेवा कर (जीएसटी) महाराष्ट्राला मिळतो. त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने लाडकी बहीणसह कोणतीही योजना बंद करण्यात येणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहरातील विविध विकासकामांचे उद्‌घाटन, लोकार्पण आणि भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले. खासदार श्रीरंग बारणे, आमदार अण्णा बनसोडे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, पिंपरी-चिंचवड औद्योगिकनगरी आहे. त्यात शहराची लोकसंख्या वाढली आहे.

त्यामुळे मूलभूत गरजाचा पोहचवता आले पाहिजे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सुविधा पुरविताना ताण येत आहे. राज्याच्या विकासाचे इंजिन म्हणून शहराकडे पाहिले जात. पाण्याची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

लोकप्रतिनिधीच्या कामांना प्राधान्य द्यावे, अशी सूचना आयुक्तांना दिली. राहिलेली कामे जोमाने होतील, मेट्रोचे कामे लवकर कशी होतील, याकडे पाहिले पाहिजे. कायदा सुव्यवस्था चांगली राहिली पाहिजे. नागरिकांना मोकळेपणाने फिरता आले पाहिजे. कोणाकडूनही चुक होता कामा नये, दहशत, गुंडगिरी, दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, अशा सूचना पोलीस आयुक्त यांना दिल्या आहेत. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची विचारसरणी अंगिकरून आपण समाजात वावरले पाहिजे.

#रा

# पै. दीपक रोकडे 'तुतारी' फुंकणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क








**पिंपरी :** आगामी विधानसभा निवडणुकीत पैलवान दीपक सौदागर रोकडे हे पिंपरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी मिळवून निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याच्या तयारीत आहेत. नुकताच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला आहे.

पिंपरी चिंचवड शहराचा बेस्ट सिटी, कामगारांची उद्योगनगरी म्हणून नावलौकिक असला, तरी इतर भागाच्या मानाने पिंपरी विधानसभा मतदारसंघाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही. झोपडपट्टी पुनर्वसन विकास, रस्ते, पिण्याचे पाणी, रखडलेले एस.आर.ए. प्रकल्प, वाहतूक कोंडीची समस्या असे अनेक प्रश्न न सुटल्याने पिंपरीला इतर भागांच्या तुलनेत मागासलेपण आलेले आहे. हे प्रश्न सोडविण्याला आपले प्राधान्य असणार आहे. याचबरोबर निर्भय व सुदृढ निरोगी समाज घडविण्यासाठी व्यसनमुक्ती, तरूणांना खेळाकडे वळवून सुदृढ व निर्भय समाज उभारणीसाठी काम करायचे आहे. स्वच्छ नियमित पाणी पुरवठा, आरोग्य, महापालिका शाळांचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी काम करायचे आहे. विधानसभा हे निमित्त आहे. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विकासात खारीचा वाटा उचलायचा आहे. हे काम अविरत पुढे सुरूच राहणार आहे. पिंपरी विधानसभा निवडणुकीस मी इच्छूक आहे. मला संधी मिळाल्यास या संधीचे सोने मी नक्कीच प्रयत्न करीन. याचबरोबर पक्षश्रेष्ठींनी पक्षातील अन्य कुणाला संधी दिल्यास त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून पक्षाचा उमेदवार निवडून येण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर हे दीपक रोकडे यांचे मूळ जन्मगाव. तर कर्मभूमी पिंपरी. पिंपरी येथूनच त्यांनी बी.कॉम. पर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. वडील सौदागर रोकडे हे व्यावसायिक कॉन्ट्रॅक्टरसह खाजगी कंपनीत नोकरीस होते. आई सुवर्णा गृहिणी आहे. विद्यार्थी दशेपासूनच रोकडे यांनी पर्यावरण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती जनजागृती, स्वच्छता अभियान, वृक्ष संवर्धन या सामाजिक चळवळीच्या माध्यमातून कामास सुरुवात केली. माणसं जोडत त्यांनी पिंपरी चिंचवड व संपूर्ण जिल्ह्यातून नवभारत युवक विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांची मोठी फळी उभी केली आहे. याचबरोबर बुस्ट एज्युकेशन सोसायटीचे ते संचालक आहेत. शैक्षणिक क्षेत्रात बुस्ट एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांचे मोठे योगदान आहे. निसर्ग धरा पर्यावरण संस्थेचे ते अध्यक्ष आहेत.

## आयुक्तांकडून मान्यतेची मोहोर...

# पालिकेच्या 'या' अधिकाऱ्यांना पदोन्नती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे अभिनामाचे पद नव्याने निर्माण करणे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर आनंद गायकवाड, पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंता या पदावर सोहन निकम, विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता या पदावर महेश कावळे, संतोष दुर्गे, समीर दळवी तसेच जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ. वर्षा घोगरे आणि डॉ. शंकर मोसलगी, निवासी वैद्यकीय अधिकारी या पदावर लक्ष्मीकांत अत्रे आणि सहाय्यक आयुक्त या पदावर नाना मोरे यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्याच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिका सभेत मान्यता दिली.

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे अभिनामाचे पद नव्याने निर्माण करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरात आपत्ती संबंधीत घटकांचे नियोजन करण्यासाठी तसेच शहरातील आपत्ती विषयक बाबी हाताळण्यासाठी पूर्णवेळ आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदाची आवश्यकता होती. त्यानुसार महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर या पदाची निर्मिती करण्याचे प्रस्थावित होते. या विषयाला प्रशासक शेखर सिंह यांनी विशेष बैठकीत मान्यता दिली.

आपत्ती व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात समन्वयाची व मनुष्यबळाची आवश्यकता असते. आपत्ती काळात आणि युध्द पातळीवर काम करताना उपलब्ध साधनांचा सुयोग्य वापर, गोंधळ कमी व्हावा व सर्व स्तरावर सर्व घटकांमध्ये समन्वय राहावा यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या अभिनामाचे पद महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेत आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित आहे. पावसाळ्यात होणारी अतिवृष्टी, पूर परिस्थितीचा पूर्वानुभव, वादळे, संसर्गजन्य रोग, कारखान्यातील अपघात, रस्ते अपघात, इमारतींना आग लागणे, घरांना आग लागणे यासारख्या आपत्तीत जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणात होते. तसेच संसर्गजन्य रोगांचा नागरिकांच्या जीवास मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होतो, यासाठी नागरिकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे व आपत्ती परिस्थिती निर्माण झाल्यास प्रतिसाद देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, बचाव पथक निर्माण करणे आवश्यक साधनसामग्री व माहिती संकलित करून अद्यावत ठेवण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष पूर्व क्षमतेने व पूर्ण वेळ कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या अभिनामाचे पद नव्याने निर्माण करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आस्थापनेवर उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे रिक्त पद पदोन्नतीने भरण्यासाठी लेखाधिकारी या पदावरील अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कालावधी, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणकीय अर्हता, आणि शिस्तभंग विषयक कारवाई आदी सेवाविषयक तपशील पडताळून आणि शासन मान्यतेच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर आनंद गायकवाड यांची पदोन्नतीने सर्वानुमते शिफारस करण्यात आली होती.

पान १ वरून

### गरिबांचा भात होणार आता स्वादिष्ट व पौष्टिक

असल्याची माहिती केंद्रीय मंत्र्यांनी दिली. हा प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण होणार आहे.
केंद्रीय मंत्रिमंडळाने राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागात ४ हजार ४०६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह २ हजार २८० किमी लांबीचे रस्ते बांधण्यास मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, देशाच्या इतर भागांच्या बरोबरीने सीमावर्ती भागाच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी हा प्रकल्प आहे. सरकारच्या या निर्णयामुळे रस्ते, दूरसंचार संपर्क, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण सुविधांवर मोठा परिणाम होणार आहे. यामुळे ग्रामीण जीवनमानही वाढेल, प्रवास सुलभ होईल आणि महामार्गाच्या उर्वरित नेटवर्कशी या भागांची जोडणी सुनिश्चित होईल.

### जानकरांचे ते व्यक्तव्य वादात

असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, इंदापूर येथे शरद पवार यांच्या उपस्थितीत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी बोलताना माळशिरसचे नेते उत्तम जानकर यांनी गणेशाबद्दल आक्षेपार्ह व्यक्तव्य केले. त्यांनी हिंदू देवतांचा अवमान केला. मात्र, त्याला कोणीही हरकत घेतली नाही. त्याउलट सगळ्यांनी त्याला हसून दाद दिली. मात्र, या घटनेचा व्हिडिओ आता समाजमाध्यमांवर व्हायरल होत असून, त्याविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ देवस्थानला जाणाऱ्या शरद पवारांनी याबाबत स्वतः खुलासा करावा, अशी चर्चा सर्वत्र होत आहे.

### हडपसर मतदारसंघात उमेदवारीवरुन वाद

सेना आग्रही आहे. मात्र सेनेच्या पदरात निराशाच येणार असे चित्र दिसत आहे.
लोकसभा निवडणुकीत ज्या ठाकरे गटाने राष्ट्रवादीच्या आणि काँग्रेसच्या उमेदवारांना जिंकवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्या ठाकरे गटाला अशी अपमानस्पद वागणूक देणे. योग्य नसल्याचे शिवसैनिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या घडामोडी घडल्याने निवडणुकीपूर्वीच महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### रतन टाटांची प्रकृती चिंताजनक

सोशल मीडियाद्वारे सांगितले होते. आता पुन्हा त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती येत आहे. रतन टाटा यांना सोमवारी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर माध्यमांमध्ये बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. त्यानंतर रतन टाटा यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन तब्येतीची माहिती देण्यात आलेली होती. त्यात त्यांनी, "माझ्या आरोग्याबाबत पसरत असलेल्या अफवांची मला जाणीव आहे आणि हे दावे निराधार आहेत याची मी सर्वांना खात्री देतो. माझे वय आणि संबंधित वैद्यकीय परिस्थितीमुळे मी सध्या वैद्यकीय तपासणी करत आहे. त्यामुळे चिंतेचे कारण नाही. मी विनंती करतो की सार्वजनिक आणि माध्यमांनी चुकीची माहिती पसरवण्यापासून दूर राहावे.' अशी माहिती दिली होती. आता बुधवारी त्यांची पुन्हा त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती येत आहे.

### तरुणीचा अपघातात...

जागीच मृत्यू झाला. आरती सुरेश मनवाने (वय २३) रा. एरंडे होस्टेल भेलके नगर कोथरूड ही कोकण एक्सप्रेस हॉटेल येथून कर्वे रोडने डिव्हायडर वरून रोड क्रॉस करत होती. रस्ता ओलांडताना तिला डंपरची जोरदार धडक बसली. या धडकीमुळे तिचा जागीच मृत्यू झाला. तिचे वडील सुरेश मनवाणी यांना पोलिसांनी कळवले आहे. तसेच कोथरुड पोलिसांनी डंपर ताब्यात घेतला आहे.

### ३२ वर्षीय महिलेवर अत्याचार

अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला. ३२ वर्षे महिलेचे अपहरण करून कर्जतच्या जंगलात नेऊन तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला गेला. पीडित महिला पुण्यातील सहकारनगर भागामध्ये राहते. याप्रकरणी ३६ वर्षीय पुरुष आरोपी आणि ३२ वर्षे महिला आरोपी विरोधात सहकारनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला ही पुण्यातील सहकारनगर परिसरात आपल्या कुटुंबीयांसोबत राहते. या महिलेला तिच्या ओळखीच्या ३६ वर्षीय आरोपीने त्याच्या कारमध्ये बसवत कर्जतच्या जंगलात नेले आणि त्याठिकाणी तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. आरोपीने पीडित महिलेला हाताने मारहाण करत दोन दिवस घरात डांबून ठेवले होते.

## दिवाळीची खरेदी करायची तर चला प्रदर्शनाला भेट द्या!

# चिंचवडमध्ये "झेप" चे भव्य-दिव्य प्रदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**चिंचवड :** पिंपरी चिंचवडमधील सर्व नागरिकांच्या आवडीचे बॉण्ड आयोजित 'झेप' प्रदर्शन' या वर्षी १९ व २० ऑक्टोबर २०२४ ला चिंचवडे लॉन, चिंचवड येथे सकाळी १० ते रात्रौ ९ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. सर्व लहान व मोठ्या उद्योगांना एक मोठा प्लॅटफॉर्म मिळवा त्यांच्या उद्योगांना चालना मिळावी या हेतूने दरवर्षी दिवाळीपूर्व हे प्रदर्शन आयोजित केले जाते.

यामध्ये १०० हून अधिक स्टॉलचे भव्य प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे. नेहमीच झेप प्रदर्शनास ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळतो. यंदाच्या वर्षी देखील खाद्य पदार्थापासून ते कपड्यांपर्यंत सर्व काही एका छताखाली उपलब्ध होणार आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असणार आहे. दिवाळीच्या निमित्ताने महिला वर्गांमध्ये खरेदीचा उत्साह मोठ्या प्रमाणात असतो या पार्श्वभूमीवर या प्रदर्शनात खरेदी करण्याची पर्वणीच ग्राहकांना मिळणार असल्याचे आयोजकाडून सांगण्यात आले आहे. प्रदर्शनात अनेक सोयी सुविधा उपलब्ध होणार आहे. प्रवेश व पार्किंग फ्री असणार आहे.

तरुणाईच्या आवडते ३६० डिग्री, सेल्फी कॉर्नर, सेल्फी बूथ तर असेलच त्याच बरोबर नेल आर्ट, मेहंदी अश्या ॲक्टिव्हिटी ही असणार आहेत.

दिवाळी साठी लागणारी प्रत्येक वस्तू इथे रास्त भावात मिळणार आहे.याच बरोबर खुप मोठी खाऊ गल्ली हे या प्रदर्शनाचे आकर्षण असणार आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून या प्रदर्शनात ५ स्टॉल वेगळे असणार आहेत गोंद आदिवासी नागझरा जंगल, भंडारा येथे बनवलेल्या अनेक वस्तू, संपूर्ण बांबू केंद्र, मेळघाट या संस्थेच्या बांबू च्या वस्तू, ऊर्जा प्रतिष्ठान भोसरी च्या अंध मुलांनी रंगवलेल्या पणत्या,पुनरुत्थान गुरूकुलम ,चिंचवड या संस्थे मधील मुलांनी बनवलेल्या वस्तू तसेच छात्र प्रबोधन,पुणे चा स्टॉल हे या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट आहे. उत्तम दर्जाच्या वस्तू खरेदी करण्यासाठी सर्वांनी प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन बॉण्ड ग्रुपच्या वतीने केले आहे.

### राज्याला दहा...

एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष ४,८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होत आहेत. मुंबई, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ (ठाणे) अशा १० नवीन वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन काल पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाले. एकाचवेळी १० नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरु होणे ही गौरवास्पद बाब असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### संजय काकडे...

समरजित घाटगे, हर्षवर्धन पाटील यांच्यानंतर संजय काकडे यांनी भाजपची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवारांनी हर्षवर्धन पाटलांच्या हातात तुतारी देतानाच इंदापूरची उमेदवारीही जाहीर केली आहे. विधानसभेला दत्तामामा भरणे विरुद्ध हर्षवर्धन पाटील या सामन्याचीच एकप्रकारे घोषणा केली गेली आहे. देवेंद्र फडणवीसांचे कट्टर समर्थक असलेल्या समरजित घाटगे राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. यामुळे कोल्हापुरात भाजपला मोठा धक्का बसला आहे. इंदापुरात हर्षवर्धन पाटलांच्या हातात तुतारी दिल्यानंतर आता फलटणमध्ये अजित पवारांना धक्का देण्याची तयारी शरद पवारांनी केलीय. त्यासाठी १४ ऑक्टोबरचा मुहूर्तही काढण्यात आला आहे.

### वादाची 'वाळवी'

या सोहळ्याला हजेरी लावली नाही. यामुळे संपूर्ण मराठी सिनेविश्वाला खूप मोठा धक्का बसला आहे. भारतीय सिनेविश्वातील सर्वोच्च मानल्या जणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याला सिनेमाच्या टीमची गैरहजेरी आणि त्यामागील कारण कुणीच उघड न केल्याने सगळेचजण चकित झाले. ही अतिशय दुर्दैवी गोष्ट असल्याची भावना अनेक सिनेविश्वातील मान्यवरांनी आणि प्रेक्षकांनी व्यक्त केली.

Selected



### शालेय प्रवेशासाठी २४७ सूक्ष्म शिकवण केंद्रांचे कार्यान्वयन

**पिंपरी :** मलाबार समूहाच्या सध्या सुरू असलेल्या हंगर फ्री वर्ल्ड उपक्रमाचा एक भाग म्हणून, रस्त्यावरील मुलांना मूलभूत शिक्षण देण्यासाठी आणि औपचारिक शालेय शिक्षणात त्यांचे संक्रमण सुलभ करण्यासाठी देशभरात २४७ सूक्ष्म शिकवण केंद्रे (मायक्रो लर्निंग सेंटर्स -एमएलसी) सुरू करण्यात आली आहेत. आतापर्यंत, या केंद्रांमध्ये ११,७०० मुलांची नोंदणी करण्यात आली आहे, जिथे त्यांना एक वर्षाचे मूलभूत शिक्षण मिळते. जेणेकरुन त्यांना औपचारिक शिक्षणात परत येण्यास किंवा शाळेत प्रवेश घेण्यास मदत मिळते. या उपक्रमावर प्रत्येक मुलामागे साधारण १०,००० रुपये वार्षिक खर्च समूहाकडून केला जात आहे. मुंबईच्या पूर्व उपनगरांत, गोवंडी येथील टाटा नगर झोपडपट्टीत आयोजित एका समारंभात, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम. पी. अहमद यांनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून ११ राज्यांमध्ये १०१ सूक्ष्म शिकवण केंद्रांचे (एमएलसी) उद्घाटन केले. या कार्यक्रमातील मान्यवरांमध्ये मलाबार समूहाचे उपाध्यक्ष केपी अब्दुल सलाम, भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक ओ. आशर, समूह कार्यकारी संचालक ए.के. निषाद आणि स्वयंसेवी संस्था - 'थनाल'चे अध्यक्ष डॉ. व्ही. इद्रीस यांचा समावेश होता.

### महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे शिलाई मशीन वाटप व खेळ पैठणीचा



**पिंपरी :** ग.दी. माडगूळकर नाट्यगृह प्राधिकरण येथे नवरात्रीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना पिंपरी चिंचवड शहर यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलां बचत गटांना शहरांमध्ये शिलाई मशीनचे वाटप शर्मिलाताई राज साहेब ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी सरचिटणीस रिटा ताई गुप्ता नेते राजेंद्र बाबू वागस्कर सरचिटणीस किशोर शिंदे सरचिटणीस रणजीत शिरोळे सरचिटणीस गणेश आप्पा सातपुते शहर अध्यक्ष सचिन चिखले महिला शहर अध्यक्ष पुणे वनितााताई वागस्कर माजी नगरसेविका अश्विनीताई चिखले शहर अध्यक्ष सिमाताई बेलापुर उपस्थित होत्या. सन्मान नारीशक्तीचा स्त्री म्हणजे अभिमान प्रत्येक कुटुंबाची शान आदी ग्रंथामध्ये स्त्रियांचे महत्त्व लक्षात घेऊन सांगण्यात आले आहे की यत्र नार्यस्तु पुज्युन्ते रमन्ते तत्र देवता अर्थ जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तिथे देवता वास करतात महिलांना स्वयंरोजगार मिळावा स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबासाठी काम करत असताना त्यांना मदत म्हणून हा प्रयत्न पक्षाच्यावतीने करण्यात आला

महिलांना नोव्हेल कंपनीच्या शिलाई मशीन देण्यात आल्या चांगल्या दर्जेदार या शिलाई मशीनला कंपनीतर्फे एक वर्षाचे वॉरंटी आहे तसेच यावेळी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम महिलांसाठी घेण्यात आला या कार्यक्रमाचा महिलांनी आनंद घेतला मनोरंजन डान्स गाणी उखाणे विविध खेळ घेऊन निवेदक अक्षय मोरे यांनी कार्यक्रमाला चांगलीच रंगत आणली या कार्यक्रमासाठी १००० महिलांनी सहभाग घेतला होता येणार्या प्रत्येक महिलेला आकर्षक भेटवस्तू देण्यात आली प्रश्नमंजुषाद्वारे शंभर बक्षीस देण्यात आली

### डॉ.बाळासाहेब कल्हापुरेंचा दुहेरी सन्मान



**पिंपरी :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. बाळासाहेब बबनराव कल्हापुरे यांचा नुकताच त्यांच्या शैक्षणिक कार्यातील योगदानाबद्दल राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला. आपल्या प्रयोगशील तथा विद्यार्थीकिंद्री अध्यापन शैलीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या डॉ.कल्हापूरेंना दिल्लीतील आर्ट ऑफ गिविंग चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अखिल भारतीय विद्यापीठ व महाविद्यालयीत शिक्षक संमेलनात भारत शिक्षा रत्न हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासह समर्थ फाऊंडेशन, ठाणे तर्फे शिक्षण दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात त्यांना राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्काराने देखील गौरविण्यात आले. डॉ.कल्हापूरे रयत शिक्षण संस्थेमध्ये २५ वर्षांपासून कार्यरत असून त्यांच्याकडे वाणिज्य क्षेत्रात अध्यापनाचा गाढा अनुभव आहे. त्यांच्या या दुहेरी सन्मानानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात येते की, आमचे अशील नामे श्रीमती शांता बाळाजी मुळे रा. बढेमळा,शेवाळवाडी,ता.आंबेगाव, जि. पुणे यांचे पती नामे बाळाजी बाजीराव मुळे हे गावी दिनांक २०/०८/२०२४ रोजी आजारपणाने मयत झाले आहेत. त्यांच्या नावे महिंद्रा बोलोरो गाडी तिचा आर. टी.ओ. पिंपरी-चिंचवड, पुणे यांचेकडील पासिंग नं. MH 14 GN4107 असा असून चॅसी नं. MA1XK2WJXH2J63568 इंजिन नं. WJH6J70058 मॉडेल नंबर.MAHINDRA BOLERO POWER+ZLX MH सदर गाडी आमचे अशिलांचे पती मयत झाल्यामुळे आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करण्याची आहे. सदर गाडी आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करणेकामी कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी १५ (पंधरा) दिवसांच्या आत अस्सल कागदपत्रे आम्हास प्रत्यक्ष दाखवावीत व वरीलप्रमाणे मुदतीत कोणाची काही हरकत न असल्यास सदरील गाडी आमचे अशिलांचे नावे ट्रान्सफर करण्यात येतील. मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही.

श्रीमती शांता बाळाजी मुळे
दिनांक: १०/१०/२०२४

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः दौंड तालुका व गाव कोरेगाव ता. दौंड परिसरातील लोकांना कळविणेत येते की,

गाव मौजे कोरेगाव (भिवर), ता. दौंड, जि. पुणे येथील गट नं १९४/२ मधील ३ हेक्टर ६० आर क्षेत्र शेत जमीन मिळकत ही आमचे अशिल यांनी बापू गेनभाउ अवचिते व इतर ७ यांचेकडून साठेखताने खरेदी केलेली होती तसेच सदर मिळकतीचे सब रजिस्टार सो यांचे समोर रजिस्टर्ड कुलमुखत्यारपत्र करून दिलेले आहे. असे असताना बापू गेनभाउ अवचिते व इतर हे सदर मिळकतीवर त्रयस्थ इसमांचा हक्क, अधिकार निर्माण करू पाहत आहेत. **बापू गेनुभाउ अवचिते व इतर हे सदर क्षेत्र विक्री करण्याचे तयारीत आहेत,**

तरी सदर शेतजमीन मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारे गहान, दान, लिज, खरेदी, विक्री, बक्षीस, असा व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा आमचे अशिलांचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये याकरीता सदरची नोटीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

(ॲडव्होकेट)
ॲड. परिश बाबुराव रूपनवर
रा. बारामती ता बारामती, जि. पुणे
मो.नं. ८२०८९५१३५२

बारामती
दिनांकः ९/१०/२०२४

### जलाशय काठोकाठ भरल्यामुळे चराऊ भाग पाण्याखाली, खाद्यान्नाचा तुटवडा

# उजनीवरील पक्षी विखुरले जिल्ह्यातील पाणवठ्यांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी देवकर :** यावर्षी उजनी धरण अपेक्षापेक्षा लवकर म्हणजेच जुलै महिन्यातच पूर्ण क्षमतेने भरले आहे. यामुळे स्थानिक पक्षी खाद्या अभावी जिल्ह्यातील इतर पाणवठ्यांकडे स्थलांतर केल्याची माहिती पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी दिली.

उजनी धरण यावेळेस काठोकाठ भरल्याने काठावरील विविध पक्ष्यांचा चराऊ व पाणथळ जागा पाण्याखाली गेल्यामुळे चिखलात दडलेले पक्ष्यांचे प्रमुख खाद्य असलेले कृमी कीटक पक्ष्यांना सुलभपणे उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आपल्या उदरनिर्वाहासाठी चित्रबलाक, काळे व पांढरे शराठी, पाणकावळे, मुग्धबलाक, शेकाट्या, तुतुवार, लालगाल्या टिटवी चमचेचोच, राखी बगळे इत्यादी जलाशयाच्या काठावरील चिखलात वर्षभर वावरणारे स्थानिक पक्षी दिसेनासे झाले आहेत.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

वर्षभर वावर असलेले हे पक्षी आपल्या क्षुधाशांतीसाठी जिल्ह्यातील गाव तलाव, शेत शिवारातील पाण्याने भरलेल्या तालींसह नदी, ओढे व नाले या ठिकाणी विखरून गेले आहेत.

चिखलातील किडे, जलकीटक वेचण्यासाठी तसेच प्रसंगी काठावरील गुडघाभर पाण्यातील छोटे मासे पकडण्यासाठी लांब चोच व पाय असलेले पक्षी एकेकटे किंवा समूहाने तासनतास काठावर उभे ठाकून आपली भूक भागवून घेत असतात. चिखलात चरणाऱ्या या पक्ष्यांच्या समूहाला इंग्रजीत 'वेडर्स' (Waders) म्हणून ओळखतात.

येत्या काही दिवसात म्हणजेच नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यापर्यंत जिल्ह्यातील पाणवठे व शिवारातील तालींमधील पाणीसाठा कमी होत जातो. दरम्यान उजनी जलाशयातील पाण्याचाही विसर्ग सुरू केला जातो. परिणामी जलाशयाचे काठ उघडे पडून पक्ष्यांना चरण्यासाठी चिखलयुक्त किनारा तयार होतो. परिणामी जिल्हात विखुरलेले पक्षी उजनी धरणाच्या पाण्याच्या परिसरात परतून गर्दी करतील असा अंदाज पक्षी अभ्यासकांकडून व्यक्त केला जात आहे. याचबरोबर विदेशी पक्ष्यांच्याही आगमनाला सुरूवात होत असते.

> उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे धरण परिसरात वावरणारे पक्षी खाद्यान्नाच्या कमतरतेमुळे जिल्ह्यातील आष्टी, हिप्परगा (एखरूक), कुरकूर धरण, मांगी तलाव, शिरनांदगी, पडोळकरवाडी, निमगाव (मगराचे), फोंडशिरस, एखतपूर, बुद्दीहाळ, चिंचोळी इत्यादी मोठ्या पाणवठ्यावर खाद्य मिळविण्यासाठी विखरले गेले आहेत. उजनीतील पाणी कमी झाल्यावर येत्या हिवाळ्यात स्थानिक पक्ष्यांबरोबर स्थलांतरित पक्षीही मोठ्या संख्येने गर्दी करतील.
> **- डॉ. अरविंद कुंभार,** ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक.

## राजगुरुनगरात भाजपचा जल्लोष



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर शहरात भाजपा वतीने जल्लोष साजरा करण्यात आला. "हरियाणा तो झाकी है, महाराष्ट्र अभी बाकी है" अशा घोषणा देत फटाके फोडून मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना तालुका सरचिटणीस अक्षय प-हाड म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने राज्यात राबवलेल्या लोककल्याणकारी योजना आणि सर्वांगीण विकास जनतेसमोर ठेऊन निवडणूक लढवली. भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात लढवलेल्या या निवडणुकीत मोदींची लाट नव्हे तर त्सुनामी अजून कायम असल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे.

# फेसबुकवरुन पन्नास लाखांना गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील इसमाला फेसबुकवरून झालेल्या ओळखीतून एका परप्रांतीयाने ऑनलाईन पैसे गुंतवून जादा नफा देण्याचे आमिष दाखवत तब्बल ५० लाख ५० हजारांना गंडा घातल्याची घटना घडली. शिक्रापूर पोलिसांनी सिरपा थापर या परप्रांतीय इसमावर गुन्हा दाखल केला आहे.

शिक्रापूर येथील योगेश पवार यांना त्यांच्या फेसबुकवर सिरपा थापर याने मेसेज पाठवून व्यवसायाबाबत चर्चा करुन मी ऑनलाईन गुंतवणूक करुन लाखो रुपये नफा कमवत असल्याचे दाखवले. एक लिंक पाठवून त्यामध्ये पैसे गुंतवण्यास सांगितले. योगेश यांनी त्या लिंक मध्ये पन्नास हजार रुपये गुंतवले असता, दुसऱ्या दिवशी त्यांना चौदा हजार रुपयांचा नफा मिळाल्याचे दिसले. योगेश यांनी काही रक्कम काढून घेतल्याने, त्यांचा त्यावर विश्वास बसला. त्यानंतर योगेश यांनी सिरपा थापर याने दिलेल्या खात्यावर बँकेतून वेळोवेळी पन्नास लाख रुपये ट्रान्सफर केले, मात्र पन्नास लाख रुपये गुंतवल्यानंतर सदर इसमाने पाठवलेली लिंक ओपन होत नसल्याचे लक्षात आल्याने योगेश यांनी त्या इसमाला संपर्क करत मला पैसे काढायचे असल्याचे सांगितले, मात्र तुमच्या खात्यावर एक कोटी रुपये झाल्याशिवाय पैसे काढता येणार नसल्याचे सांगत सिरपा थापर याने बोलण्यास टाळाटाळ केली, त्यानंतर सिरपा थापर याच्याशी संपर्क होत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

योगेश दिनकर पवार (३५, रा. बजरंगवाडी शिक्रापूर ता. शिरुर यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सिरपा थापर (रा. लखनौ, गौतमीनगर, उत्तरप्रदेश) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दोषींवर कारवाई होईपर्यंत मागे हटणार नाही, पीडीत शेतकरी राऊत यांचा निर्धार

# भूमी अभिलेख व महसूल खात्याच्या भ्रष्टाचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** जागा मालकाच्या मूळ जागेवर घर बांधलेले असताना ती जागा शेजारच्या गटात दाखवली. जमिनीची शासकीय मोजणी करणाऱ्या तीन कर्मचाऱ्यानीच शेजारी जागा असणाऱ्यांसोबत संगनमत करून परस्पर खोटी मोजणी केली. घर शेजाऱ्याच्या जागेवर बांधले असल्याचं कागदोपत्री दाखवून ते कागदपत्रे कोर्टातही सादर करत फसवणूक केली. त्यांच्यावर जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचा निर्धार राउतवाडी लवळे येथील पीडित शेतकरी अरुण राऊत यांनी केला. राऊत यांचे राउतवाडी लवळे, ता. मुळशी येथे गट नंबर ४१३ येथे दहा गुंठे जागा आहे. त्याला लागूनच गट नंबर ४३० असून त्या गटात घर बांधल्याचे नकाशात दाखवत आहे. पण ही शुद्ध फसवणूक झाली आहे. याबाबत २००६ साली शासकीय मोजणी झाली, ती मोजणी भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी हेमंत निगडे यांनी केली. आणखी दोन वेळा झाली, पण ती चुकीची आहे. २०२३ ची मोजणी प्रसाद तरटे आणि अंकुश जाधव यांनी केली. ही मोजणीही नकाशातील सरळ लाईन त्या दोघांनी वाकडीतिकडी केली व माझ्या घरावर तिरकी लाईन उडवली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मी दोषींच्या कारवाईवरती ठाम आहे. सोमवार १२ मार्च पासुन या विषयाचा पाठपुरावा करतोय तरीही कुठल्याही प्रकारची हालचाल अद्यापपर्यंत झालेली नाही. माझ्यावर अन्याय या तीन दोषींमुळे झालाय. माझी या भ्रष्ट अधिकाऱ्यांना घरी बसवण्याची मागणी मुख्यमंत्र्यांना करत आहे. मोजनी अधिकारी इतके बिनधास्त आणि मोकाट कुणाच्या आशिर्वादाने झाले आहेत याची चौकशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली पाहीजे, अन्यथा मी माझा जीव गेला तरी थांबणार नाही. माझ्यावर कुठल्याही प्रकारचा दबाव आणू नये, असा इशारा लवळे येथील पीडित शेतकरी राऊत यांनी दिला.

> मी तालुक्यातील शेतकऱ्यांना आवाहन करतोय की माझ्या सारख्या ज्या शेतकऱ्यांना भूमी अभिलेखकडून अडचणी आल्या असतील त्या शेतकऱ्यांनी माझ्याशी संपर्क करून उपोषणात सामील व्हावे. भूमिअभिलेख मोजणी आधिकारी फक्त बिल्डर आणि उद्योगपतीचीच कामे करतात. सामान्य शेतकऱ्यांची कामे माझ्यासारखी खूप प्रलंबीत आहेत यांची शासनाने चौकशी करावी. **- अरुण राऊत,** तक्रारदार तथा शेतकरी, राउतवाडी लवळे, ता. मुळशी, जि. पुणे

## पाबळच्या ट्रक चालकाची मुलगी शिक्षणासाठी लंडनला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** पाबळ (ता. शिरूर) येथील ट्रक ड्रायव्हर असलेले फत्तुभाई तांबोळी यांची मुलगी फरजाना तांबोळी हिची लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स यांचे वतीने सोशल इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिप या विषयासाठी पुढील दिड वर्षांच्या उच्च शिक्षणासाठीची स्कॉलरशीप जाहीर होऊन ती नुकतीच लंडनला रवाना झाली. दिड वर्षांचा संपूर्ण खर्च लंडन स्कूल करणार असल्याने फरजानाने गावची शान वाढवल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

पाबळ येथील ट्रक ड्रायव्हर असलेले फत्तुभाई तांबोळी यांनी व्यवसाय सांभाळून त्यांनी सन १९७१ पासून विज्ञान आश्रमचे संस्थापक दिवंगत डॉ. एस. एस. कलबाग यांचे सोबत अक्षरशः शिष्य म्हणून विज्ञान आश्रमातही काही प्रकल्पांत कामे केली. त्यांची परंपरा मुलगी फरजाना हिने चालविली आणि एम. ए. करताना विज्ञान आश्रमातील ग्रामिण तंत्रज्ञान पदवीका साठी अध्यापक म्हणून राहत तीने एमबीए पूर्ण केले. दरम्यान तिचा अभ्यासध्यास तिला थेट लंडनला घेवून गेला. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये तिला सोशल इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिप साठी चेव्हनिंग स्कॉलर शीपसाठी तिची निवड झाली असून, तिला लंडनला निमंत्रित केले. ती नुकतीच रवानाही झाली.

# कांदा उत्पादकांचा मेळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर :** येथील कांदा व लसूण संशोधन संचालनालयामध्ये शास्त्रज्ञ - शेतकरी - उत्पादक कंपनी व निर्यातदार संवाद आयोजित करण्यात आला होता.

कांद्यातील अस्थिर बाजारभावामुळे शेतकऱ्याला शाश्वत किंमत मिळत नाही. तसेच शेतकऱ्यापासून ग्राहकांपर्यंत कांदा व शेतमाल पोहोचेपर्यंत पुरवठा साखळीतील अनेक मध्यस्थांमुळे ग्राहकाने मोजलेल्या रुपयामध्ये शेतकऱ्याचा वाटा हा नगण्य असतो. मध्यस्थी व्यापारी वाहतूकदार यांचा वाटा मोठा असतो. ही पुरवठासाखळी कमी करण्यासाठी कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने पुढाकार घेऊन एक दिवसीय निर्यातक्षम कांदा उत्पादनावर प्रशिक्षण तसेच शास्त्रज्ञ शेतकरी शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कांदा प्रक्रिया व निर्यातदार यामध्ये संवाद आयोजित केला. याप्रसंगी अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील ५० शेतकरी, निर्यातदार, कांदा व लसूण संशोधन संचालनाचे सर्व शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे शास्त्रज्ञ डॉ. विवेक भोईटे, निर्यातदार हसन शफीक यांनी सहभाग नोंदविला.

> शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला शाश्वत बाजार भाव मिळावा यासाठी निर्यातदार व शेतकरी यांना प्रत्यक्षरीत्या जोडून शेतकऱ्यांकडून प्रक्रिया पूरक तसेच निर्यातक्षम कांदा उत्पादन करण्याचे प्रशिक्षण देऊन उच्च गुणवत्तेचा कांदा शेतकऱ्यांतून उत्पादित करून तसेच शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत एकत्र करून हे शेतकरी निर्यातदाराशी व प्रक्रिया उद्योगाशी जोडले गेल्यास शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो." **~ डॉ. विजय महाजन** (संचालक, कांदा व लसूण संशोधन संचालनालय, खेड.)

कार्यक्रम समन्वयक व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजीव काळे यांनी सांगितले की, नवीन सुधारित तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्यावर तसेच त्यांना प्रक्रिया उद्योगाची आणि निर्यातदारांशी जोडून शाश्वत बाजारपेठेची निर्मिती करण्यासाठी संस्था प्रयत्न करत आहे. निर्यातक्षम कांदा उत्पादनासाठी सुधारित वाण खत व पाणी व्यवस्थापन कीड व रोग व्यवस्थापन तसेच साठवणूक आणि प्रतवारी या विषयांवरती शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन, शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत प्रशिक्षण दिलेल्या शेतकऱ्यांकडून प्रक्रिया क्षम व निर्यातक्षम कांदा प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांना पूर्व निश्चित बाजारभावाने दिला जाणार आहे. डॉ. शैलेंद्र गाडगे यांनी आभार व्यक्त केले.

# चोरट्यांचा कपड्याच्या दुकानावर डल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सध्या दिवाळीनिमित्त दुकानात नवीन कपडे साठवण्याची दुकानदारांची लगबग सुरू असताना एका कपड्याच्या दुकानात दिवाळीपूर्वीच चोरट्यांनी डल्ला मारून हजारो रुपयांचे कपडे चोरल्याची घटना घडली. शिक्रापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

पारोडी (ता. शिरुर) येथे संतोष सातकर यांचे शार्वील टेक्सटाइल मार्केट नावाने कपड्याचे दुकान असून, सायंकाळच्या सुमारास ते दुकान बंद करुन घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते दुकान उघडण्यासाठी आले असता, दुकानाचे शटर उचकटलेले दिसले. त्यांनी दुकानात पाहणी केली असता, सत्तर हजार रुपये किमतीचे कपडे व पाच हजार रुपये रक्कम चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याबाबत संतोष सातकर यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिलू असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला.

### शरद पवार यांचे प्रतिपादन

# पुरंदरचा गौरवशाली वारसा लोकप्रतिनिधी चालवत आहेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** पुरंदर तालुक्याला धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक असा एक गौरवशाली वारसा असून, हा वारसा पुरंदरचे आमदार आणि या भागाचे खासदार पुढे चालवत आहेत. आजपर्यंत त्यांनी एकत्रच सामाजिक काम केले आहे. यापुढेही असेच काम चालू राहील, असे प्रतिपादन शरद पवार यांनी केले. भविष्यात महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपल्याला राज्यात परिवर्तन घडवून आणायचे आहे. आपण एकत्र होतो, आहोत आणि पुढेही एकत्रच राहू, असेही ते म्हणाले.

येथील विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन खा. शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार सुप्रिया सुळे होत्या. पुरंदर हवेलीचे आ. संजय जगताप यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, राज्यात दररोज नवनवीन योजनाची घोषणा होताना दिसत आहे. मात्र त्या योजना सूरू कधी होणार याची खात्री नाही. एकीकडे योजनाची घोषणा करायची आणि दुसरीकडे कंत्राटदारांची बिले थकवायची अशी स्थिती आहे. आजमितीला राज्यातील विकास कामांच्या योजनाची सुमारे ४८ हजार कोटी रुपये या सरकारने थकवलेली आहेत. उद्या कंत्राटदारांना आंदोलन करण्याची वेळ येईल, अशी वस्तुस्थिती निर्माण झाली आहे. योजना जाहीर करून सवंग लोकप्रियता मिळवतानाच राज्याच्या अर्थकारणाची जबाबदारी घ्यायला हवी. सरकार एकीकडे लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपयांची मदत करीत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा एवढी बिघडलेली आहे की, एकेकाळी विद्येचे माहेरघर म्हणून ओळख असणाऱ्या पुण्याची ओळख कोयता गँगच्या नावाने होऊ लागली आहे. देशभरात एक प्रगतीशील राज्य म्हणून ओळख असणारे राज्य आता मागे पडू लागले आहे, असा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की हे सरकार मागे पडलेले आहे. परिवर्तनाशिवाय आता पर्याय नाही, असेही ते म्हणाले.

यावेळीजेजुरी गरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे, दिलीप बारभाई, नगरसेवक नगरसेविका, पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## » Selected



नवरात्रोत्सवात माहेरी आलेल्या मुलींचा सन्मान - स्त्रीशक्तीचा जागर

## सह्याद्रीचे शंभूराजे प्रतिष्ठानकडून स्त्रीशक्तीचा जागर

**शिक्रापूर :** नवरात्रोत्सवाची सर्वत्र धामधूम सुरु असताना, अनेक ठिकाणी महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडत असल्याने शिक्रापूरातील करंजे सह्याद्रीचे शंभूराजे प्रतिष्ठान स्त्रीशक्तीचा जागर करत सर्वत्र महिलांचा आदर व सन्मान करणारे सामाजिक संदेश देणारे फलक लावले. तसेच विवाहित मुलींना पतीसह निमंत्रित करत त्यांच्या हस्ते आरती करुन फेटे बांधून सन्मानित करत स्त्रीशक्तीचा जागर केला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील सह्याद्रीचे शंभूराजे प्रतिष्ठानकडून स्त्री शक्तीचा जागर करत महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराबाबत प्रबोधन करत सामाजिक संदेश देणारे फलक लावले आहेत. बदलापूरसारख्या दुर्दैवी घटना घडू नयेत, यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने बाल लैंगिक अत्याचार जनजागृती कार्यक्रम आयोजित केले आहेत. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असल्याचे दिसत आहे.



## नवरात्रोत्सवाच्या निमित्त बाल विकास मंदिर येथे नवदुर्गांचा सन्मान

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला तसेच शाळेतील विद्यार्थिनींचे कन्या पूजन करण्यात आले.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने बाल विकास मंदिर शाळेत विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला. यात, विजया गायकवाड (शिक्षिका), विशाखा जगताप (फार्मसिस्ट), डॉ. माधुरी जगताप (डॉक्टर), सरिता पाटील (इंजिनिअर), तेजस्विनी जगदाळे (आर्टीस्ट), प्राजक्ता कुदळे (परिचारिका), धनश्री लोमटे (कथ्थक शिक्षिका ), मंजुषा चोरामले (शिक्षिका), स्वरा इनामके (राष्ट्रीय बॉल बॅडमिंटन खेळाडू) या सर्व नवदुर्गांचे इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनींनी पूजन करून भेटवस्तू दिल्या. नवरात्रोत्सवात कन्या पूजनाला महत्त्व लक्षात घेता शाळेत कन्यापूजन करण्यात आले. यासाठी विद्यार्थिनीच्या माता पालकांना शाळेत आमंत्रित करण्यात आले होते. माता पालकांनी आपल्या कन्येचे पूजन करून त्यांना भेटवस्तू दिल्या.

शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अतिशय उत्साहाच्या वातावरणात शाळेत नवदुर्गा व कन्यापूजनाचा कार्यक्रम पार पडला. नवदूर्गांचा परिचय शीतल चौधरी यांनी करून दिला. कन्यापूजन विषयी माहिती शाळेतील शिक्षिका अश्विनी कदम यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र महाजन यांनी केले, तर आभार माधुरी जगताप यांनी मानले.

## सणसवाडी ग्रामपंचायत सदस्याचा अपघाती मृत्यू

**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय हरगुडे यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झालेले असतानाच, निकिता हरगुडे या ग्रामपंचायत सदस्या युवतीचे अपघाती निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



सणसवाडी येथील ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय हरगुडे हे रस्ता ओलांडत असताना, समोरून आलेल्या वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात जून मध्ये त्यांचे अपघाती निधन झाले. दि. ६ ऑक्टोबर रोजी सणसवाडी ग्रामपंचायत सदस्य निकिता हरगुडे ही पुणे नगर महामार्गावरील कल्याणी फाटा येथे कंपनीमध्ये जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना, अहमदनगर बाजूने पुण्याच्या दिशेने चाललेल्या दुचाकीची निकिताला धडक बसून ती रस्त्यावर पडली. यात तिच्या डोक्याला मार लागल्याने, तिच्यावर पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. निकिता हिचे उपचारा दरम्यान निधन झाले. महिन्यात पुन्हा ग्रामपंचायत सदस्य युवतीचा अपघाती मृत्यू झाल्याने, परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

#रा

## मतदारांमध्ये : जोरदार चर्चा

# आता इंदापूर तालुक्यात तुतारीचा आवाज वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर** : इंदापूर तालुक्यात विधानसभेच्या निवडणुकीची रंगीत तालीम सुरू झाली असून, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी शरदचंद्र पवार गटामध्ये प्रवेश केल्यामुळे तालुक्यात सध्या तुतारीचा आवाज वाढला आहे, असे मतदारांमधून बोलले जात आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी भारतीय जनता पार्टीला रामराम ठोकुन नुकताच शरद पवार गटामध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर हर्षवर्धन पाटील यांच्याबरोबर असणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांनी देखील शरद पवार गटामध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे तालुक्यामध्ये या पक्षाची ताकद सध्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये निवडून येण्यासाठी पाटील यांच्या कार्यकर्त्यांची बऱ्याच दिवसापासून पाटील यांनी शरद पवार यांच्या गटांमध्ये प्रवेश करावा, अशी मागणी केली होती.





हर्षवर्धन पाटील यांच्या तालुक्यातील सर्वसाधारणपणे सर्वच कार्यकर्त्यांनी शरद पवार गटामध्ये प्रवेश केल्यामुळे या पक्षाची सध्या तरी तालुक्यात ताकद वाढलेली आहे. हर्षवर्धन पाटील यांना मानणारी तालुक्यात मोठी व्होट बँक असून, ही व्होट बँक आता शरद पवार यांच्या व्होट बँकेत जाऊन मिळाली आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यात सध्या तरी तुतारीचा आवाज मोठ्या प्रमाणात वाढल्याची चर्चा सर्वसामान्य मतदारांमध्ये सुरू झाली आहे. इंदापूर तालुक्यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीत दुरंगी किंवा तिरंगी लढत होण्याची शक्यता असून, दुरंगी लढत झाली तर कोणाला फटका बसेल व तिरंगी लढत झाली तर कोणाला फटका बसेल याबाबत देखील तर्कवितर्क मांडले जात आहेत.

तालुक्यातील विधानसभेची निवडणूक दुरंगी होणार का तिरंगी याबाबतचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. तुतारी गटातून हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शरद पवार गटातील जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, सोनाईचे संचालक प्रवीण माने, कर्मयोगी साखर कारखान्याचे संचालक भरत शहा यांनी विधानसभेच्या निवडणुकीत सवता सुभा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या गटाचा विधानसभेच्या निवडणुकीत तुतारीला कितपत फटका बसेल याची शक्यता तपासून बघितली जात आहे. तुतारी गटात झालेली ही बंडखोरी रोखण्यास शरद पवार व हर्षवर्धन पाटील यांना कितपत यश मिळेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एकीकडे विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे यांनी आपल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली असून, भरणे कुटुंबियातील अनेक सदस्यांनी प्रचारामध्ये भाग घेतलेला आहे. त्यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. तुतारीचा आवाज कमी करण्यासाठी आमदार दत्तात्रय भरणे हे कोणती राजकीय खेळी वापरतात याकडे लक्ष आहे. आमदार भरणे यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून उमेदवारी असल्याने अजित पवारांच्या डावपेचाकडे देखील तालुक्यातील जाणकारांचे लक्ष आहे.

## नरभक्षक बिबट्याला पकडण्यासाठी : २५ पिंजरे व १० ड्रोन कॅमेरे

# बिबट्याच्या हल्ल्यात पिंपरी पेंढार येथे महिला ठार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव** : जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार येथील पीरपट येथील सुजाता रवींद्र डेरे (४०) या महिलेवर बिबट्याने हल्ला करून जागीच ठार केले. ही घटना बुधवारी रोजी पहाटे ५.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत वन विभागाकडून समजलेली माहिती अशी की, बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेली महिला सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घराबाहेर झाडलोट करीत असताना, बाजूच्या सोयाबीनच्या वावरात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक महिलेवर हल्ला करून मानेला चावा घेऊन बाजूच्या शेतात ओढून घेऊन जात असताना या महिलेचे पती रवींद्र डेरे यांनी पहिल्यावर आरडाओरड केला. परंतु बिबट्या महिलेला काही सोडत नव्हता. अखेर त्यांनी बाजूला पडलेला बांबू बिबट्याच्या डोक्यात मारल्याने बिबट्या महिलेला सोडून बाजूच्या उसाच्या शेतात पळून गेला. दरम्यान रवींद्र डेरे यांनी आपल्या पत्नीवर बिबट्याचा हल्ला झाल्याचे आजूबाजूच्या लोकांना व वन विभागाला तात्काळ कळविले.



घटनेचे गांभीर्य ओळखून वन विभागाचे अधिकारी अमोल सातपुते, स्मिता राजहंस, प्रदीप चव्हाण व पन्नासहून अधिक लोकांची टीम घटनास्थळी दाखल झाली. तसेच जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर व विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर हेही घटनासाठी आले. तातडीने रुग्णवहिका बोलविण्यात आली व बिबट्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेला दवाखान्यात हालवण्यात आले परंतु या महिलेचा मानेला गंभीर खोलवर दुखापत झाल्याने उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, घटनास्थळी जुन्नरचे आमदार अतुल बेनके, माजी आमदार शरद सोनवणे, देवराम लांडे यांनी घटनास्थळी भेट देऊन डेरे कुटुंबियांचे सांत्वन केले. दुपारी दोन वाजता पिंपरी पेंढार येथील स्मशानभूतीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

जुन्नर तालुक्यात बिबटयाच्या हल्ल्यात गेल्या पाच महिन्यात अनेकांचे बळी गेले आहेत. परंतु वन विभाग बिबट्याचा बंदोबस्त करण्यात अपयशी ठरल्याने माजी आमदार शरद सोनवणे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. पालकमंत्री अजित पवार व आमदार अतुल बेनके यांनी जुन्नरच्या जनतेची फसवणूक केली आहे. त्यामुळे अनेकांचे बळी बिबटयाच्या हल्ल्यात जात आहे. यापुढे मी हे सहन करू शकत नाही. त्यामुळे मी आज पासून पिंपरी पेंढार परिसरात ज्या भागात बिबट्यांचे हॉट स्पॉट आहे, तेथे तंबू ठोकून तेथेच मुक्काम करून तीव्र आंदोलन करणार आहे. आठ दिवसांच्या आत जुन्नर तालुक्यातील सगळे बिबटे वन खात्याने पकडावेत व त्यांना दुसऱ्या राज्यात जंगलात सोडून देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनीही घटनास्थळी भेट देऊन बिबट्याला पकडण्यासाठी सूचना दिल्या आहेत.

# कौशल्याधिष्टित शिक्षणासह रोजगार निर्मितीवर शासनाचा भर; अजित पवार यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती** : विद्यार्थ्यांवर देशाचे भवितव्य अवलंबून असून आजच्या स्पर्धात्मक युगात त्यांनी पारंपरिक शिक्षणाऐवजी कौशल्याधिष्टित शिक्षण घ्यावे, यादृष्टीने कौशल्याधिष्टित शिक्षण आणि रोजगार निर्मितीवर राज्यशासन भर देत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

माळेगाव बु. येथे आयोजित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामांतर सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी




डॉ. अनिल बागल, नगर पंचायत मुख्याधिकारी बालाजी लोंढे, प्राचार्य अवधूत जाधवर, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रणजीत तावरे, दत्तात्रय येळे, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष केशवराव जगताप, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना समाज सुधारक, सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची नावे देण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आला आहे. त्यानुसार जिल्ह्यात औंध येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला छत्रपती शिवाजी महाराज तसेच महिला शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला सावित्रीबाई फुले आणि माळेगाव (बु) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला अनंतराव पवार असे नावे देण्यात आले आहे.

बारामती येथील पवार घराण्याची सामाजिक कार्याची गौरवशाली परंपरा आणि समृद्ध वारसा आहे. सामाजिक विकासात अनंतराव पवार यांचे मोलाचे योगदान दिले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला अनंतराव पवार यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या नावाला साजेसे असे काम या संस्थेच्या माध्यमातून करण्यात यावे. या संस्थेच्या रस्त्यासह आदी पायभूत सुविधे करीता १ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. माळेगाव परिसराचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# नाकर्त्या सरकारच्या विरोधात शरद पवार गटाचे आंदोलन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली** : राज्यातील स्त्री सन्मानाचा लढा म्हणून नाकर्त्या सरकारच्या तीन तोंडी रावणाचा वध असे राज्यव्यापी आंदोलन शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये हवेली तालुक्यातील श्री क्षेत्र वाडेबोल्हाई येथे बोल्हाई देवी मंदिर परिसरात शरद पवार गट हवेली तालुका वतीने हवेली तालुकाध्यक्षा तथा वाडेबोल्हाच्या माजी उपसरपंच सुरेखा शिवाजी भोरडे, शिरूर हवेली विधानसभेचे योगेश शितोळे यांच्या नेतृत्वाखाली तीन तोंडी रावणाचे दहन करून आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी वाडेबोल्हाईचे माजी सरपंच दिपक गावडे, हवेली तालुका उपाध्यक्षा सुप्रिया घावटे, युवा नेते प्रवीण भोर, सोमनाथ गावडे, उपसरपंच मनीषा कड, ग्रामपंचायत सदस्या संध्या गावडे, ग्रामपंचायत सदस्या सोनाली शिंदे, अनिता इंगळे, मनीषा भालेकर, अलका कारंडे, शिंदे आजी आदी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# जुन्नर परिसरात जोरदार पाऊस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर** : जुन्नर परिसरात बुधवारी दुपारी १ वाजेपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे रस्ते जलमय झाले. या परतीच्या पावसाने जुन्नर परिसराला झोडपून काढले. काढणीला आलेल्या सोयाबीनला याचा फटका बसणार असल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले. जुन्नर परिसरात पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, दोन दिवसांपासून ढगाळ हवामान तयार झालेले होते. त्यामुळे वातावरणात उष्णतेचे प्रमाण वाढले होते. बुधवार सकाळपासून ढगाळ हवामान उकाडा जाणवत असताना दुपारनंतर पावसाळी वातावरण तयार होऊन १ वाजल्यापासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झालेले होते. परतीचा हा पाऊस शेतकऱ्यांकरीता नुकसानकारक ठरला. या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने, ऑक्टोबर हीटच्या उकाड्या पासून काहीसा दिलासा नागरीकांना मिळाला.

# कोयाळीच्या गबारवाडीला अखेर स्मशानभूमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरोली** : गावच्या नागरिकांना एखादी सार्वजनिक सुविधा नसेल तर अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. खेड तालुक्यातील कोळीये गावच्या गाबरवाडीला स्मशानभूमी नसल्याने अंतविधी आणि दशक्रिया उघड्या माळरानावर करावा लागत होता. परंतु आता गाबरवाडीला अनेक वर्षानंतर स्मशानभूमीची सोय होत आहे.

कोळीये हे गाव तालुक्याच्या पश्चिम दुर्गम डोंगरी भागात आणि भामा आसखेड धरणाचे पाणलोट क्षेत्राजवळ आहे. गावच्या परिसरात पावसाळ्यात सततचा पाऊस पडत असतो. कोळीये गावचा विस्तार मोठा असल्याने गाबरवाडी पासून गावची स्मशानभूमी ५ की.मी.इतक्या लांब अंतरावर आहे. मृत व्यक्तीवर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी नेताना नागरिकांची दमछाक होत असायची. त्यामुळे गाबरवाडीचे नागरिक आपल्या जवळच असलेल्या डोंगरालगत उघड्यावर अंत्यविधी व दशक्रिया विधीचे कार्यक्रम करीत आलेले आहेत. पावसाळ्यात तर त्यांना फार मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील हे गाबरवाडीला गेले असता डोंगराच्या पायथ्याशी मांडव घालून दशक्रिया विधी पार पडला. गावाला स्मशानभूमी आणि दशक्रिया घाट नसल्याची समस्या त्यांना समजली. नागरिकांशी चर्चा करून अधिक माहिती घेतली असता गावची ६० एकर वरून अधिक जागा या परिसरात उपलब्ध असताना देखील हे महत्वाचे काम झालेले नाही.यावेळी त्यांनी स्मशानभूमी व दशक्रिया घाट करण्याचा शब्द ग्रामस्थांना दिला.

स्मशानभूमी व दशक्रिया घाटासाठी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून बुट्टे पाटील यांनी निधी मिळविला व प्रत्यक्षात चाकण गडद वांद्रा रस्त्यालगत कोळीयेच्या गाबरवाडी येथे स्मशानभूमी व दशक्रिया घाटाचे कामाचा त्यांनी शुभारंभ केला. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दिलीप वाळके, कोळीयेच्या सरपंच साधना दत्ता कावडे, उपसरपंच किशोर चव्हाण, शिवेचे सरपंच अक्षय शिवेकर, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## अजित पवार यांचा तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय

# निमगाव खंडोबा मंदिरासाठी १०० कोटींची जमीन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : खेड तालुक्यातील मौजे निमगांव येथील श्री खंडोबा मंदीर देवस्थान परिसराचा रोपवे व अन्य पायाभूत सुविधांच्या निर्मितीद्वारे विकास करण्यात येणार असून, तेथील आध्यात्मिक, तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना मिळणार आहे. त्यासाठी परिसरातली सुमारे शंभर कोटी रुपये किमतीची २४ एकर शासकीय गायरान जमीन जिल्हा परीषदेकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यासंबंधीचा शासननिर्णय मंगळवारी जारी करण्यात आला.





राज्यातील आणि राज्याबाहेरील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या निमगांव खंडोबा देवस्थानाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. निमगाव - खंडोबा हे गाव पुणे जिल्ह्यात पुणे- नासिक मार्गावरील खेड तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या राजगुरूनगर पासून ६ किमी अंतरावर आहे.

मौजे निमगाव येथील गट क्रमांक १३५ मधील १४ हे. ४० आर. गायरान आणि शासकीय जमीन रोपवे व सार्वजनिक सुविधांच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदेकडे मोफत वर्ग करण्यात आली आहे. जमिनीचा ताबा घेतल्यानंतर तीन वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर सुरू करणे तसेच या भागात वृक्षलागवड करणे बंधनकारक आहे. निमगांव खंडोबा देवस्थान प्राचीन, ऐतिहासिक महत्वाचे आध्यात्मिक स्थान असून महाराष्ट्र आणि देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी भाविक आग्रही आणि प्रयत्नशील होते. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मौजे निमगाव येथील २४ एकर शासकीय गायरान जमिन निमगाव खंडोबा मंदीर देवस्थान परिसराच्या विकासासाठी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जाहीर झाल्याने राज्यातील तसेच राज्याबाहेरील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण असून या निर्णयामुळे मौजे निमगाव खंडोबा देवस्थान परिसराच्या विकासाला लवकरच गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### खेड तालुक्यातील प्रसिद्ध निमगांव खंडोबा मंदिर

- निमगांव हे खंडोबा मंदिरामुळे प्रसिद्ध असणारे गाव, निमगांव हे ग्राम नाव अनेक गावांचे असल्याने ओळख पटवण्यासाठी या नावास जोड देण्याची प्रथा आहे. जुन्याकाळी या निमगांव जवळ नागना नावाचे गाव होते, त्यामुळे या निमगांवचा उल्लेख निमगाव - नागना असा होत असे, काळाचे ओघात नागना गाव उध्वस्त झाले आणि निमगांव जवळील दावडी या दुसऱ्या गावावरून हे गाव निमगाव - दावडी या नावाने प्रसिद्ध झाले, आत्ता हे गाव निमगाव - खंडोबा या नावाने रूढ होत आहे.
- पेशवाई काळात पेशव्यांचे दिवाण चंद्रचूड यांचे येथे वास्तव्य होते. त्यामुळे या गावास ऐतिहासिक महत्वही होते. हे गाव भीमा नदी काठी वसलेले आहे, तेथील भग्न अवस्थेतील घाट, वाडे आपल्या पूर्व वैभवाची हे साक्ष देत आहेत. निमगाव - खंडोबा हे गाव पुणे जिल्ह्यात पुणे-नासिक मार्गावरील खेड तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या राजगुरूनगर पासून 6 किमी अंतरावर आहे. निमगावचे उत्तरेस 1.5 किमी अंतरावरील टेकडीवर खंडोबाचे मंदिर आहे. येथे थेट गाडी मार्ग मंदिराजवळ जातो. पायरी मार्गानेही येथे पोहचता येते. कोटाचे दक्षिण बाजूने सुमारे 100 पायरी चढून कोटा पर्यंत जाता येते. पायरी मार्गाचे सुरवातीस एक पूर्वाभिमुख भैरवनाथाचे मंदिर आहे.

#रा

---

✓ » Selected




## सोनालिका ट्रॅक्टर्सचा देशांतर्गत विक्रीचा नवा उच्चांक

**पुणे** : भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने ट्रॅक्टर उद्योगातील पॉवरहाऊस म्हणून आपली क्षमता पुन्हा सिद्ध करत आर्थिक वर्ष २०२४ मध्ये नवीन कामगिरीचे शिखर गाठले आहे. सणासुदीचा हंगाम सुरू होत असतानाच कंपनीने ६३,१३६ ट्रॅक्टरची विक्री करून वार्षिक आधारावर आतापर्यंतची देशांतर्गत सर्वाधिक विक्रीची नोंद केली आहे. तसेच देशांतर्गत उद्योगात बाजारपेठेतील आघाडीचा हिस्सा कायम ठेवला आहे. यात उद्योगाच्या कामगिरीच्या तुलनेत सात पट वाढीच्या आश्चर्यकारक कामगिरीचा समावेश आहे. जगातील सर्वात मोठ्या ट्रॅक्टर बाजारपेठेत शेतकरी केंद्रित नाविन्यपूर्ण शेती समाधाने प्रदान करण्यात ब्रँडची निरंतर उत्कृष्ठता यातून दिसून आली आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, प्रत्येक शेतकऱ्याची मागणी ही अनोखी असते. त्यामुळेच वैयक्तिक शेती पद्धती विकसित करण्याचा एक विशिष्ट दृष्टीकोन अत्यावश्यक असतो. तो आमच्या डीएनएमध्ये आधीच आहे. ट्रॅक्टर उद्योगासाठी आमच्या अनोख्या योगदानामुळे आम्हाला आतापर्यंतची वार्षिक सर्वाधिक ६३,१३६ ट्रॅक्टरची देशांतर्गत विक्री नोंदवता आली आहे. तसेच सातत्याने भारतातील बाजारपेठेचा वाटा काबिज करता आला आहे. यामध्ये उद्योगाच्या कामगिरीच्या तुलनेत तब्बल सात पट वाढीचा समावेश आहे. ट्रॅक्टरमध्ये ऑप्टिमाइझ केलेल्या शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे हे शेतकरी समुदायामध्ये झपाट्याने केंद्रस्थानी येत आहे, यावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे, असे ते म्हणाले.

## डॉ. स्नेहल वाळके यांना पीएच्‌डी प्रदान

**बारामती** : विद्या प्रतिष्ठानचे कमलनयन बजाज इंस्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बारामती येथील डॉ. स्नेहल बाळकृष्ण वाळके यांना पीएच्‌डी पदवी प्रदान केली. विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज इंस्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बारामती या महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. स्नेहल बाळकृष्ण वाळके यांना स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील डॉ. डीवाय पाटील युनिव्हर्सिटी तळेगाव आंबी पुणे या विद्यापीठाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. त्या महाविद्यालयात गेली अकरा वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. बिचकर, विद्याप्रतिष्ठानचे सर्व विश्वस्त मंडळ तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग या सर्वानी त्यांचे अभिनंदन केले आहे.





## एमआयटी एडीटी विद्यापीठात 'टॅलेंट फ्यूजन' उत्साहात

**पुणे** : एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कुल ऑफ कॉर्पोरेट इनोवेशन आणि लिडरशिप (एससीआयएल) यांच्या विद्यमाने आयोजित 'टॅलेंट फ्यूजन २०२४' या स्पर्धेचा महाअंतिम सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धेचे उद्दिष्ट विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या रोजगार कौशल्यांचा विकास करणे होते.

विद्यार्थ्यांमधील क्षमता आणि व्यावसायिक कौशल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन होते. या वर्षीच्या पहिल्या फेरीत संपूर्ण विद्यापीठातून १९०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ३ फेऱ्यांमधून अंतिम "एलेवेटर पीच" साठी १० स्पर्धकांची निवड करण्यात आली आणि त्यातून ३ विजेते घोषित करण्यात आले. ज्यामध्ये मधुर पाटील, प्रसाद बोकारे आणि अभिषेक सहा यांनी अणुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुणे म्हणून प्र.कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी उपस्थित होते. स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पंच म्हणून प्रा. डॉ. रेणू व्यास, प्रा. श्रीकांत गुंजाळ, प्रा. सिद्धार्थ साळवे, प्रा. दिल किरत सरना यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. शिखा काबरा आणि प्रा. सारा रोज यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. जयदीप शिरोटे यांनी केले.

## मतदारसंघातील कलाच्या आधारे निवडणार उमेदवार

# उमेदवार निवडीसाठी भाजपचा ‘मध्य प्रदेश पॅटर्न’!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**मुंबईः** हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले आहे. राज्यात भाजपची सत्ता आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र भाजपमध्ये हुरुप वाढला आहे. महाराष्ट्र जिंकण्यासाठी भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून योग्य उमेदवार निवडण्याची कसरत भाजपने सुरू केली आहे. यासाठी भाजपने ‘मध्य प्रदेश पॅटर्न’ राबवला आहे. राज्यात पहिल्यांदाच हा पॅटर्न राबवला गेला आहे. त्यामुळे कोणत्या उमेदवारांना तिकीट मिळणार आणि कुणाला नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाजपच्या ‘मध्य प्रदेश पॅटर्न’नुसार भाजपने यंदा विधानसभेचा कल जाणून घेण्यासाठी बाहेरून निरीक्षक नेमले होते. या निरीक्षकांनी प्रत्येक विधानसभेत जाऊन पदाधिकाऱ्यांचे मतदान घेतले. प्रत्येक विधानसभेतील पदाधिकाऱ्यांकडून तीन उमेदवारांची नावे बंद लिफाफ्यात घेण्यात आली. हा बंद लिफाफा भाजपच्या श्रेष्ठींकडे सोपवला जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. पक्ष श्रेष्ठी हा लिफाफा उघडून कुणाला तिकीटासाठी पसंती देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपच्या या ‘मध्य प्रदेश पॅटर्न’मुळे इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

निरीक्षकांनी राज्यातील सर्व्हे करून मतदारसंघातील इच्छुकांची पार्श्वभूमी जाणून घेतली आहे. त्यानंतर प्रत्येक मतदारसंघात तीन इच्छुकांची नावे काढली असून बंद लिफाफ्यात ही नावे ठेवली आहेत. हा लिफाफा पक्षाचे राज्यातील नेते उघडून त्यातील एक नाव फायनल करणार आहेत. मध्य प्रदेशातही हाच पॅटर्न राबवण्यात आला होता. त्यामुळे मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले होते. त्याचीच पुनरावृत्ती आता महाराष्ट्रात होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले

### १६० जागांचा आग्रह

● भाजपने या पॅटर्नच्या धर्तीवर १६० मतदारसंघात निरीक्षक पाठवले होते. याचा अर्थ भाजप १६० जागांवर लढणार आहे. हरियाणातील विजयामुळे भाजपची बार्गेनिंग पॉवर वाढली आहे. एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या पक्षांना आता जागावाटपात काहीही नरमाईची भूमिका घ्यावी लागणार आहे.






राष्ट्रसंचार | सरळ सेवा भरती

## एसटीत १०५८ कामगारांना सामावून घेणार

### नेमणुका देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू




**मुंबई :** सरळ सेवा भरतींतर्गत अतिरिक्त यादीवरील एकूण १,०५८ उमेदवारांना एसटीच्या सेवेमध्ये चालक तथा वाहक या पदावर सामावून घेतले जाणार आहे, अशी माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली.

२०१९ च्या भरतीमध्ये निवड झाल्यापैकी गैरहजर अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांऐवजी त्याच भरतीमधील प्रतीक्षा यादीवरील सुमारे ३३७ उमेदवारांना नेमणूक देण्याची प्रक्रिया महामंडळात सुरू करण्यात येत आहे. तसेच, प्रतीक्षा यादीवरील उर्वरित सर्व ७२१ उमेदवारांना आवश्यकतेप्रमाणे व रिक्त जागेनुसार राज्य परिवहन सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात संबंधित उमेदवार, लोकप्रतिनिधी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भरत गोगावले यांना भेटून निवेदन सादर केले होते. त्यांच्या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना तातडीने नेमणुका देण्याच्या सूचना गोगावले यांनी एक ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या एसटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत दिल्या होत्या. त्यानुसार संबंधितांना नेमणुका देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

» Selected

## लाडक्या भावांच्या खात्यात ४२ कोटी रुपये जमा होणार

**मुंबई** : राज्यातील ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा पहिला हप्ता मिळणार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत हे विद्यावेतन दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. ‘डीबीटी’ मार्फत ४६ हजार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात ४२ कोटी रुपये जमा होणार आहेत, असे त्यांनी सांगितले. लाडक्या बहिणीनंतर आता लाडक्या भावाच्या खात्यातही पैसे जमा होणार आहेत. राज्यातील ४६ हजार विद्यार्थ्यांच्या खात्यात विद्यावेतनाचा पहिला हप्ता जमा होणार आहे. एक महिना प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षार्थींच्या खात्यात प्रत्येकी ६ ते १० हजार रुपये विद्यावेतन जमा केले जाणार आहेत. जुलै महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू झाली. या योजनेत आत्तापर्यंत ३ लाख ६९ हजार ७९८ प्रशिक्षणार्थींनी नोंदणी केली. त्यातील १ लाख ७९ हजार ३१८ प्रशिक्षणार्थींना नियुक्ती देण्यात आली. यामध्ये ८७ हजार १४९ प्रशिक्षणार्थी रुजू झाले. १० हजार ५८६ अस्थापनांनी या उपक्रमात नोंदणी केली आहे. एक महिना ट्रेनिंग पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींच्या खात्यात प्रत्येकी ६ ते १० हजार रुपये विद्यावेतन जमा केले जात आहे, असे लोढा यांनी सांगितले.

## नवी मुंबईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक लाच घेताना जेरबंद

**नवी मुंबई** : तळोजा जेलमध्ये इमारत दुर्घटना गुन्ह्यात अटकेत असलेल्या आरोपीविरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात ताबा न घेण्यासाठी आणि गुन्ह्यात मदत करण्यासाठी ‘एनआरआय’ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम (वय ५५) वर्ष यांनी तक्रारदाराकडे पाच लाख रुपयांची मागणी केली. मंगळवारी रात्री साडेदहा वाजता उलवे वाहळ गावात कदम राहत असलेल्य इमारती खाली तक्रादारकडून साडेतीन लाख रुपये घेताना मुंबई लाचलुचपत खात्याच्या पथकाच्या जाळ्यात अडकले.

# मुंबईतील घाटकोपरमध्ये अग्नितांडव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राजधानी मुंबईत कधी आग, कधी लोकल दुर्घटना, कधी मुसळधार पाऊस तर कधी पूल दुर्घटनाच्या दुर्घटना सातत्याने होतात. आता, घाटकोपरच्या नारायणनगर भागात मोठी आग लागल्याची घटना घडली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच, स्थानिकांनी अग्निशमन दलास पाचारण केले, मात्र, तोपर्यंत आग मोठ्या प्रमाणात वाढल्याचं दिसून आलं. विशेष म्हणजे स्थानिकांनीही आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले आहेत.



घाटकोपरच्या नारायण नगर विभागातील एका प्लॅस्टिकचे रॅपर बनविणाऱ्या कारखान्याला ही भीषण आग लागली आहे. या कारखान्याच्या वरील बाजूस सम्राट नावाची शाळा आहे, सुदैवाने ही शाळा बंद होती. कारखान्याच्या गोदामची आग मोठ्या प्रमाणात वाढली होती, आजूबाजूला रहिवासी वस्ती आहे, अग्मिशमन दलाच्या दहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. मात्र, आगीवर नियंत्रण मिळविणे कठीण झाल्याचं दिसून आले.

आगीच्या घटनेनंतर वस्तीतील नागरिकांनी तेथून दूर जाण्यास सुरुवात केली. मात्र, आगीतून उठणारे धुराचे लोट पाहून लोकं आगीच्या ठिकाणी गर्दीही करताना दिसून आले.कंपनीच्या गोदाममध्ये ज्वलनशील पदार्थ असल्याने आग भडकली असून आतमध्ये स्फोट झाला असल्याची माहिती समोर आली आहे. नारायण नगर येथील आग लागलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वस्ती व लहानसहान कारखाने आहेत. त्यामुळे, पोलिसांनी परिसरात धाव घेत वाहतूक मार्ग बंद केले असून वर्दळ हटवली.

# ठाकरे गटाचा दसरा मेळाव्याचा टीझर रिलीज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचा दसरा मेळावा शिवाजी पार्क मैदानावर होणार आहे. यासाठी ठाकरे गटाकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने या दसऱ्या मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यापूर्वी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत एक्स अकाउंटवरून दसरा मेळाव्याचा टीझर पोस्ट करण्यात आला आहे.




उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने पोस्ट केलेल्या टीझरच्या सुरुवातीला फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा आवाज आणि बाळासाहेब ठाकरे यांचा पाठमोरा उभा असलेला फोटो पाहायला मिळतो. यामध्ये उद्धव ठाकरे म्हणत आहेत की, “जर विरोधकांना वाटत असेल की शिवसेना संपली, त्यांना मला दाखवायचे आहे शिवसेना काय करुन दाखवते.”

या टीझरबरोबर लिहिले की, “दादरमधील शिवाजी पार्क मैदानाच्या शिवतीर्थावर १२ ऑक्टोबरला होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी सर्वांनी वाजत गाजत आणि गुलाल उधळत यावे.” सध्या हे टीझर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटात पडलेल्या फुटीनंतर दोन गट निर्माण झाले. शिवसेना फुटल्यानंतर मुंबईत दोन्ही शिवसेनेचे दोन वेगवेगळे दसरा मेळावे होऊ लागले आहे. शिवसेना फुटल्याच्या पहिल्या वर्षी दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदान मिळावे म्हणून शिंदे आणि ठाकरे गटात संघर्ष झाला होता.

यंदा मुंबई महापालिकेकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मेळाव्यासाठी शिवाजी पार्कची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी सुद्धा दसरा मेळाव्याला शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचा आवाज घुमणार आहे.

# जरांगेंवर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या डॉक्टरवर शाईफेक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात ‘सोशल मीडिया’वर पोस्ट करणाऱ्या डॉक्टरवर शाईफेक करण्यात आली. संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांकडून संबंधित डॉक्टरवर शाईफेक करण्यात आली आहे. नाशिकच्या सिडको भागात आयुर्वेद वैद्य डॉ. विजय गवळी यांचा निषेध करण्यात आला आहे. संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी गवळी यांच्या दवाखान्यात जावून शाईफेक केली आहे.

या वेळी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी एक मराठा लाख मराठा अशी घोषणाबाजी केली. या घोषणाबाजीनंतर डॉ. गवळी यांनी मीसुद्धा मराठा असे म्हटले. या वेळी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी व्हिडीओ बनवला. या व्हिडीओत आंदोलकांनी डॉक्टरला भूमिका मांडण्यास सांगितले. त्यानंतर डॉक्टरांनी भूमिका मांडली. ‘मीसुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा आहे. माझ्याकडून काही चूक झाली असेल त्याबद्दल क्षमस्व, असे ते म्हणाले.

आंदोलकांनी आपली भूमिका मांडली. “तुमचा अपमान करण्याचा उद्देश नाही. तुम्ही आदरातिथ्य आणि वडीलधारे आहात, तुम्ही असे करणे चुकीचे आहे. आमच्या भावना तीव्र आहेत. आम्ही मराठा म्हणून जगण्या-मरण्याची लढाई लढतो. तुमच्यासारख्या सुशिक्षित व्यक्तीकडून असे अपेक्षित नाही,” असे आंदोलकांनी म्हटले आहे.



डॉ. गवळी यांच्याकडून वादग्रस्त पोस्ट ‘सोशल मीडिया’वर करण्यात आली होती. या वेळी आंदोलकांनी डॉक्टराच्या पोस्टवर निषेध व्यक्त केला. जरांगे पाटील यांचे सगेसोयरे मुसलमान असल्याची पोस्ट डॉक्टराने केली होती. या पोस्टमुळे चिडलेल्या संभाजी ब्रिगेडच्या आंदोलकांनी सिडको येथील गवळी यांच्या दवाखान्यात घुसून त्यांच्या अंगावर शाईफेक केली.

## शासकीय जमिनींचे वाटप

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**सावंतवाडी :** महाराष्ट्र शासनाच्या जमिनीचे वाटप व पोटहिस्सा मोजणीच्या कागदपत्रांचे वाटप सावंतवाडीत पार पडले. मंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ग्रामस्थांना पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, लखमराजे भोंसले, राजन तेली, संजू परब, प्रभाकर सावंत आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# ओबीसीत १५ जातींचा समावेश करण्याची केंद्राकडे शिफारस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** . मराठा समाजाला राज्य सरकारने १० टक्के आरक्षण लागू केले आहे. मात्र, आम्हाला ओबीसीतूनच (OBC) आरक्षण हवं असल्याचं मराठा समाज बांधवाचं म्हणणं आहे. त्यासाठी, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाचे आंदोलन व मागणी अद्यापही सुरू आहे. त्यातच, आता विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकींचा धडाका लावला असून महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. महाराष्ट्रातील १५ जातींची ओबीसींमध्ये समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून इतर मागासवर्ग म्हणजेच ओबीसींच्या यादीत नव्या जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सरकारने शिफारस केलेल्या जातींचा समावेश ओबीसीमध्ये करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडून जातींची यादी केंद्र सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती आहे.

### उढाण शिंदे गटात प्रवेश करणार; टोपे यांच्याविरोधात लढणार

# ठाकरे गटाला जालन्यात धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जालन्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसणार आहे. आज (ता. १०) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हिकमत उढाण शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. माजी मंत्री राजेश टोपे यांच्या विरोधात ते घनसावंगी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

घनसावंगी विधानसभा मतदारसंघांमध्ये ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेचे सह- संपर्कप्रमुख हिकमत उढाण यांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश निश्चित झाला आहे. उद्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ते शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश



करणार आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते राजेश टोपे यांच्या विरोधामध्ये हिकमत उढाण घनसावंगी मतदारसंघातून प्रबळ दावेदार मानले जात आहेत. घनसावंगी मतदारसंघातून टोपे निवडून आले आहेत. महाविकास आघाडीतून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडे राहणार असल्याने उढाण यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे त्यांनी ठाकरे गटाला 'जय महाराष्ट्र' करण्याचा निर्णय घेतला आहे.

टोपे यांचे कट्टर विरोधक समजले जाणारे उढाण हे कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढणार असल्याची आधीपासूनच चर्चा सुरू होती. घनसावंगी मतदारसंघाचे उमेदवार म्हणून टोपे यांचे नाव निश्चित केल्याचे मानले जात आहे, अशा परिस्थितीत हिकमत उढाण यांनी शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश करण्याची तयारी केली आहे. २०१९ मध्ये ठाकरे यांची शिवसेना भाजपसोबत होती, त्यामुळे शिवसेना-भाजप युतीचे उमेदवार म्हणून उढाण व आघाडीकडून टोपे हे एकमेकांसमोर उभे होते. त्या वेळी टोपे यांचा विजय झाला. अवघ्या काही मतांनी उढाण यांचा पराभव झाला.

### विधानसभेत भाजपचा बुकटा वाजवण्याचा इशारा

# फडणवीस यांना डोके आहे का? जरांगेंचा संतप्त सवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** हरियाणातले वातावरण इकडे जोडू नका, नाहीतर मुसंडी फुसंडी जमत नाही. मराठ्यांनी फासा टाकला, की गेलाच. येथे मराठ्यांची मुसंडी वेगळीच असते. मराठ्यांसोबत डोकं लावू नको, इथे आरक्षण द्यायचे बघ. फडणवीस यांना डोकं आहे का? इथे प्रत्येक मतदारसंघात लाख लाख मतदान आहे, पूर्ण बुकटा वाजवून टाकू, अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एकेरीवर येत टीका केली.

हरियाणामध्ये जाट समाजाविरूद्ध ओबीसी मतदान एकटवल्यामुळे भाजपचा विजय झाल्याबाबत विचारणा करता जरांगे भाजपवर चांगलेच संतापले. कधी हिंदुत्व म्हणतात, कधी ओबीसी म्हणतात यांचे यांनाच कळत नाही. हरियाणा आणि महाराष्ट्रात फरक आहे. हरियाणात एखादा मराठा, एखादा जाट किंवा एखाद्या शेतकऱ्याने मतदान केलेच असेल ना, मतदान होऊन गेले, की हे असे बोलतात. महाराष्ट्रातून आम्ही पण भाजपला १०६ आमदार दिले होते. इकडचा प्रश्न वेगळा तिकडचा प्रश्न वेगळा आहे. इथे एकटा मराठा ५० ते ५५ टक्के आहे. इथे एका मतदार संघात लाख-लाख मतदान आहे, असे म्हणत हरियाणातील निकालावर भाजपने जाऊ नये, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.



### एकही जागा येऊ देणार नाही

● इथले वातावरण बिघडवले आहे, तुमची एकही जागा राज्यात निघू देणार नाही, तुम्ही निर्णय न घेता नुसती आचारसंहिता लावून दाखवा, तुमचे एकही सीट राज्यात निवडून येऊ देणार नाही, अशा शब्दात जरांगे यांनी फडणवीस यांच्यासह भाजपला इशारा दिला आहे.

ते म्हणाले, की निवडून येताना आणणारा एक आणि नाव एकाचे घ्यायचे, ही यांची सिस्टमच आहे. उपकाराची परतफेड करायची, हे एकदम खालच्या थराला जात आहेत. जो मोठे करतो त्यांच्याच नावाने हे खडे फोडतात. यांना हिंदुत्वाने निवडून आणले, की ओबीसींनी निवडून आणले, की यांना बहुजनांनी निवडून आणले, हेच त्यांना कळत नाही. ज्यांनी निवडून आणले, त्यांच्याविरुद्धचे नाव हे घेत आहेत.

मराठ्यांच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी केल्यास तुमचे शंभर टक्के सरकार येईल, असा दावा करून जरांगे म्हणाले, की मराठ्यांच्या नादी लागू नका. मराठ्यांच्या आयुष्याचे, त्या समुदायाच्या भविष्याचे रक्त प्यायचे येथे चालणार नाही. मराठ्यांचा तुम्ही अवमान आणि अपमान करून त्यांच्या डोळ्यात धूळ फेकली आहे. यांनी आमची खुन्नस धरली आहे. आम्हाला डावलून त्यांनी दुसऱ्याला आरक्षण दिले आहे आणि आम्हाला दिले नाही. त्यामुळे, आमचा प्रश्न न सोडता आचारसंहिता लावा मग मी तुम्हाला सांगतो, असा इशारा त्यांनी दिला.

#रा

स्वबळावर निवडणूक लढवणे अंगलट; शिवसेना, भाकप, 'आप' पडले तुटून

# काँग्रेसच्या रणनीतीवर मित्रपक्षांची टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> "हरियाणातील लोकांना भाजपचा पराभव करायचा होता; पण काँग्रेसची त्यासाठी तयारी नव्हती. काँग्रेसच्या रणनीतीत उणीव होती. ऐक्याचा अभाव होता. काँग्रेसने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे."
> — मनीष सिसोदिया, माजी उपमुख्यमंत्री

**नवी दिल्ली :** हरियाणाच्या निवडणुकीत काँग्रेसची 'एकला चलो रे चाल' ही रणनीती कामी आली नाही. 'इंडिया'आघाडीतील पक्षांसोबत निवडणूक न लढवण्याचा निर्णय चुकीचा ठरला अशी टीका आता सुरू झाली आहे.

'इंडिया'आघाडीतील पक्ष काँग्रेसच्या निर्णयावर भाष्य करत आहेत. काँग्रेसच्या रणनीतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शिवसेना आणि भाकप या पक्षांच्या नेत्यांनी उघडपणे काँग्रेसच्या रणनीतीवर टीका केली आहे. निवडणुकीच्या निकालावरून शिवसेनेने मुखपत्रातून काँग्रेसवर निशाणा साधला आहे. संपादकीयमध्ये असे लिहिले आहे, की महाराष्ट्र काँग्रेसने हरियाणाच्या निकालातून शिकण्याची गरज आहे. शिवसेनेने तर काँग्रेसला विजयाचे रूपांतर पराभवात कसे करायचे हे माहीत असल्याचे म्हटले आहे. शिवसेनेने म्हटले आहे, की काँग्रेसने हरियाणात 'आप'चा पराभव केला आहे किंवा इतर पक्षांशी युती केली नाही, कारण ज्यामध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसने युती केली, तेव्हा तेथे पक्षाचा विजय झाला. हरियाणातील पराभव हा काँग्रेसचा अतिआत्मविश्वास आणि राज्य नेतृत्वाच्या अहंकाराचा परिणाम असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे. भूपेंद्रसिंह हुडा यांनी गैर-जाट मतदारांना सोबत घेतले नाही, त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले.

भाकपचे डी. राजा म्हणाले, "भारतीय आघाडीने एकत्र निवडणुका लढवल्या नाहीत, ज्याचा भाजपला फायदा झाला. आम्ही एकत्र राहिलो असतो, तर भाजप सरकार स्थापन झाले नसते, याचा विचार 'इंडिया' आघाडीच्या पक्षांनी करायला हवा." काँग्रेसने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. 'आप' नेत्यांनीही काँग्रेसवर निशाणा साधला. निवडणुकीचे निकाल आल्यानंतर आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी काँग्रेसला टोला लगावला.

# समाजवादी पक्षाचे सहा उमेदवार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील पोटनिवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत मात्र त्याआधीच राजकीय तापमान वाढले आहे. समाजवादी पक्षाने दहापैकी सहा जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले. समाजवादी पक्षाच्या या घोषणेने राजकीय पंडितांना आश्चर्याचा धक्का बसला. सहा उमेदवारांच्या पहिल्या यादीत कऱ्हाळ मतदारसंघातील उमेदवाराचे नावही जाहीर करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर कोणत्याही दिवशी पोटनिवडणूक जाहीर होऊ शकते. भारतीय निवडणूक आयोगाने आगामी निवडणुकीची तयारी जवळपास पूर्ण केली आहे. समाजवादी पक्षाने ज्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत, त्यात करहलमधून तेज प्रताप सिंह यादव, सिसामऊमधून नसीम सोलंकी, फुलपूरमधून मुफ्तफा सिद्दीकी, मिल्कीपूरमधून अजित प्रसाद, कटहारीमधून शोभावती वर्मा आणि माझवानमधून ज्योती बिंद यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसचा दावा दुसरीकडे, काँग्रेस सध्या युतीसाठी पाच जागांवर दावा करत असली, तरी त्याआधीच समाजवादी पक्षाने उमेदवार जाहीर केले आहेत. याचा अर्थ आता काँग्रेसला मागणीनुसार पाच जागा मिळण्याची शक्यता नाही.

सूत्रांवर विश्वास ठेवला तर समाजवादी पक्षाने या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसला एक ते दोन जागा देण्याचा निर्णय घेतला आहे; मात्र युतीचे चित्र अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. समाजवादी पक्षाने ज्या जागांसाठी उमेदवार जाहीर केले, त्या जवळपास सर्वच जागा आपल्याच सदस्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झाल्या आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाने या जागा जिंकल्या होत्या. विशेष म्हणजे उमेदवारांची घोषणा करताना समाजवादी पक्षाने आपला पीडीए फॉर्म्युला लक्षात ठेवला आहे. भाजपने प्रत्येक जागेसाठी तीन उमेदवारांचे पॅनलही तयार केले.

# दहशतवाद्यांनी अपहरण केलेल्या जवानाचा मृतदेह जंगलात सापडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** पंतप्र जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातून भारतीय लष्कराच्या दोन जवानांचे दहशतवाद्यांनी अपहरण केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. अपहरण झालेल्या दोन जवानांपैकी एकजण दहशतवाद्यांच्या तावडीतून कसा तरी पळून जाण्यास यशस्वी झाला होता. तर दुसरा एक जवान बेपत्ता होता. ही घटना दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील कोकरनाग जंगलात घडली. त्यानंतर अपहरण झालेल्या जवानाचा शोध घेण्यासाठी मोठी शोध मोहीम राबवण्यात येत होती. घटना घडल्यानंतर रात्रभर या बेपत्ता जवानाचा शोध घेण्यात येत होता. कोकरनाग जंगलात शोध मोहीम सुरु असताना या जवानाचा मृतदेह लष्कराला आढळून आला आहे. हिलाल अहमद भट असं मृतदेह सापडलेल्या जवानाचे नाव आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, ८ ऑक्टोबर रोजी दहशतवादविरोधी मोहिमेदरम्यान प्रादेशिक लष्कराच्या १६१ तुकडीतील दोन सैनिक अनंतनागमधील जंगल परिसरात गस्तीवर होते. मात्र, यावेळी दोन जवानांचे अपहरण झाले होते. या दोन जवानांपैकी एकजण दहशतवाद्यांच्या तावडीतून कसा तरी पळून येण्यास यशस्वी झाला. मात्र, दुसरा एक जवान बेपत्ता होता. ही घटना काल मंगळवारी (८ ऑक्टोबर) म्हणजे जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर होत असताना घडली होती. त्यानंतर त्या जवानाचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम राबवण्यात येत होती. शोध मोहिमेदरम्यान लष्कराच्या जवानांना या जवानाचा मृतदेह आढळून आला. दहशतवाद्यांनी अपहरण केलेले जवान दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील रहिवासी होते. पोलिसांच्या माहितीनुसार, जंगलात दहशतवाद्यांच्या कारवाईची माहिती मिळाल्यानंतर लष्कराने शोध मोहीम सुरु केली होती. त्यासाठी सैन्याला पाठवले होते. मात्र, त्यानंतर अचानक दहशतवाद्यांनी दोन जवानाचे अपहरण केले. दोनपैकी एक पळून येण्यास यशस्वी झाला. दहशतवाद्यांनी त्यालाही गोळी मारली आणि त्याच्या खांद्याला दुखापत केली पण तो जवान सुखरूप बचावला. जखमी झालेल्या जवानाला हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, त्यानंतर बेपत्ता जवानाचा शोध घेतला असता त्याचा मृतदेह आढळून आला.

## आयुर्वेद ही जगातील सर्वात जुनी वैद्यकीय प्रणाली : राष्ट्रपती मुर्मू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयुर्वेद ही जगातील सर्वात जुनी वैद्यकीय प्रणाली आहे. तसेच आयुर्वेद हा आपला वारसा आहे आणि हा वारसा एक उत्तम वैद्यकीय व्यवस्था म्हणून स्थापित करण्यासाठी आयुष मंत्रालय कार्यरत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. दिल्लीस्थित अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या ८ व्या स्थापन दिनानिमित्त त्या बोलत होत्या. यावेळी आयुष औषधी कार्यक्रमाची सुरूवात आणि शाश्वत आयुष प्रदर्शनाचे उद्‌घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आले.आयुष मंत्रालयाअंतर्गत अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या स्थापना दिन कार्यक्रमाला दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आयुष सचिव राजेश कोटेचा, अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या संचालक डॉ. तनुजा नेसारी, आयुष मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि वरिष्ठ प्राध्यापक उपस्थित होते.

## काँग्रेसला स्वत:च्या नाकर्तेपणामुळे पराभव - असदुद्दीन ओवेसी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भाजपाने हरियाणात तिसऱ्यांदा सत्तास्थापनेच्या दिशेने पाऊल टाकलं आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत काँग्रेसचा विजय होईल, असे अनेकांना वाटत होतं. निकालापूर्वी जाहीर झालेल्या एक्झिट पोलमध्येही काँग्रेसच्या विजयाचे भाकीत वर्तवण्यात आलं होतं. मात्र, काँग्रेसला या निवडणुकीत दारुण पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान, या निकालानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनीही या निकालावरून काँग्रेसला लक्ष्य केलं आहे.ओवेसी यांनी या निकालासंदर्भात भाष्य केलं. "हरियाणात काँग्रेसला स्वत:च्या नाकर्तेपणामुळे पराभव स्वीकारावा लागला आहे. हरियाणात असे अनेक घटक होते. जे भाजपाच्या विरोधात होते. मात्र, तरीही काँग्रेसला भाजपाला रोखण्यात अपयश आलं. जर अशा परिस्थितीतही काँग्रेस भाजपाला रोखू शकत नसेल, तर ते वेदनादायी आहे", अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## दिल्ली मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान PWD कडून सील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री निवासस्थानावरून दिल्लीतील राजकीय वातावरण तापलं आहे. आम आदमी पार्टीने आरोप केला आहे की, उपराज्यपालांच्या निर्देशाने पीडब्लूडीने मुख्यमंत्री आतिशी यांचे सामान काढून निवासस्थान सील केले आहे. दिल्लीच्या सीएम ऑफिस (CMO) कडून आरोप लावला आहे की, देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री निवासस्थान जबरदस्तीने रिकामे केले आहे. भाजपच्या सांगण्यावरून दिल्लीच्या उपराज्यपालांनी मुख्यमंत्री मुख्यमंत्री आतिशी यांचे सामान मुख्यमंत्र्यांच्या सरकारी निवासस्थानातून बाहेर काढले. पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांचे एक पथक दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी (६-फ्लॅग स्टाफ रोड, सिव्हिल लाइन्स) पोहोचले . दरम्यान, उपराज्यपाल व्हीके सक्सेना यांनी मुख्यमंत्री आतिशी यांचे सर्व सामान मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानातून काढून टाकल्याचा दावा दिल्लीच्या सीएमओने केला आहे. दरम्यान, विरोधी पक्ष भाजपने मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान सील करण्यात आल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान भाजपच्या सांगण्यावरून बळजबरीने सील करण्यात आले आहे, कारण उपराज्यपालांना ते भाजपच्या नेत्याला द्यायचे होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# रेपो दर 'जैसे थे' ठेवल्याने बाजारात उसळी

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेने रेपोदर 'जैसे थे' ठेवल्याने शेअर बाजारात चांगली तेजी पाहायला मिळत आहे. 'सेन्सेक्स'ने ८२ हजार ३०० अंकांची पातळी ओलांडली होती. ट्रेडिंग सत्रात 'सेन्सेक्स'मध्ये ६८४ अंकांची वाढ झाली आहे. दुसरीकडे, 'निफ्टी'मध्ये वाढ दिसून येत आहे. त्याच वेळी, 'निफ्टी'मध्ये २०० हून अधिक अंकांची वाढ दिसून आली आहे. या वाढीमुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या हाती ५.६६ लाख कोटी रुपये आले आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या निर्णयानंतर शेअर बाजारात चांगलीच तेजी पाहायला मिळाली. ट्रेडिंग सत्रात 'सेन्सेक्स'मध्ये ६८४.४ अंकांची वाढ झाली आहे. त्यामुळे 'सेन्सेक्स' ८२,३१९.२१ अंकांच्या दिवसातील उच्चांकावर पोहोचला. 'नॅशनल स्टॉक एक्सचेंज'च्या म्हणण्यानुसार, ट्रेडिंग सत्रात निफ्टीमध्ये २०० पेक्षा जास्त वाढ दिसून आली आहे. त्यामुळे निफ्टी २५,२३४.०५ वर पोहोचला आहे. शेअर बाजारातील या तेजीमुळे गुंतवणूकदारांना मोठा फायदा झाला आहे. गुंतवणूकदारांचा नफा 'बीएसई'च्या 'मार्केट कॅप'शी जोडलेला असतो. एका दिवसापूर्वी 'बीएसई'चे 'मार्केट कॅप' ४,५९,५०,९२६.२१ कोटी रुपये होते. ते वाढून ४,६५,१६,४७२.५५ कोटी रुपये झाले. याचा अर्थ शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना ५,६५,५४६.३४ कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. एक दिवस आधी, गुंतवणूकदारांना ७.५० लाख कोटी रुपयांचा नफा झाला होता. याचा अर्थ कालपासून आतापर्यंत गुंतवणूकदारांना सुमारे १३ लाख कोटी रुपयांचा नफा झाला आहे.



Selected

## भाजपच्या आमदारावर प्राणघातक हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊः :** उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे भारतीय जनता पक्षाचे आमदार योगेश वर्मा यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. जिल्हा




बार असोसिएशनचे अध्यक्ष अवधेश सिंह आणि त्यांच्या समर्थकांनी पोलिसांसमोर आमदाराला मारहाण केली. पोलिसांनी आमदाराला वाचवून तेथून दूर नेले. या घटनेचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. आ. वर्मा रस्त्यावर येत असताना अवधेश सिंह तेथे पोहोचले आणि त्यांनी आमदाराला थप्पड मारली. यावरून आमदारही संतापले आणि जीवे मारायला निघाले. तेवढ्यात अवधेश सिंह यांचे समर्थक तेथे पोहोचले आणि आमदाराला मारहाण करू लागले; मात्र तेथे उपस्थित असलेल्या पोलिसांनी मध्यस्थी करून त्या व्यक्तीला घेऊन दूर गेले.

## गाजियाबादमध्ये वाढला महापंचायतीने तणाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गाजियाबाद :** प्रेषित मोहम्मद यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह



वक्तव्यानंतर उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये वातावरण तणावपूर्ण आहे. एकीकडे यति नरसिंहानंदला अटक न केल्याने मुस्लिम समाज संतप्त आहे, तर दुसरीकडे हिंदू संघटनाही दसना देवी मंदिरावरील हल्ल्याचा दावा करत पुन्हा पुन्हा रस्त्यावर उतरत आहेत. १३ ऑक्टोबर रोजी महापंचायत जाहीर करण्यात आली आहे. त्याच वेळी, पोलिसांनी म्हटले आहे की संपूर्ण गाजियाबाद जिल्ह्यात जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

# पाकिस्तानी आमदारांत लाथाबुक्की

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कराची :** पाकिस्तानच्या विधानसभेत मोठा गदारोळ झाला. त्याचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये आमदारांमध्ये जोरदार लाथाबुक्की सुरू आहे. खैबर पख्तूनख्वा विधानसभेत ही घटना घडली. 'पीटीआय'च्या एका आमदाराने कॅबिनेट मंत्र्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते. मंत्र्यांच्या समर्थकांना हे आवडले नाही. यानंतर घरातच गोंधळ सुरू झाला. दोन्ही पक्षांच्या आमदारांमध्ये जोरदार बाचाबाची झाली.

आमदारांमधील भांडणाचा हा व्हिडीओ गुलाम अब्बास शाह यांनी 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म एक्सवर शेअर केला आहे. त्यांनी या पोस्टला कॅप्शन दिले, की पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा विधानसभेत सरकार आणि विरोधी सदस्यांमध्ये हाणामारी झाली. त्यात दोन्ही बाजूंनी लाथाबुक्क्या झाल्या आणि कपडेही फाटले. खैबर पख्तूनख्वा विधानसभेत गेल्या मंगळवारी विशेष सत्र बोलावण्यात आले होते. सभागृह चालू होते. दरम्यान, मदतविषयक विशेष सहाय्यक नेक मोहम्मद दावर यांच्या समर्थकांनी दक्षिण वझिरीस्तानमधील 'पीटीआय' आमदार इक्बाल वझीर यांच्या विरोधात अपशब्द वापरले. दोन दिवसांपूर्वी मोहम्मद दावर आणि इक्बाल वझीर यांच्यात भ्रष्टाचाराच्या आरोपावरून वाद झाला होता. यानंतर दोघांचे समर्थक एकमेकांना भिडले.

सभेत उपस्थित सुरक्षा दलांनी दोन्ही बाजूंना शांत करण्याचा प्रयत्न केला; मात्र ते कोणाचेही ऐकायला तयार नव्हते. बराच वेळ हा गोंधळ सुरू होता. अखेर त्यांना शांत करण्यात ते यशस्वी झाला. विधानसभा अध्यक्ष सभागृहातून बाहेर पडताच गोंधळ आणि हाणामारी झाली.

## जमाव

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**आग्रा :** सामूहिक शेतीत नांगर घातल्यावरून दोन भावांची हत्या करण्यात आली. पोलिस तपासाच्या वेळी मोठा जमाव जमला होता.

## शगुन, शामीमा आणि सकिना; जम्मू काश्मीरमधील विधानसभेत या तिघींचा घुमणार आवाज!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** दहशतवादी कारवायांमुळे सतत दहशतीत असलेल्या केंद्रप्रदेशित राज्यात तब्बल १० वर्षांनी निवडणुका झाल्या. कलम ३७० रद्द केल्यानंतरची ही पहिली निवडणूक. त्यामुळे तेथील समस्या, नागरिकांच्या मागण्या अन् राज्यातील शांतता सुव्यवस्था राखण्याकरता नागरिकांनी जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स या पक्षावर विश्वास दाखवला आहे. ९० सदस्यांच्या या विधानसभेत फक्त तीन महिला निवडून गेल्या आहेत. त्यापैकी एक भाजपाची असून दुसरी जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सच्या आहेत.

२०१४ साली झालेल्या निवडणुकीत फक्त दोन महिला आमदार विधानसभेत जिंकून गेल्या होत्या. तर, यंदा ४१ महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या. त्यापैकी तिघींचा विजय झाला आहे. शमीमा फिरदौस आणि सकीना इटू या दोघी नॅशनल कॉन्फरन्सच्या असून शगुन परिहार या भाजपाच्या आहेत. ९० सदस्यांच्या विधानसभेत फक्त ३.३३ टक्के महिला आमदार आहेत.

इस्त्रायली सैन्याचे हल्ले सुरूच; दहशतवाद्यांना धाडले जाते यमसदनी

# हिजबुल्लाहचे लाँच पॅड केले नष्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बैरूत/ तेल अवीव :** गेल्या २४ तासांत इस्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) 'हमास-हिजबुल्लाह'च्या २३० हून अधिक ठिकाणांना लक्ष्य केले. त्यांचा नाश केला. इस्रायल हिजबुल्लाच्या दहशतवाद्यांना त्यांच्या पोकळीतून बाहेर काढून मारत आहे.

इस्त्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'चे अनेक लॉन्च पॅड नष्ट केले आहेत. 'हिजबुल्लाह' या लॉन्च पॅडस्वरून रॉकेट आणि ड्रोन उडवून उत्तर इस्रायलमधील रहिवाशांना ठार मारत असे. याशिवाय अनेक हवाई हल्ले करण्यात आले असून त्यात अनेक दहशतवादी मारले गेले आहेत. बॉम्बफेक करून 'हिजबुल्लाह'ची अनेक ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत.

इस्त्रायली लष्कराने जमिनीवरून कारवाई करून 'हिजबुल्लाह'च्या अनेक लढवय्यांना ठार केले आहे. त्यांच्या तळांवरून धोकादायक शस्त्रांचा साठा जप्त करण्यात आला आहे. त्यात रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांचाही समावेश आहे. किमान १०० हून अधिक 'हिज्बुल्लाह' तळ नष्ट करण्यात आले आहेत. त्यांच्या इमारती पाडण्यात आल्या आहेत. शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. लेबनॉन व्यतिरिक्त गाझा पट्टीतही इस्रायलचे सैन्य जमिनीवरून कारवाई करत आहे. तेथेही 'हमास' आणि 'हिज्बुल्लाह दहशतवाद्यांचे अड्डे हवाई हल्ले किंवा जमिनीवरील कारवाईतून उद्ध्वस्त केले जात आहेत. गाझा पट्टीत दहशतवाद्यांच्या लपलेल्या ठिकाणांवरून डझनभर रॉकेट लाँचर, ग्रेनेड, एके-४७ रायफल्ससारखी शस्त्रे सापडली आहेत. ती नष्ट करण्यात आली आहेत किंवा जप्त करण्यात आली आहेत.

### १८५ लक्ष्यांवर हल्ले

- इस्त्रायली वायुसेनेने जमिनीवरील कारवाईसोबतच लेबनॉनमधील 'हिज्बुल्लाह'च्या १८५ लक्ष्यांना लक्ष्य केले आहे. गाझामध्ये हमासचे ४५ लक्ष्य नष्ट करण्यात आले आहेत. या हवाई हल्ल्यांमध्ये दहशतवाद्यांचे तळ, शस्त्रास्त्रांचे डेपो, लष्करी संरचना आणि शस्त्रसाठा नष्ट करण्यात येत आहेत.

#रा



'मी असे म्हणत नाही की रोहित शर्मा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपनंतर निवृत्ती जाहीर करेल, कदाचित तो तसे करू शकेल. कारण जसजसे त्याचे वय वाढत आहे, तसतसे तो कसोटीतून निवृत्ती घेऊ शकतो असे दिसते. याचे कारण हे देखील असू शकते की त्याला एकदिवसीय क्रिकेटसाठी स्वतःला पूर्णपणे तंदुरुस्त ठेवायचे असेल. तथापि, मी वचन देतो की रोहित शर्मा २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक खेळेल. रोहित ज्या प्रकारचे क्रिकेट खेळत आहे ते अविश्वसनीय आहे. गेल्या वर्षी रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने चांगली कामगिरी केली होती. टीम इंडियाने या स्पर्धेत सलग १० सामने जिंकले होते. मात्र, जेतेपदाच्या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभूत व्हावे लागले.

— दिनेश लाड

### रिंकू सिंग आणि नितीश रेड्डीची तुफान फटकेबाजी

# बांगलादेशला 222 धावांचे लक्ष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या टी२० सामन्यात भारताची सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. मात्र, नंतर नितीश कुमार रेड्डीने केलेल्या घणाघाती हल्ल्यामुळे भारतीय संघाने मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल केली. त्याला रिंकु सिंगचीही चांगली साथ मिळाली. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ९ बाद २२१ धावा केल्या. त्यामुळे बांगलादेशसमोर विजयासाठी २२२ धावांचे आव्हान भारताने ठेवले आहे.

या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. भारताकडून पहिल्या षटकात १५ धावा फटकावत अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी दमदार सुरूवात केली होती. परंतु, सॅमसन १० धावांवर, अभिषेक १५ धावांवर तर कर्णधार




सूर्यकुमार यादव ८ धावांवर बाद झाला. त्यामुळे भारताने ६ षटकातच ३ विकेट्स गमावत ४५ धावा केल्या होत्या. पण यानंतर नितीश कुमार रेड्डी आणि रिंकु सिंगने भारताचा डाव तर सावरलाच पण आक्रमक खेळही केला. सुरुवातीला धिमी सुरुवात केलेल्या नितीशने नंतर मोठे फटके खेळत २७ चेंडूतच पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक ठोकले. त्यानंतरही त्याने आक्रमक पवित्रा कायम ठेवला होता. मात्र अखेर त्याची ही वादळी खेळी मुस्तफिजुरने संपवली. त्याने १४ व्या षटकात मेहदी हसन मिराजच्या हातून झेलबाद केले. नितीशने ३४ चेंडूत ४ चौकार आणि ७ षटकारांसह ७४ धावांची खेळी केली. तो बाद झाल्यानंतरही रिंकूने आक्रमक खेळ केला होता. त्यानेही २६ चेंडूत अर्धशतक केले. पण अर्धशतकानंतर तो बाद झाला. त्याने २९ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५३ धावा केल्या. रिंकु आणि नितीश यांच्यात ४९ चेंडूतच १०८ धावांची भागीदारी झाली. त्यांची ही चौथ्या विकेटसाठीची भारतासाठी तिसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च भागीदारी ठरली. हे दोघे बाद झाल्यानंतर हार्दिक पांड्या आणि रियान पराग यांनी भारताचा डाव पुढे नेला. मात्र, आक्रमक खेळण्याच्या प्रयत्नात १९ व्या षटकात रियान ६ चेंडूत १५ धावांवर बाद झाला.

#### नितीश रेड्डीचा धमाका!

● दुसऱ्या टी-२० मधील कामगिरीबद्दल बोलायचे तर, त्याने २२४.२४ च्या तुफानी स्ट्राईक रेटने ३४ चेंडूत ७४ धावा केल्या. या खेळीत त्याने ४ चौकार आणि ७ शानदार षटकार मारले. म्हणजेच फक्त चौकार आणि षटकारांच्या मदतीने त्याने ११ चेंडूत ५८ धावा ठोकल्या. मुस्तफिझूर रहमानच्या संथ चेंडूवर मेहदी हसन मिराजने नितीशचा झेल घेतला. नितीश आणि रिंकू सिंग यांच्यात चौथ्या विकेटसाठी १०८ धावांची भागीदारी झाली.

## एलिस पेरीने केला मोठा पराक्रम!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धा यूएईत होत आहे. या स्पर्धेतील १० व्या सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड १० ऑक्टोबरला आमनेसामने आले. या सामन्यात ऑस्ट्रेलियाची दिग्गज अष्टपैलू खेळाडू एलिस पेरीने बॅटने चमत्कार करून इतिहास रचला. या सामन्यात एलिस पेरीने ३० धावा करताच एक मोठी कामगिरी केली आहे.

शारजाहमध्ये ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून न्यूझिलंडविरुद्ध प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर ॲलिसा हिली आणि बेथ मुनी यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली, पण पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात संघाला पहिला धक्का बसला. सहाव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ॲलिसा हिली पॅव्हेलियनमध्ये परतली. हिली आणि मुनी यांच्यात पहिल्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी झाली. हिली आऊट झाल्यानंतर एलिस पेरी फलंदाजीला आली आणि तिने मुनीसह ४५ हून अधिक धावांची भागीदारी केली. यानंतर मुनीही १२व्या षटकात ४० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली.

## नवरात्र उत्सव उपवास रेसिपी

### राजगिऱ्याच्या पिठाचा शिरा

**साहित्य :**
१ कप राजगिरा पीठ
१ कप गावरान तूप
१/२ कप साखर
१ टेबलस्पून बारीक कापलेले काजू आणि बदाम
१ चमचा विलायची पावडर
मोठा एक कप दूध




**कृती :** पॅन गरम करून घ्या. पॅनमध्ये तूप घाला तूप वितळून घ्या. राजगिरा पीठ घाला. मंद गॅसवर पीठ तीन-चार मिनिटे खमंग भाजून घ्या. त्यामध्ये गरम दूध घाला, दोन-तीन मिनिटे परतून घ्या. साखर घाला. साखर पूर्ण विरघळेपर्यंत हलवत रहा. वरून एक चमचा तूप घाला, मिक्स करून घ्या.
विलायची पावडर घाला, मिक्स करा. पौष्टिक आणि चविष्ट राजगिऱ्याच्या पिठाचा शिरा तयार!!

-कीर्ती टांगसाळे

### हेल्दी चटपटीत कटलेट

**साहित्य :**
शेंगदाणा तेल,
२ ते ३ रताळी,
लाल भोपळा,जीरे पावडर, आलं मिरची पेस्ट, दाण्याचे कूट, चिरलेली कोथिंबीर,चवीनुसार मीठ, साबुदाणा पीठ, राजगिरा पीठ.




**कृती :** सर्व प्रथम रताळ्याची सालं काढून एक वाफ देऊन उकडून घ्यावे. लाल भोपळा न उकडता तसाच किसला तरी चालतो. हवे असल्यास त्याला ही एक वाफ द्यावी. गार झाल्यावर रताळे व लाल भोपळा किसून घ्यावा.लाल भोपळा किसल्यावर त्याला पाणी सुटले असेल तर ते काढून घ्यावे.
त्यानंतर त्यात दाण्याचे कूट, राजगिरा पीठ, आलं मिरची पेस्ट, जीरे पावडर, चिरलेली कोथिंबीर आणि चवीनुसार मीठ घालून चांगले मिक्स करावे.
चांगले मिक्स झाल्यावर तयार झालेल्या पीठाचे छोटे गोल गोळे बनवून थापावेत. गोल आकार करावेत. कुकी कटर असतील तर त्याने हवा तसा आकार करु शकतो. त्यानंतर साबुदाणा पीठात घोळवावेत.
फ्राय पॅन मध्ये थोडे तेल घ्यावे आणि त्यात हे कटलेट छान लालसर शॅलोफ्राय करावेत. मस्त तयार झालेले हे कटलेट चिंचेची चटणी किंवा दह्याबरोबर खाल्यास खूप छान लागतात.

-सारिका जोशी

## सुरज, सोनु, निमिष, अमरदीप यांची निवड !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित राज्य निवड चाचणी स्नुकर स्पर्धेत सुरज राठी, सोनु मातंग, निमिष कुलकर्णी आणि अमरदीप घोडके या खेळाडूंची निवड करण्यात आली.

अहमदनगर रोडवरील क्यु क्लब येथे झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये पुना क्लबच्या सुरज राठी याने सोनु मातंग याचा २६-३८, ३०-१७, ३९(३९)-००, ४३-०८ असा सहज पराभव केला आणि स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले. तिसऱ्या आणि चौथ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यामध्ये अमरदीप घोडके याने निमिष कुलकर्णी याचा ५४-३०, ४१-१६ असा सहज पराभव केला.

याआधी झालेल्या उपांत्य फेरीत सुरज राठी याने अमरदीप घोडके याचा ३९(३३)-२०, ३६-२२, ४४(३०)-११ असा तर, सोनु मातंग याने पीवायसी हिंदू जिमखानाच्या निमिष कुलकर्णी



याच्यावर ४१(४१)-००, ४१-०७, १३-३३, १७-३१, ४२-१३ असा विजय मिळवला.

मुंबई येथील मलबार हिल क्लब येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी या चार खेळाडूंची निवड झाली असून पुणे जिल्ह्याचे या राज्य स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व करणार आहेत. निवडलेल्या या खेळाडूंचा खर्च हा पीडीबीएसए तर्फे देण्यात येणार आहे.

## मृगनयनी शिंदे हिने वर्ल्ड स्केट गेम्स चॅम्पियनशीप २०२४ मध्ये अव्वल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भूगाव (ता. मुळशी) येथील मृगनयनी संतोष शिंदे हिने इटली येथे खेळल्या गेलेल्या वर्ल्ड स्केट गेम्स चॅम्पियनशीप २०२४ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत कांस्यपदक पटकाविले.

उपांत्य फेरीत तिने तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या चीन विरुद्धच्या सामन्यात सर्वोत्तम कामगिरी केली. या स्पर्धेत अमेरिकेने पहिले स्थान मिळवून सुवर्णपदक, तर ऑस्ट्रेलियाने रौप्यपदक पटकाविले. या स्पर्धेत पुण्याच्या मृगनयनी शिंदे, विभा मुठेकर, श्रुती सरोदे आणि वैदेही सरोदे या चौघींना चमकदार कामगिरी करीत भारताला हे यश मिळवून दिले आहे.

दर चार वर्षांनी वर्ल्ड स्केट गेम्स चॅम्पियन्सशीप स्पर्धा विविध देशांत आयोजित केली जाते. यंदा इटलीतील



रोमजवळील मॉन्टएसिल्वानो येथे ही स्पर्धा पार पडली.

भारतीय राष्ट्रीय रोलर स्केटिंग महासंघामार्फत स्केटिंग खेळातील विविध इव्हेंट या स्पर्धेसाठी गेले होते.

त्यापैकी रोलर स्केटिंग डर्बी भारतीय संघ एक होता. या संघाने स्पर्धेमध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि चीनसोबत सामना केला. उपांत्य फेरीच्या सामन्यात चीनला १२७-३९ अशी मात देऊन नमवले. या संघात मृगनयनीने सर्वोत्तम कामगिरी करीत देशाची मान अभिमानाने उंचावली.


मृगनयनी हिने कोथरूडमधील महेश बालभवन स्केटिंग ॲकॅडमी येथे प्रशिक्षण घेतले आहे. तिचे शालेय शिक्षण पुण्यातील एमआयटी शाळेत झाले असून सध्या ती बीएमसी महाविद्यालयात वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्षात शिकत आहे. तिला धीरज उभे व दीपक पवार मार्गदर्शन करीत आहेत.





नवरात्री दरम्यान नऊ दिवस उपवास व देवीची पूजा अर्चना करतात. नवरात्रीचे नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे घालण्याचे विशेष महत्त्व आहे. या निमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या शिक्षक व शिक्षकेतर वर्गातील कर्मचारी यांनी निळया रंगाची वस्त्र परिधान करून आपला आनंद साजरा केला.

## कारभारी जिमखाना, पुणे क्रिकेट संघांची विजयी आगेकूच !

**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'मान्सुन करंडक' १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत कारभारी जिमखाना





ॲकॅडमी आणि पुणे क्रिकेट ॲकॅडमी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी आगेकूच केली. मुकूंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या कटारीया हायस्कूल मैदानावर झालेल्या सामन्यात कृष्णा चौधरी आणि व्दिथ पुजारी यांनी केलेल्या फलंदाजीच्या जोरावर पुणे ॲकॅडमीने टेंभेकर फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीचा १३२ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना पुणे क्रिकेट ॲकॅडमीने २१२ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये व्दिथ पुजारी याने ८२ धावांची तर, कृष्णा चौधरी याने ७९ धावांची खेळी केली. या दोघांनी ९४ चेंडूत १७५ धावांची सलामी दिली. या लक्ष्याचा पाठलाग करताना टेंभेकर फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ८० धावांवर गडगडला. पार्थ शिंदे याने केलेल्या अचुक गोलंदाजीमुळे कारभारी संघाने पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा ४४ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना सार्थक ढमढेरेच्या ५८ धावांच्या जोरावर कारभारी जिमखाना ॲकॅडमीने १८२ धावांचे लक्ष्य उभे केले. हे आव्हान गाठताना पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १३८ धावांवर मर्यादित राहीला.

### आंतर-क्लब ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धा

## पुना क्लब आणि लिजंड्स स्पोर्टस क्लब संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रेसिया क्रिकेट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'ग्रेसिया करंडक' २०२४ खुली आंतर-क्लब टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत पुना क्लब आणि लिजंड्स स्पोर्टस क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली.

मुंढवा येथील लिजंड्स स्पोर्टस क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत धनराज परदेशी याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे पुना क्लबने ॲथलेट





ॲकॅडमीचा ५६ धावांनी सहज पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. पहिल्यांदा फलंदाजी करताना पुना क्लबने १२६ धावा जमविल्या.

अर्जुन वाघ (२८ धावा), ऋषभ राठोड (२७ धावा) आणि अजिंक्य नाईक (२० धावा) यांनी संघाचा डाव उभा केला. या आव्हानाला उत्तर देताना ॲथलेट क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ७० धावांवर गडगडला. धनराज परदेशी याने ७ धावांमध्ये ४ गडी बाद करून ॲथलेट संघाच्या फलंदाजीला खिंडार पाडले.

गौरव गोगावले याने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे लिजंड्स स्पोर्टस क्लबने पीआर क्रिकेट संघाचा ५ गडी राखून पराभव केला आणि सलग दुसरा विजय मिळवला.

लिजंड्स स्पोर्टस क्लबच्या गौरव याने ५ धावांमध्ये ६ गडी बाद करून पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या पीआर संघाचा डाव कापून काढला. पीआर क्रिकेटने दिलेले ९९ धावांचे लक्ष्य लिजंड्स स्पोर्टस क्लबने ९.१ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले.

## महाराष्ट्राची मणिपूरवर मात; उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागपूर येथे झालेल्या बीसीसीआयच्या १९ वर्षांखालील मुलींच्या गटाच्या टी-२० साखळी क्रिकेट स्पर्धेत 'ड' गटात ईश्वरी अवसरेने केलेल्या नाबाद शतकाच्या जोरावर महाराष्ट्राने मणिपूर संघावर ११७ धावांनी विजय मिळविताना उप-उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

लेडी अमृताबाई डागा महाविद्यालयाच्या मैदानावर मंगळवारी झालेल्या या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना ३ बाद १७६ धावा केल्या त्यात महत्त्वाचा वाटा कर्णधार ईश्वरी अवसरेने केलेल्या नाबाद शतकाचा होता. ईश्वरी आणि भाविका अहिरेने पहिल्या विकेटकरिता ८० धावांची भागीदारी केली. त्यानंतर ईश्वरी आणि महेक मुल्लाने तिसऱ्या विकेटसाठी ७८ धावांची भागीदारी केली. ईश्वरीने ७० चेंडूंत १४ चौकार व तीन षटकारांसह नाबाद १०५ धावा केल्या. यानंतर महाराष्ट्राच्या गोलंदाजांचा सामना करण्यात मणिपूरच्या फलंदाज अपयशी ठरल्या. मणिपूरकडून केवळ दोघींनाच दुहेरी धावसंख्या गाठता आली. मणिपूरला सात बाद ५९ धावा करता आल्या आचल अगरवालने तीन, तर गायत्री सुरवसेने दोन गडी बाद केले.

### आठव्या एसएनबीपी अखिल भारतीय मुलांच्या १६ वर्षांखालील हॉकी स्पर्धा

## आर्मी बॉईज, ध्यानचंद अकॅडमीचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गतविजेत्या आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीसह उपविजेते ध्यानचंद अकॅडमी आणि तिसऱ्या क्रमांकावरील राऊंड ग्लास अकॅडमीने आठव्या एसएनबीपी अखिल भारतीय मुलांच्या १६ वर्षांखालील हॉकी स्पर्धेत विजयी सुरुवात केली.

बालेवाडी येथील शिव छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे येथे सुरू असलेल्या स्पर्धेत मंगळवारी एफ गटामध्ये गतविजेत्या आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीने प्रयागराज येथील



विजय हॉकी अकॅडमीला ६-३ असे हरवले. अर्जुनने (२', २४', ३०', ३३', ४०') पाच गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला. प्रशांत आईंदने (४७') एक गोल करताना त्याला चांगली साथ दिली. विजय हॉकी अकॅडमीकडून अमित दयाळ (४'), गुरुदत्त कुमार (३४') आणि शिव शंकर बिंदने (४१') गोल करताना थोडा प्रतिकार केला. आर्मी बॉईजनी आघाडी कायम राखली. विजय अकॅडमीचा हा दुसरा पराभव असून त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

अ गटातील लढतीत, गतवर्षीच्याउपविजेत्या ध्यानचंद अकॅडमीने मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशनवर (एमएसएसए) ६-० अशी सहज मात केली. सूरज कुमारचे (२३', ४३', ४५') तीन, सुमंत सिंगचे (११', २७') पेनल्टी कॉर्नरवरील दोन गोल आणि रवी राजभरचा (21') एक गोल त्यांच्या एकतर्फी विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. दिवसातील पहिला सामना खेळताना राऊंड ग्लास अकॅडमीने आपली प्रतिष्ठा कायम राखताना ओरिसा नेव्हल टाटा ग्रासरूटचा ४-१ असा पराभव केला. अमनदीप सिंगची (१७', २४', ३८') पेनल्टी कॉर्नरची गोलांमध्ये रूपांतर करण्याची हातोटीमुळे त्यांना विजय सहज शक्य झाला. अनुराग सिंगने (४२') एक गोल करताना त्याला चांगली साथ दिली.

#रा